Bharati Mukherjee, a diasporic woman writer, presents a story of a woman protagonist Jasmine as a phoenix who rises from her ashes. Bharati Mukherjee has a sensitivity towards the problem of intercultural crisis and expresses the agony and misery for women, the challenge to women's destiny, migration to assimilation through Jasmine in patriarchy. It shows Jasmine's hardships, silence, pain, defiance, and injustice towards the patriarchal order, horror of rape, pregnancy phobia as typical encounters for the country's indigenous heritage, as well as the cultural surroundings of its migration. Her sensitivities for a homeland to a brave new planet, an Indian girl to a sophisticated American individual, and her disintegration as she experiences the deep personalities of Jasmine.

References

- Indira Nityanandam. "Bharati Mukharjee's Jasmine: The Immigrant Experience In Australia and the USA." New Delhi, India: Creative Books. 2000.
- C. Sengupta. "Feminine Mystique In Jasmine." New Delhi: Creative Books.2000.
- Singh, Sushila. "Feminism and Recent Fiction in English." New Delhi: Prestige Books, 1991.
- R. K. Dhawan. "The Fiction of Bharati Mukharjee: A Critical Symposium." New Delhi: Prestige. 1996.
- Mukherjee, Bharati. "Jasmine." New York: Grover Press, Inc., 1989.Print.
- Nagendra Kumar. The Fiction of Bharati Mukherjee: A Cultural Perspective. New Delhi, India: Atlantic. 2001.
- https://www.researchgate.net/publication/

PUBLISHED BOOK & PUBLISHED CHAPTER IN BOOK AND CONFERENCE PROCEEDING

DEPARTMENT OF MARATHI

2016– 17 to 2020 – 21

Sr. No.	Name of the Teacher	Number of published Book & Chapter in Book and Conference Proceeding					Total
		2016-17	2017-18	2018-19	2019-20	2020-21	
1	Dr. C. R. Rumale	00	00	00	01	02	03
2	Mr. Swapnil Ingole	N.A. (Join as Assistant Professor from 12/09/2019)				02	02
	Total	**00**	**00**	**00**	**01**	**04**	**05**


इतिहास
संशोधनातील नवदृष्टीकोन
संपादक
डॉ. संजय गायकवाड

10	खिस्ती धर्मातील पंथ व त्याचे तत्त्वज्ञान: एक दृष्टीक्षेप प्रा. डॉ. युवराज गुंडू सुरवसे	47
11	प्राचीन भारतीय आयुर्वेदीक चिकित्सा पध्दती विशाल विजय फुटाणे डॉ प्रा प्रभाकर कोळेकर	55
12	प्रबोधन ठाकरे यांचे हिंदू समाजजीवनाची चिकित्सा श्री बापूराव घुंगरगांवकर	78
13	अॅनाल्स परंपरा की उपलब्धि: स्थानीय इतिहास लेखन Prof. Dr. Sanjay Gaikwad	83
14	IMPORTANT AND CULTURAL HERITAGE TOURISM IN MAHARASHTRA Prof. Battul Surekha Narhari	91
15	IMPORTANCE OF JAIN PILGRIMAGE TOURISM SPECIAL REFERENCE OF MAHARASHTRA Dr. Sainath Kabade	103
16	A CRITICAL STUDY OF FEMINISM IN RAMA MEHTA'S "INSIDE THE HAVELI" Miss. Patil Bhagyashri Siddharam	107
17	CRITICAL ANALYSIS OF GIRISH KARNAD'S 'TALE-DANDA' AS A HISTORICAL PLAY Mr. Ruge Kamalakar Shivalingappa	113
18	CHALLENGES FACED IN IMPLEMENTATION OF PROVIDENT FUND SCHEME IN SOLAPUR'S SMALL AND MEDIUM SCALE POWERLOOM SECTOR Prof. Arun Vitthal Sonkamble Prof. Harshal Shashikant Shinge	118
19	HISTORY OF INDIAN COINS Dr. Swarali Chandrakant Kulkarni	130
20	वृद्धावस्था आणि समायोजन – एक अभ्यास प्रा. डॉ. उज्वला बाजपाई	137

21	नाटकाच्या उत्पत्तीच्या इतिहास प्रा.डॉ.चारुशिला राजेश्वर रूमाले	144

नाटकाच्या उत्पत्तीचा इतिहास

प्रा. डॉ. चारूशिला राजेश्वर रूमाले
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

'अवस्थानुकृतिर्नायम् रूपकं तत्समारोपात'

काव्य आणि ललित कला, विशेषतः नाटक मानव व मानवेतर प्रवृत्तीच अनुकरण करून आनंदप्राप्तीच नाही तर रसनिर्मिती सुध्दा करतात. हे केवळ बाहय प्रकृतीचच अनुकरण करीत नसून मानवाच्या अंतः प्रवृत्तीच त्यांच्या मानसिक भावभावनांचा अनुकरण करतात. उदा. एखादा चित्रकार सुंदर स्त्रीच्या अवयवांच सौंदर्यपूर्ण चित्र निर्माण करून सजीवतेची अनुकृती देतो. तिच्या मुखमंडल, नेत्र, याला अशाप्रकारे अंकित करतो की त्यातून त्या चित्राचे मनोगत भाव सुध्दा व्यक्त होतात. तसेच कुशल कवि आपल्या पात्रांचे मनोगत, रागादी भाव आपल्या काव्यशरीराव्दारा व्यक्त करतात. जसे काही ते त्याच बाहय रूप आहे. सफल नाटक त्यालाच म्हटल जात जेव्हा नाटककार पात्राच्याद्वारा आंतरिक प्रवृत्ती ला सुंदर रितीने व्यक्त करेल. भारतीय अलंकार शास्त्रामध्ये सुध्दा रससिध्दाताचा महत्वपूर्ण संकेत इकडेच आहे. दृश्य काव्यच्या क्षेत्रामध्ये रसाला आत्मरूप प्रतिष्ठा भरतमूनी च्या पहिले नन्दिकेश्वर आणि किन्ही आचार्याच्याव्दारा प्राप्त झालेली होती.

भारतीय परंपेनुसार नाटकाची उत्पती त्रेतायुगामध्ये ब्रम्हदेवाव्दारा झाली. सत्ययुगामध्ये लोकांना कोणत्याच मनोरंजनाच्या साधनाची आवश्यकता नव्हती. त्रेतायुगामध्ये देवतावर्ग ब्रम्हदेवांच्या जवळ गेला व प्रार्थनाकरून म्हणाला अश्या एखाद्या वेदाची निर्मिती करा, ज्या व्दारा शुद्रवर्ग अनुशिलील होऊ शकेल कारण त्यांच्यासाठी मनोरंजनाच कुठलच साधन नव्हंत. वेदाध्ययन त्यांना निषध्द होत. त्यावर ब्रहदेवांनी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद यांच्या

144

आधारावर पंचमवेद-, नाटयवेद म्हणून रचना केली. नाटयवेद या पंचम वेदाची चार प्रमुख अंग आहेत. पाठय, गीत, अभिनय आणि रस या चार तत्वांना ब्रम्हदेवानी ऋग्वेदातून-पाठय, यजुर्वेदातून-गीत, सामवेदातून-अभिनय, अथर्ववेदातून-रस घेतला. नंतर ब्रम्हदेवानी विश्वकर्माला एका नाटयगृहाची निर्मिती करण्याचा आदेश दिला. तसेच भरतमुनि यांना या नाटयकलेचे संपादन व त्याची शिक्षा देण्याचे सांगितले.

ब्रम्हदेवाने भरतमुनिला शभंर शिष्य व शंभर अप्सरा नाटयशास्त्राचे व्यावहारिक शिक्षण घेण्यासाठी दिल्या. यामध्ये शिव-पार्वती, यांनी सुध्दा योगदान दिले शिवानी -तांडवनृत्याच, पार्वतीने-लास्य-नृत्यांच. नाटय तत्वामधील दोन प्रमूख महत्वपूर्ण तत्व आहेत. ती संवाद आणि अभिनय

1. संवाद 2. अभिनय

संवाद:

संवाद आपल्याला ऋग्वेदामधून मिळतात. म्हणजेच नाटकाची बीज वेदांमध्ये मिळतात. ऋगवेदामध्ये जवळ जवळ 15 सुक्त मिळतात. इंद्र-मरूत संवाद, (1.165,1,170) विश्वमित्र नदी संवाद (3.33) पुरूरवा-उर्वशी संवाद, (10. 65) यम-यमी संवाद, (10.10) हे प्रमूख असून, इंद्र इन्द्राणी संवाद (1.179) या संवादाच्या आधारांवर मैक्समुलर म्हणतात, की या सुक्तांचा पाठ यज्ञ करतांना होत असेल व वेग-वेगळे ऋत्विक (पात्र) मरूत व इंद्र वेगवेगळे मंत्र (संवाद) म्हणत असतील. प्रोफेसर सिलवॉ लेपी चे असे मत आहे की या कालखंडामध्ये अभिनय होत असला पाहिजे देवतांच्या रूपामध्ये यज्ञासमयी नाटयअभिनय नक्किच होत असेल.

लेवी, मैक्समूलर, श्रोएदर व हर्षेल यांच्या मते सुक्तांमध्ये अभिनय व संवाद याची तत्त्व विद्यमान आहेत. जी नाटकाची बींज आहेत. हर्षलचे म्हणणे की सुक्तांचा स्वरूप् गेय आहे.

श्रोएदर यांनी ऋग्वेदातील काही सुक्तांमध्ये नाटकाच आदिम रूप दिसतं. तिथे त्यांनी 'गेय व अभिनय' ही तत्वे शोधलीत एकंदरीत ऋग्वेदातील संवादामध्ये नाटकाची बीज सापडतात हे निर्विवाद आहे.

नृत्याला नाटकाचं पुर्वरूप मानणा-यांमध्ये मैकडोनल, प्रा. पिशेल आहेत. पिशेल यांच्या मते भारतामध्ये कळसुत्री बाहुल्यांचा खेळ प्राचीन काळापासून आहे. महाभारतामध्ये याचे उल्लेख मिळतात. तसेच कथासरित्सागर मध्येही कळसुत्री बाहुल्यांच वर्णन आलेले आहे. त्यामध्ये बाहुल्यांचा जो सुत्रधार असतो त्याचा संबध नाटकाच्या सुत्रधाराशी जोडला तो योग्य वाटत नाही.

वेदानंतर 'रामायण' व 'महाभारत' काळात नाटाकाचे संकते शोधता येतात. 'कीथ' च्या मतानुसार या काळामध्ये नट या शब्दाच्या आधारावर नाटकाचे अस्तित्व मानता येतं. रामायणामध्ये नट या शब्दाचा प्रयोग मिळतो. आरंभीच अयोध्या वर्णनामध्ये महर्षि वाल्मिकी यांनी तेथे नाटक मंडळे व वेश्या असल्याचा उल्लेख केला तसेच राम यांनी सुध्दा अभिषेकाच्या वेळेस नट, नर्तक व गायक यांनी आपल्या कलाकुशलतेने जनतेला प्रसन्न करावं असा उल्लेख आहे. व हरिवंशपर्वामध्ये 91 ते 97 अध्यायामध्ये नाटक खेळण्याचे संकेत सापडतात. 'वज्रनाभदैत्याचा' वध करण्याकरिता श्रीकृष्णाने कपटनटांचा वेश धारण करून त्याच्या नगरामध्ये जाऊन रामायणावरचे नाटक खेळले. तसेच 'कौबेर रम्भभिसार' नाटक खेळते. या नाटकाचा अभिनय इतका अप्रतिम होता की दैत्य, राक्षस व त्यांच्या भार्यांनी आपल्या अंगावरील सुवर्णाचे अलंकार नटांना बक्षीसाच्या स्वरूपात खुश होऊन दिले. यावरून येथे पूर्ण विकसित झालेलं नाटयरूप दिसते.

महाभारत व रामायणानंतर बौध्द ग्रंथ, जैन ग्रंथ त्याचप्रमाणे 'वात्सायनाच्या' 'कामसुत्रामध्ये' नाटक व नट यांचे अस्तित्व दिसते.

महाभाष्यकार 'पतंजलि' यानी स्पष्ट स्वरूपात 'कंसवध व बलिबन्धन' या दोन नाटकासंबंधीत कथांचा उल्लेख केला आहे.

146

पतंजलि यांचा निश्चित कालखंड असून ते अग्निमित्र शृङ्गवंशी राजा चे पुरोहित व गुरू होते. ते लिहितात कंस पहिले मरण पावले. व बलिबन्धन भुतकाळातच होऊन गेलेले होते. परंतु हे नट वर्तमान काळामध्ये आमच्या डोळयासमक्ष कंसाला मारतात व बळिला बांधतात यावरून नाटकाच्या खेळाचे पूर्ण विकसित रूप असलेले दिसते.

महाभाष्यकार पतंजलि यांच्याही पहिले कवि भासा पासून विसाव्या शतकापर्यंत संस्कृत नाटकांची अक्षरय्य परंपरा प्रत्यक्षात दिसून येते. संस्कृत मधील नाटकाचे अंग इतके समृध्द आहे, की संख्या व रचना गुणांनी या दोन्ही दृष्टयांनी त्याचे विश्व नाटय साहित्यामध्ये अपूर्व असे विशिष्ट स्थान आहे. संस्कृतमध्ये अश्या हजारो एकापेक्षा एक सुंदर नाटकांची निर्मिती झाली आहे. त्यातील अजूनही अंधारात पडलेली आहेत. त्यांचा उल्लेख 'किन्ही अलंकारशास्त्र व नाटयशास्त्र' या ग्रंथामध्ये दिलेल्या उदारहरणावरून कळते. उदा. भास यांची नाटके, भास, कालिदास, शुद्रक, अश्वघोष, भवभुति, मुरारि, विशाखादत्त, भटनारायण, राजशेखर, जयदेव, व इतरही नाटककारांनी कलापूर्ण नाटक निर्मिती केली आहे.

या काळातील वामन भट्ट, बाण, शेषकृष्ण, मधुरादास, युवराज, रामवर्मा, यांची क्रमशः पार्वतीपरिणय, कंसवध, वृषभानुजा, नाटिका अनंगविजय, भाग इ. रचना आहेत संस्कृतमधिल या विशाल नाटयसहित्य समुद्रातील काही रत्न काढून त्यांचे महत्त्व सांगणे फारच कठीण आहे. कालिदास, शुद्रक व भवभूति यांचे काव्यतर संस्कृत नाटककारांच्या मुधन्यच आहेत. म्हणुनच मुरारी यांना भवभुतिपेक्षा श्रेष्ठ मानल्या जाते. म्हणुनच

"मुरारिपदचिन्तायां भवभूतेस्तू का कथा ।
भवभूतिमनाद्यत्य मुरारिमुररीकुरू।।"

भवभूतिसारखी रागात्मक उध्दावना मुरारीमध्ये कुठे? ते तर शास्त्रीय पाण्डित्याचे विशेष आहेत. कालिदासाचे स्थान निश्चित आहे.

त्यांचे 'अभिज्ञानशाकुंतल' सर्व संस्कृत काव्याचे सार 'एसेन्स' आहे याचा उदघोष सर्व प्राचीन पंडितांनी मुक्तकंठानी केला आहे.

"काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्यं शकुन्तला ।
तत्राप्रापि च चतुर्थोडस्तत्र श्लोकचतुष्टयम् ।।"

या विशाल व समृध्द नाटयसाहित्याच्या समृध्दीच श्रेय भरताच्या नाटयशास्त्र या नाटकाच्या सिध्दान्तग्रंथाला व लक्षणग्रंथाला द्यावयास हवे. स्वतः कालिदास भरतमुनि यांच्या नाटकांच्या सिध्दान्तावरून पथकक्रमण करीत होते. प्रथम नाटयशास्त्र व अलंकारशास्त्र दोन वेगळे भाग होते. याचा स्पष्ट उल्लेख राजशेखरच्या काव्यमीमासेत आला आहे. रसविवेचन हे नाटयशास्त्रचे प्रमुख अंग समजल्या जात होते. अलंकार शास्त्र तिथे निषिध्द गणल्या जाई.

भरतः- भरताचे नाटयशास्त्र हा नाटयशास्त्रावरिल सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. केवळ नाटयशास्त्रच नाही तर अलंकारशास्त्र, संगीत, नृत्य व नाटक यांचा प्राचीन पथदर्शक ग्रंथ समजल्या जातो. नाटयशास्त्रावर दोन ग्रंथ बघावयास मिळतात. एक, नाटयवेदागम व दुसरा, नाटयशास्त्र,. पहिला व्दादशसाहस्त्री, तर शटसाहस्त्री समजण्यात येतो. भरताच्या कालखंडात बाबत विव्दानांमध्ये एकमत नाही. त्यांचा नाटयशास्त्रचा रचनाकाळ ईसा पूर्व व्दितीय शताब्दी समजण्यात येतो. डॉ. कृस के. देके च्या मतानुसार नाटयशास्त्रातील संगीताचा अध्याय चैथ्या शताब्दीची रचना आहे. परंतु नाटयशास्त्रामध्ये कुठलेचे परिवर्तन नाही. कालिदासांच्या नाटकात 'विकमोर्वशीय' मध्ये भरताचा उल्लेख आला आहे. तो पर्यंत भरत इतके प्रसिध्द झाले होते की, कालिदास इंद्रा समोर भरताच्या नाटकातील अभिनयाचे संकेत देत होते.

नाटयाचार्य भरत कालिदासांच्या पहिलेच पौराणिक व्यक्ति म्हणून प्रसिध्द होते. ते स्वतःत ऋषी असून त्यांनीच ब्रहमदेवाला नाटयवेद शिकविला ही उत्पतीची घटना नाटयशास्त्राच्या पहिल्याच

ध्यायात आहे. याचे उल्लेख कालिदासाच्या विक्रमोर्वशीय यातील हेल्या अंकामध्ये खालील पद्यात मिळतात.

"मुनिंना भरतेन यः प्रयोगो भवतीष्वष्टसाश्रयो निषध्दः ।
ललिताभिनयं तमद्य भर्ता मरूतां द्रष्टमनाः सं लोकपालः ।।"

नाटयशास्त्रामध्ये काही अशी स्थळ आहेत ती त्याची ाचीनता सिध्द करतात. जसे प्राचीनतम सुत्र.....

"अत्रानुवंश्ये आर्ये भवतः। तत्र श्लोकः, आदि ।।"

नाटयशास्त्र सुत्रपरिपाटि चा आश्रय घेतो. न्यायदेव भरताला ुत्रकृत् शब्दाचा प्रयोग करतात- 'कलानामनि सुत्रकृदुक्तानि यथा' ाभिनवगुप्त भरतसुत्र असे नाटयशास्त्राला म्हणतात.

हा ग्रंथ 37 अध्यायांचा असून प्रथम अध्यायात नाटयवेदाची ुत्पती वर्णन आहे. नंतर रंगभूमीचे, रंगमंचाचे प्रकार वर्णन आहे. त्याचे वेगवेगळे अंग म्हणजेः रंगशीर्ष,रंगमध्य, रंगपृष्ठ, मत्तवारणी व ेक्षकांच्या बसण्याच्या स्थानच वर्णन आहे. चवथ्या व पाचव्या अध्यायामध्ये पुर्वरंगविधानच वर्णन आहे नंतर चार प्रकारच्या अभिनयाच वर्णन केल आहे. सात्विक, आंगिक, वाचिक तथा आहार्य, सात्विक अभिनयं वर्णन-सहा व सात अध्यायामध्ये असून त्यात भावाभिव्यक्तीच वर्णन आहे. रस, भावविभाव, अनुभाव व संचारिभाव याच वर्णन याच अध्यायात आहे. पुढील सहा अध्यायामध्ये - 8 ते 18 पर्यंत, आंगिक अभिनय वर्णन 14 ते 20 पर्यंत वाचिक व आहार्य अभिनय वर्णना च अनुकरण नाटयशास्त्री करतात.

नाटयशास्त्रावर कितीतरी टीका झाल्या. भरताचे प्रसिध्द सुत्र 'विभावअनुभावव्यभिचार संयोगातरसनिष्पति': यांची व्याख्या करणा-यांमध्ये, लोल्लट, शंकुक, भट्टनायक, अभिनायक, अभिनयगुप्ता हे आहे. लोल्लटः- कश्मीरी असून, यांनी संयोगात- याचा अर्थ 'कार्यकारणभावरूप संबंध' व निष्पतिचा 'उत्पत्ति' असा अर्थ लावला. लोल्लट मीमांसक असून अभिधावादी होते व या शक्तिलाच साधन मानत होते.

149

3. शंकुक:

शंकुक सुध्दा कश्मिरी आहेत. लोल्लटाच्या समकालीन असून त्यांनी भुवनाभ्युदय हे काव्य लिहिल असून त्यांनी विभावादि साधन व रसरूप साध्य यामध्ये अनुमाप्य - अनुमापकभावाची कल्पना मांडली त्याच बरोबर त्यांनी 'चित्रतुरगादिन्याय' ही कल्पना मांडली. त्यांच्यामते अभिनय करणारा नट खरे राम नाहित, तर ते चित्रामध्ये लिहिलेल्या घोडया सारखे राम आहेत. शंकुकयांनी रसस्थिती सहदय व सामाजिक यांच्यामध्ये मानतात. शारंगधरपध्दती व सुक्तमुक्तावली यामध्ये शंकुक यांना मयुरपुत्र म्हणतात.

4. भट्टनायक:

रससुत्राचे तीसरे व्याख्याकार व 'हृनदयदर्पण' या स्वतंत्र ग्रंथाचे रचियता हा ग्रंथ अलंकारशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ आहेत्र अभिधावादी असून आनंदवर्धन यांचे समकालीन, काश्मीरराज अवानीवर्मा यांच्याकडे राजकवि होते. ते रसाच्या संबधात भावकत्व व भोजकत्व या दोन व्यापारांची कल्पना मांडतात. तर संयोगात याचा अर्थ भाव्यभावक संबधं असा लावतात. तर निष्पत्ति चा अर्थ तात्पर्य 'भुरक्ति'- आस्वाद असा करतात. भटनायक रसाची स्थिती सहृनदयामध्ये पूर्णतः सिध्द करतात. भट्टनायक रसाची स्थिती सहृनदयामध्ये पुर्णतः सिध्द करतात. ते साधारणीकरण सिध्दान्ताचे सर्वप्रथम प्रवर्तक आहेत व सांख्यमतानुयायी आहेत.

5. अभिनवगुप्ताचार्य:

नाटयशास्त्राचे प्रसिध्द आचार्य, शैव दर्शन व्यक्तिमत्व आनन्दवर्धन यांच्या ध्वन्यालोक वर लोचन ही टिका भरताच्या नाटयशास्त्रा वर अभिनवभारती हा अमुल्य ग्रंथ आहे. टीकाग्रंथ असले तरी अतिशय प्रभावी व ताकदीचे आहेत. त्यांचे पिता नरसिंहागुप्त किंवा चुखुलक हे होत. गुरू - भटतौत. साहित्यामध्ये - व्यंजनावादी व ध्वनिवादी असून ते रसाला व्यंग मानतात. भरतसुत्राचा संयोगात व रसनिष्पत्ति चा व्यंग्यव्यंजक भावरूपात व अभिव्यक्ति असा अर्थ

150

लावतात. धनंजय व धनिक हे एककालिक असून ते अभिनव गुप्ताच्याही आधी रसाच्या व्यंगत्वाची स्थापना करून चुकले होते. म्हणूनच त्यांनी अवलोकवृत्ति मध्ये व्यंजना या तुरीया वृत्ती ची कल्पना व रसाचे व्यंगत्व याचा विरोध केला.

अभिनव गुप्त यांनी रसचर्वणा निष्पत्ति नंतर शांत रसाचीनवीन मांडणी केली. भरताच्या नाटयशास्त्रामध्ये आठ रस आहे. अभिनव भारतीमध्ये नऊ रसाची स्थापना केली आहे संस्कृतच्या अलंकारामध्ये व नाटयशास्त्रामध्ये अभिनवगुप्ताची गणना पहिल्या प्रतिच्या आर्चायामध्ये केल्या जाते.

6. धनंजय:

दशरूपक यांचे लेखक, मालव्यातील परमावशंचे राजा मुंज यांचे दरबारी राजकवि त्यांचा कार्यकाळ 974-995 ई. मानण्यात येतो. धनंजय यांची दशरूपक रचना भरताच्या नाटयशास्त्रातील सिध्दान्ताचा संक्षेप, नायिकाभेद व श्रृंगाररस या विषयासंदर्भात भरताच्या नाटयशास्त्राचा आश्रय घेतात. धनंजय प्रमुखतः वस्तु नेता. रस यांचे विश्लेषण व रूपकांचे प्रमुख दशभेदांचे वर्णना पुरतेचे सिमित आहे. जसे

'नाटयांना किन्तु किंचित प्रगुणरचनया लक्षणं संक्षिपाथि--'

धनंजय व त्यांचे बंधु धनिक यांनी वस्तुविभाग, पाचअर्थप्रकृति अवस्था, संन्धिया यांचा अंकविभाजन व अर्थोवक्षेपकांच वर्णन नायक व नायिका यांच्या अवस्थांच अनुरूप मानसशास्त्रीय विभाजन् तसेच त्यांच्या सहकारी यांच वर्णन रस व रससाधानाचं वर्णन व विष्लेषण, विष्वनाथ यांचे ग्रथं, भानुदत्ताची रसमंजिरी, रसतरंगिनी, भावमिश्राची रससरसी, रस आणि नायिका भेद, ग्रंथ दशरूपकावरच बेतले आहेत. 13 व्या शताकातील रामचंद्र व गुणचंद्र यांचा नाटयदर्पण ब-याच प्रमाणात दशरूपकाशी संबधं साधून दिसतो.

151

7. धनिक:

धनंजय यांचे छोटे बंधु व विष्णुचे पुत्र, पक्के अभिधावादी व व्यंजनाविरोधक, रस संबंधी भटनायक यांना मानणारे ते शांत रसाला नाटकात स्थान देत नाहीत. 'अवलोक' 'काव्यनिर्णय' या ग्रंथा चे निर्माता.

8. विश्वनाथ:

कार्यकाळ चैदावे शतक महाकवि चंद्रशेखर यांचे पुत्र, साहित्यदर्पणकार विश्वनाथ महापात्र अलंकारशास्त्रातील आचार्य मानल्या जाते. त्यामध्ये नाटयशास्त्रासंबंधी सुध्दा विचारांची छाया त्यांच्यावर दिसते. त्यांनी दहाव्या 'वात्सल्य' रसाची स्थापना केली.

9. रामचंद्र -गुणचन्द्रकृत नाटयदर्पण:

चे रचियता हेमचंद्राचार्य यांचे शिष्य 12 वे शतकात होऊन गेले. नाटयदर्पणमध्ये अनेक प्राचिन काव्य व नाटकाची उदाहरण आहेत. विषाखदेव च्या 'देवीचन्द्रगुप्तम' या महत्वपूर्ण पण अनुपलब्ध नाटकाचा उल्लेख मिळतो.

नाटक हे दृष्यकाव्य रंगमंच संबंधित असून केवळ वाचनासाठी नाही. यवनाच्या आगमनाने भारतातील कलेला धक्के पोहचले, नुकसान झाले पण संस्कृत दृष्यकाव्य असणाÚया रंगमंचाला जास्त हानी पोहचली व हळुहळु रंगमंचाशी संबधी तुटु लागला. नाटयशास्त्र व रसशास्त्र यामध्ये कल्पना 'नवी भावना' नविन विचार ग्रंथ निर्माणच झाले नाही आपण पहिले की 'भारती' नंतर नाटयशास्त्रवरील ग्रंथ भरताच्या नाटयशास्त्रचा संक्षेप आहेत किंवा दशरूपक यांची नक्कल आहेत.

निष्कर्ष:

1. नाटकाची उत्पती ब्रम्हदेवाव्दारा झाली.
2. नाटक हा पंचमवेद आहे.
3. भारतमुनिचे नाटयशास्त्र हा नाटकावरील शास्त्रीय ग्रंथ आहे.

152

4. नाटयतत्वामधील महत्वपूण्र तत्व संवाद आणि अभिनय ही आहेत.
5. नाटकातील संवादाची बीज ऋग्वेदातील सुक्तांमध्ये सापडतात.
6. महाभारत काळामध्ये नाटकाचं सर्वांत जास्त विकसित झालेला रूप दिसून येत.

संदर्भ सुची :

1. भारतीय संस्कृती कोश:- खंड 7
   सं.पा. पं. महादेव शास्त्री जोशी महाराष्ट्र राज्य संस्कृती महामंडळ, पुणे. आ.प.
2. विश्वकोश - खंड - 9. सं.पा. लक्ष्मणशास्त्री जोशी, प. आ.
3. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - अ.ना. देशपांडे.
4. भरतमुनीचे नाट्यशास्त्र.
5. अवीचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- अ.ना. देशपांडे.
6. महाराष्ट्र सारस्वत- वि.ल. भावे.


ISBN: 978-81-926813-0-6
भारतातील शिक्षण प्रणालीवर
कोविड-१९ चा झालेला परिणाम
डॉ. अनिल म. तिरकर
डॉ. वासुदेव द. गोलाईत
OM SAI
PUBLISHERS &
DISTRIBUTORS

अनुक्रमणिका

अ.क्र.	पेपर शिर्षक	लेखक	पेज नं.
	मराठी पेपर		
१.	कोरोना काळातील शैक्षणिक विषमता - प्रखर संकट	डॉ. वर्षा गंगणे	१-६
२.	कोविड-१९ मुळे भारताच्या शिक्षण पध्दतीत झालेले बदल	प्रा. डॉ. अमोल स. राऊत	७-११
३.	कोरोना विषाणुमुळे शैक्षणिक क्षेत्रात झालेले बदल व त्याची समर्पकता	प्रा. गणेश बाबुराव दराडे	१२-१७
४.	कोविड-२०१९ चा भारतातील शिक्षणावर परिणाम	प्रा. जया सवाईथूल	१८-२५
५.	भारतीय शैक्षणिक प्रणालीवर कोविड-१९ या महामारीचा परिणाम - एक अभ्यास	प्रा. राजेंद्र घोरपडे	२६-३१
६.	कोरोनाचा शिक्षणावर परिणाम	प्रा. डॉ. नीता तिवारी	३२-३७
७.	भारतातील महाविद्यालयीन शिक्षणासंदर्भात कोविड-१९ चा प्रभाव	प्रा. डॉ. रोनिल कुलभूषण आहले	३८-४७
८.	कोविड-१९ आणि भारतातील दूरस्थ शैक्षणिक प्रणाली	डॉ. गणेश खेकाळे	४८-५१
९.	शिक्षण प्रणालीवर कोविड-१९ चा परिणाम	दत्तात्रय निवृत्ती रावण	५२-५७
१०.	भारतातील शिक्षण प्रणालीवर कोरोना वाइरसचा प्रभाव	शरद कुलट	५८-६६
११.	भारतातील शिक्षण प्रणालीवर कोविड-१९ चे परिणाम	डॉ. गामा मुकुंदराव सेलोकर	६७-७५
१२.	कोविड-१९ कालीन आभासी शिक्षणाचे मृगजळ	आशिष जयराम मुठे	७६-७९
१३.	कोरोना व्हायरस मुळे प्रभावीत झालेले शैक्षणिक क्षेत्र - एक चिंतन	प्रा. डॉ. विनोद बा. चव्हाण (वाणिज्य विभाग)	८०-८४
१४.	आभासी शिक्षण पध्दती विषयी समज-गैरसमज	डॉ. नितीन ज्ञानदेव चौधरी	८५-९१
१५.	कोविड-१९ चे शिक्षण प्रणालीवर झालेले परिणाम	स्मिता रामेश्वर देवर	९२-९८
१६.	कोरोनाचा भारतीय शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम	डॉ. यशवंत राऊत	९९-१०१
१७.	कोविड-१९ व उच्च शिक्षण	प्रा. डॉ. चारुशिला राजेश्वर रूमाले	१०२-१०७
१८.	भारताच्या शिक्षण व्यवस्थेवर कोविड-१९ चा प्रभाव	प्रा. डॉ. स्वाती दीपक दामोदरे	१०८-११४

कोवीड -१९ व उच्च शिक्षण

प्रा.डॉ. चारूशिला राजेश्वर
श्रीमतीराधादेवीगोयनका
महाविद्यालय,

सारांश

करोना व्हायरस हा विषाणू चा एक गट आहे ह्या व्हायरस मुळे सस्तन प्राण्यांना व
विविध रोग होतात. या विषाणूंचा प्रसार मानवामध्ये श्वसन संसर्गाने होतो हे संसर्ग बऱ्याचवेळ
परंतु कधीकधी प्राणघातक असतात.

कोरोना व्हायरस प्रथम १९६० च्या दशकामध्ये सापडले. सर्वप्रथम कोंबड्यांमध्ये ब्रॉन्क
विषाणू नंतर मानवामध्ये कोरोनाव्हायरस २२ E ई आणि ह्युमन कोरोनाव्हायरस ओसीझ
देण्यात आले होते. २००३ मध्ये सार्स - सीओव्ही, २००४ मध्ये एचकेयु १, २०१२ मध्ये मेर्स - सी
आणि २०१९ मध्ये एसएआरएस-कोव्ही -२ - यामध्ये गंभीर श्वसनमार्गाने संक्रमण होते.

२०२० मध्ये महाराष्ट्र मध्येच नव्हे तर संपूर्ण भारतात व जगामध्ये कोरोनाविषाणू चा
झाला याचे जनजीवनावर फार मोठे परिणाम उमटले राज्यांमध्ये कामाशिवाय सर्वांना घरी बसणे
करण्यात आले.

- कोरोना व्हायरस म्हणजे काय? हा व्हायरस कुठून आला.
- कोरोना व्हायरसची वैशिष्ट्ये कोणती?
- कोरोना व्हायरस ने आपला प्रसार कसा केला?
- कोरोना व्हायरस ची लक्षणे कोणती? कोरोना व्हायरस वर उपचार कोणते? काळजी कशी घ्य
- कोरोना व्हायरसचा उच्चशिक्षणावर झालेला परिणाम
- निष्कर्ष

कोरोना व्हायरस म्हणजे काय?

कोरोना व्हायरसचा आकृतिबंध पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. "हा वायरस कंद आका
पृष्ठभागाच्या अंदाजानुसार मोठ्या लिओफोर्मिक गोलाकार कण आहेत. वायरस कणाचा व्यास
१२० (NM- Nanometer)आहे, विद्युतपरमाणु सूक्ष्म आलेख मधील विषाणूचा लिफाफा विद्युत प
दाट कवच असलेली एक वेगळी जोडी म्हणून दिसून येते."

कोरोना व्हायरस :-

गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम

कोरोना ही विषाणूची प्रजाती आहे जी मानव वटवाघुळ आणि सस्तन प्राणी इ. संसर्ग वाधित करते एक एकाईड पॉझिटिव्ह - सेन्स - सिंगड - स्टोर्डेड RN विषाणू आहे जो ACE - २ रिसेप्टरण वांधून त्याच्या होस्ट सेल मध्ये प्रवेश करतो.हा व्हीटा कोरोना व्हायरस आणि सबजेन्स सरवेकॉरोनाव्हायरस या वंशातील एक सदस्य आहे. (विकिपीडिया)

मानवी कोरोनाव्हायरस स्ट्रॅन्सची लक्षणे.

MERS-CoV, SARS-CoV, SARS-CoV-2,आणि संवंधित रोग

	MERS-CoV	SARS-CoV	SARS-CoV-2
Disease	MERS	सार्स	COVID-19
Outbreaks	2012, 2015, 2018	2002–2004	2019–2020 महामारी

कोरोना व्हायरसच्या संसर्गाची लक्षणे

जून २०१२ मध्ये जेहाद, सौदी अरेबिया, चीन, २०१९ वुहान याची लक्षणे साधारणपणे ताप, खोकला, डायरिया, घशाला सूज, थकवा काही रुग्णांना वेदना अनुनासिक रक्तसंचय, वाहणारे नाक, घसा खवखवणे तर काहींना संसर्ग होऊनही लक्षण दिसत नाहीत व त्यांना बरेही वाटत नाही, तर काही लोक विशेष उपचार न घेता या आजारातून बरी होतात. कोरोना होणाऱ्या प्रत्येक सहा पैकी एक व्यक्ती गंभीर आजारी पडते. श्वास घेण्यास त्रास होतो, वृद्ध लोक, उच्च रक्तदाब, हृदयरोग, मधुमेह, यासारख्याना गंभीर आजार होण्याची संभावना असते.

या व्हायरसवर उपचार कोणते.

- या आजारावर निश्चित असे औषध सध्या उपलब्ध नाही.
- दृष्टोत्पत्तीस आलेल्या लक्षणांवर लाक्षणिक उपाययोजना करतात.
- गंभीर अवस्थेत रुग्णाला जीवनरक्षक प्रणालीवर ठेवण्याची गरज पडू शकते.

२०१९-२०२० वूहान कोरोना व्हायरसचा जगभरात उद्रेक

२०१९ मध्ये कोरोना व्हायरसचा एक उपप्रकार चीनमधील वुहान शहरात आढळून आला. याला कोव्हिड-१९ असे नाव देण्यात आले. सुरुवातीस वुहान व आसपासच्या प्रदेशात पसरलेला हा विषाणू त्याच्या इतर उपप्रकारांपेक्षा अधिक तीव्रतेचा असून याने रोग्यांच्या मरण्याचे प्रमाण मोठे आहे.

१३ मार्च २०२० अखेर जगात १,३२,७५८ जणांना या आजाराची लागण झाली असून एकूण ४९५५ जणांचा मृत्यू झाला आहे. एकूण १२२ देशांमध्ये हा आजार पसरला आहे. चीनमधील हुबै प्रांतात या आजारामुळे सर्वाधिक बळी गेले आहेत. हूबै प्रांतातील वुहान शहरातून या विषाणूची लागण सुरु झाली. या आजारामुळे चीन देशात १३ मार्च २०२० अखेर ३१८० जणांचा बळी गेला असून ८० हजार ९९१ जणांना लागण झाली असल्याचे समोर आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने यासंबंधित माहिती जारी केली आहे.

६ एप्रिल २०२० अखेर जगात एकूण १२,१०,९५६ जणांना या आजाराची लागण झाली असून एकूण ६७,५९४ जणांचा मृत्यू झाला आहे. यापैकी युरोपीय देशांत ४९,४७९ तर अमेरिकेत ९,६८० मृत्यू झालेत.

COVID- १९ कशी काळजी घ्यायची

1. स्वच्छ हात धुवा.
   पाणी आणि साबणाने ४० सेकंद हात धुवा. जर तुम्ही अल्कोहोल असणारे हँड वाँश वापरत असाल तर २० सेकंद
2. हातरुमाल किंवा टिश्यू पेपरचा वापर करा.
   खोकताना किंवा शिंकताना नाकावर आणि तोंडावर रुमाल ठेवा. रुमाल नसेल तर टिश्यू पेपरचा वापर करा. व ताल्काळ बंद कचरापेटीत फेकून द्या.
3. तोंड, नाक चेहरा, डोळे यांना स्पर्श करू नका.
4. कमीत कमी तीन फुटाचे अंतर ठेवा.
5. आंवट चवीच्या फळांचा आहारात समावेश. यामध्ये विटामिन सी चे प्रमाण जास्त असते.
6. सोशल डिसस्टंशिंगचा वापर करा - सामाजिक अंतर राखा.
7. नाक व तोंडाला मास्क लावा.

या जीवघेण्या रोगामुळे संपूर्ण जग स्तब्ध झालं. सर्व बंद ऑफिसेस, शाळा, महाविद्यालय, रेल्वे, बस, विमानसेवा, ट्रान्सपोर्ट, जिल्हाबंदी, विवाह, सामुदायिक कार्यक्रम, धार्मिक स्थळ, अंत्यविधीला मर्यादित संख्या, खरेदी-विक्री सर्व बंदच स्वर फिरणारा मनुष्य घरात बंदिस्त झाला. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या व्यवसाय डबघाईस आले मजुरांची उपासमार झाली डॉक्टर, नर्सेस यांच्या सेवेला तोड नाही पण काहींना आपले जीव गमवावे लागले.तरुण- तरुण डॉक्टर ही करोनाच्या संसर्गाने मृत्युमुखी पडले. असे थैमान करोनाने घातले. अजूनही विस्कळीत झालेले जनजीवन पूर्वस्थितीत आले नाही. त्यावर वेगवेगळी उपाय शोधले गेले शिक्षणाला पर्याय ऑनलाइन शिक्षण पण हे ऑनलाइन शिक्षण सर्वांना कसे झेपणार? त्यावर सुद्धा विविध घटना घडल्या मोबाईल नसल्यामुळे शिक्षण घेता येत नाही. म्हणून आत्महत्या केल्याचीही उदाहरणे वधितली.

१०४

ऑनलाईन शिक्षण सर्वांना कसे क्षेपणार?

प्रत्यक्ष वर्गात बसून घेतले जाणारे शिक्षण ते ऑनलाइन शिक्षण हा एवढा मोठा बदल स्वीकारण्याची मानसिकता आणि क्षमता आपल्याकडच्या पालकांकडे आहे का? हा पहिला प्रश्न सर्वच पालक आपल्या पाल्यांना ऑनलाइन शिक्षण देऊ शकतात का? पालकांना ऑनलाइन शिक्षण परवडणारे आहे का? असे अनेक प्रश्नकोव्हीड -१९ यांच्या टाळेबंदी मुळे सर्वच क्षेत्रां पुढे उभे केले आहेत.इतिहास गणित सायन्स यासारख्या विद्यार्थ्यांना घरच्या घरी शाळा हा पर्याय होऊ शकतो का? त्यासाठी काही धोरणे व उपाय आहेत का? शिक्षकांचे प्रश्न वेगळे व विद्यार्थी पालकांचे प्रश्न वेगळेच.

भारतीय उच्च शिक्षण संस्था करोना व ऑनलाइन शिक्षण

उच्च शिक्षण संस्थांनी खूप कारवगतीने ऑनलाइन एज्युकेशन प्रणालीचा अंगिकार केला. जेव्हा या ऑनलाईन शिक्षणाची गरज होती. तेव्हा उच्च शिक्षण संस्थांची पुरेशी तयारी नव्हती ऑनलाइन एज्युकेशन यासंदर्भात यूजीसीने २०१८ मध्ये ज्या नियमांतर्गत ऑनलाइन शिक्षणाचे उपक्रम चालविण्याकरिता देशातील केवळ सात उच्च शिक्षण संस्थांनी अर्ज केले.

- जानेवारी २०२० पर्यंत ४० हजार शिक्षण संस्थांनी ऑनलाइन अभ्यासक्रम चालवण्याची परवानगी नव्हती.
- बदललेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची तयारी शिक्षण संस्थांची नव्हती हे दिसते.
- देशातील राष्ट्रीय संस्थात्मक श्रेणी रचनेतील(एनआयआरएफ) सर्वोच्च शंभर संस्थांना ऑनलाईन कार्यक्रम चालविण्याची परवानगी मिळेल असे मा. अर्थमंत्र्यांनी जाहीर मे महिन्यात केले मात्र फार मोठ्या विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला.
- स्वयम् व दुरुस्त शिक्षणाचे पर्याय जाहीर केले नियमित पदवी शिक्षणाबरोबर ऑनलाईन मुक्त शिक्षण पद्धतीने दुसरी पद्धती घेण्याचीही परवानगी देण्यात आली पण या सुविधेला खूप उशीर झाला.

ऑनलाइन शिक्षणासाठी पाहिजे तेवढी तयारी अजून पर्यंत नाही.

- उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापकांना ऑनलाईन शिकवण्याचा अनुभव नाही. ते या तंत्राने प्रशिक्षित नाहीत. अभ्यासक्रम ऑनलाईन करण्याकरिता लागणारा ६ ते ९ महिन्याचा कालावधी करोना संकटाने दिलेला नाही.
- ज्या प्राध्यापकांना ऑनलाईन शिक्षणाची कला आत्मसात केली त्यांनी इतर प्राध्यापकांनाही कला शिकविणे गरजेचे आहे.
- सरावाने ही कला आत्मसात करता येईल त्याकरिता तंत्रस्नेही शिक्षण सहाय्यकांची चांगली मदत होऊ शकते. परदेशामध्ये ही पद्धती सरस वापरली जाते.
- आजही ऑनलाइन शिक्षण कमी दर्जाचे वाटते. प्रत्यक्ष शिक्षणाकडे विद्यार्थी-पालक प्राध्यापकांचा ओढा आहे.

१०५

- ऑनलाईन शिक्षणाच्या मोठ्या मंचाच्या यशामुळे ऑनलाईन अभ्यासक्रमाचे तुटके कोणत्याही विद्यापीठ महाविद्यालय पेक्षा या यांच्याकडे विद्यार्थी संख्या कैक पटीने जास्त असते. ऑनलाईन शिक्षणासाठी करोना ही उत्तम संधी चालून आली तिचा उपयोग करणे गरजेचे आहे.

सुविधांचा अभाव

शिक्षण प्रणाली काही गृहितकांवर आधारलेली आहे.

१) विद्यार्थ्यांकडे इंटरनेट, संगणक, लॅपटॉप, स्मार्टफोन यासारखी योग्य उपकरणे उपलब्ध नाहीत टाळेबंदी मुळे ज्या विद्यार्थ्यांनी घर गाठले त्या प्रत्येकाकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध होती का? हा प्रश्नच आहे.

२) NSS च्या सर्वेक्षणातील डेटा पाहिल्यास २४ % कुटुंबांकडे इंटरनेटची सुविधा आहे. बाकीच्यांचे काय? IAMAI च्या आवाजात भारतात ५० कोटी इंटरनेट वापर करते आहेत. त्यातही ६५ % पुरुष आहेत.

३) हैदराबाद ने केलेल्या सर्वेक्षणात ३७ % विद्यार्थ्यांना ऑनलाईन वर्गात बसणे शक्य आले. १० % विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांचे व्याख्यान ऑनलाइन पाहिले. IIC मध्ये १० % विद्यार्थ्यांनी कनेक्टिविटी मधील अडचणी अपुरा डेटा प्लॅन व इतर अडचणीमुळे अभ्यासाचे साहित्य डाउनलोड करता आले नाही व ऑनलाईन शिकता आले नाही.

४) ऑनलाईन शिक्षणामध्ये अनेक अडचणी आहेत इंटरनेट, ब्रोडबंड सुविधा, विजेची उपलब्धता, वर्ग दर्जाची जोडणी, सिग्नल इत्यादी अडचणींना सामोरे जावे लागते.

स्मार्टफोन, लॅपटॉप, टीव्ही, इत्यादीचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. पण या पासून एक ही विद्यार्थी सुविधेपासून वंचित राहिला तर ही पद्धत यशस्वी होणार नाही.

निष्कर्ष

१) करोना विषाणूची साथी दुसऱ्या महायुद्धानंतर चे जगासमोर चे मोठे संकट आहे.

२) या रोगाला अजून प्रतिजैविक न सापडल्यामुळे रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय हा एकच पर्याय आहे.

३) म्हणून लॉकडाऊन चे धोरण अवलंबिणे व त्यातून मार्ग काढणे ही गरज आहे.

४) कष्टकऱ्यांचे तांडे शहराकडून गावाकडे निघाले उपासमारीने मरायचे की करोना मुळे या पेचात हा कष्टकरी वर्ग अडकला आहे.

५) सक्तीच्या रिकामे पणामुळे कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ लागल्या.

६) विद्यार्थी पालक शिक्षक हे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाते का या चिंतेने ग्रासले आहेत.
७) ऑनलाइन शिक्षण ते परीक्षा हा पर्याय अवलंबीला पण पूर्ण यश मिळाले नाही.
८) ऑनलाइन शिक्षण पद्धतीत परिपूर्ण सुधारणा करणे गरजेचे कारण घेतलेल्याऑनलाइन परीक्षेमध्ये सर्वच विद्यार्थी गुण घेऊन उत्तीर्ण झालेत.

संदर्भ :

- विकिपीडिया mr.m.wikipedia.org
- www.bbc.com
- https://www.facebook.com
- https://www.esakal.com
- https://maharashtratimes.onelink.me/wetz/ddo8dgd7

*****

CRITERION III: RESEARCH, INNOVATIONS AND EXTENSION
Metric: 3.3.3- books and chapters in edited volumes/books published



IBSN No. : 978-93-91305-02

43	मराठी समोरील आव्हाने आणि संधी **प्रा. डॉ. चारूशिला राजेश्वर रूमाले**	
44	लोककल्याणाची भाषा: पाली **प्रा. डॉ. राजेश व्ही. चौरपगार**	
	Science & Technology	
45	Evaluation of Antihyperglycemic and Antihyperlipidemic Potential of *Citrus limon* leaf in Alloxan-Induced Diabetic Mice **Ranju Rajput & Krishan Kumar**	
46	Different Types of Lasers and Their Applications **Dr. Rashmi A. Deshpande**	
47	Synthesis, Properties and Application of Graphene **Reecha & Hitesh**	2
48	Innovative eco-friendly approach for green synthesis of zinc oxide nanoparticles using bio-extracts **Nandkishor G. Telkapalliwar**	2
49	Spectrophotometric Analysis - Correlation and Regression to validate Analytical Methods with Practical Example **Pooja Vinod Jagasia**	2
50	Chemistry of Lipids, Fatty Acids and Waxes **Dr. Rita Sangtani**	2
51	Optimization of Physiochemical Parameters for The Production of Protease Using Bacterial Isolates from Abattior Environment **Jeenathunisa.N**	2
52	Costing of Gulabjamun-Mix in Small Scale Industry **Narnaware G.N.& Sonwane R.S.**	2
53	Impact of Globalisation on Indian Goat Milk Production **Mr. Lute Vilas Vitthalrao & Dr. Sonwane R.S.**	2
54	Antibiotic Susceptibility of potential probiotic lactic acid bacteria (LAB) strains (*lactobacillus casei and bifidobacterium*) isolated from raw and fermented camel milk **N.S Malini & Prof. (Dr) Pramod K. Ragav**	3
	Medical & Engineering	
55	An Introduction to The Medicinal Sources and Preparations Used in Homoeopathy **Dr. Tilottama B Galande**	3
56	21st century: Window of Opportunities **Dr. Nana N Shejwal**	3

IBSN No. : 978-93-91305-02-4

मराठी समोरील आव्हाने आणि संधी

प्रा. डॉ. चारूशिला राजेश्वर रूमाले
श्रीमती राधादेवी गोयनका महिला
महाविद्यालय, अकोला.

आज आपण पाहतो सगळीकडे ओरड आहे मराठी भाषेला चांगले दिवस नाही मराठी शिकून काय करणार मराठी शिकणाऱ्याकडे हिणकस दृष्टीने पाहिले जाते. संत ज्ञानेश्वरांनी मराठीला अतिशय उच्च स्तरावर नेऊन ठेवले ही भाषा समाजात रुजविली व इतर संतांनी ती जागविली तर शिवरायांनी ती भाषा परकीय आक्रमणांपासून वाचविली तर साहित्यिकांनी ती भाषा वाढविली त्या भाषेसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आज मराठी भाषिक लोक नोकरीनिमित्त, व्यवसायानिमित्त संपूर्ण विश्वात पसरलेले आहे. जगात दहा कोटी लोकांची मातृभाषा मराठी आहे. आपल्या पूर्वजांनी आपल्याला संस्कृतीतून संपन्न वारसा दिला तो टीकविणे, वाढविणे हे आपल्या पिढीचे काम आहे. भाषा टिकली तर देश टिकतो संस्कृती टिकते आणि संस्कृती टिकली तर प्रगती होते. आज समाज भाषेपासून दुरावतो पण भाषिक अवशेष टिकून ठेवणे ही त्या समाजाची जबाबदारी ठरते. भाषासंवर्धनासाठी प्रयत्न केले जातात का? केवळ मराठी भाषा पधरवडा, मराठी भाषा गौरव दिन साजरा करून तिचा प्रचार-प्रसार शक्य आहे का? हा प्रश्न उपस्थित होतो भाषेच्या प्रसार प्रचारासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. दैनंदिन व्यवहारामध्ये ती भाषा किती प्रमाणात वापरली जाते यावरूनच तिच्या भविष्याचा वेध घेता येतो.

मराठी भाषेचा विचार केल्यास दैनंदिन जीवनामध्ये तिचा वापर वाढवायला हवा तीची सामाजिक प्रतिष्ठा उंचायायला हवी व तीच्या वापरातून व्यवसायाच्या संधी निर्माण व्हायला हव्यात मराठी भाषा रोजगार पुरवण्यात सक्षम आहे पण आपण तिच्याकडे सकारात्मक दृष्टिकोन विचारपूर्वक बघतच नाही. इंग्रजी इतक्या संधी मराठीतून उपलब्ध होतात परंतु आपल्याला या संधी शोधता येत नाहीत व तिचा फायदा उचलता येत नाही मराठीमध्ये व्यवसायाच्या भरपूर संधी आहे मराठीचा सर्रास सगळीकडे वापर व्हायला हवा. बँकांमध्ये, न्यायालयामध्ये मराठी, माहिती तंत्रज्ञानासाठी मराठी, आधुनिक साहित्य- संस्कृती- ज्ञान -विज्ञानाचे माध्यम मराठी, शिक्षण-संशोधनासाठी मराठी, सामाजिक अनौपचारीक क्षेत्रात मराठी जर वापर झाला तर फार प्रचंड व्यवसायाच्या संधी मिळतात व त्या खालील प्रमाणे.

१) उपयोजित मराठी / व्यवहारिक मराठी

कार्यालयीन पत्रव्यवहार, स्वपरिचय पत्र नोकरीसाठी अर्ज लेखन, जाहीर निवेदन, निविदा सुचना लेखन, जाहिरातलेखन, माहिती पत्रक, पत्रिका तसेच इतिवृत्त लेखन, अहवाल लेखन, सारांश, टिपणी लेखन, पत्रव्यवहार यामध्ये भाषिक कौशल्य हस्तगत करावी लागतातच शासन नियमित परिपत्रके यातील परिभाषिक संकलनाचा अभ्यास आव्हानात्मक असला तरी गरजेचा आहे. तसेच व्याकरण, भाषा संशोधन, भाषाशास्त्रीय

IBSN No. : 978-93-91305-02-4

मुलाखत, जाहिरात, वाद विवाद स्पर्धा, पुस्तक प्रकाशन संस्था, विविध कला प्रकाराचे लेखन कीर्तन, भजन, लावणी, भारुड, आणि पोवाडा, गोंधळ तसेच सादरीकरण यासाठी भाषिक कौशल्य आवश्यक आहेत. यातही संधी शोधण्याचा प्रयत्न करावा.

अमरावती विद्यापीठामध्ये मराठी अभ्यास मंडळ बोर्ड ने विद्यार्थ्यांच्या अंगी विविध कौशल्य निर्माण व्हावी अशा प्रकारच्या अभ्यासक्रमाची रचना केली आहे. अगदी बी.ए भाग- १ पासून टप्प्याटप्प्याने कौशल्य पूर्ण अभ्यासक्रम त्यांना अभ्यासवयास दिला आहे. शुद्धलेखनाच्या नियमपासून सुरुवात होते, नंतर मुद्रितशोधन हा पुढचा टप्पा प्रथम इयरला नंतर, कार्यालयीन पत्र व्यवहार व स्व परिचय पत्र व नोकरीसाठी अर्ज लेखन पुढे वक्तृत्व कला व सूत्रसंचालन फायनल ईयर ला माहिती पत्र, निमंत्रण कार्यक्रम पत्रिका, अहवाल लेखन आणि प्रसारमाध्यमांसाठी लेखन असे टप्प्याटप्प्याने विविध कौशल्य त्यांच्याकडून अभ्यासलीत पुढे एम.ए मराठीमध्ये तर फायनल ला स्वतंत्र पेपर उपयोजित मराठीचा दोन सेमिस्टरला ठेवला व सर्व कौशल्य व व्यवसायाच्या संधी त्यातून विद्यार्थ्यांना मिळतील इतका हा अभ्यासक्रम परिपूर्ण आहे. कोशवाडमयच्या लेखनापर्यंत

२) मुद्रित शोधन

भाषा आणि मुद्रा कला यांचा जवळचा संबंध आहे हे अलीकडच्या काळात मुद्रित शोधन आचा व्यवसाय वाढिस लागला आहे. चांगल्या मुद्रण शोधक आची उणीव भासत आहे हा व्यवसाय जोड व्यवसाय म्हणूनही करता येतो व्याकरण व शुद्धलेखनाचे उत्तम ज्ञान, चिकाटी सूक्ष्म वाचन दृष्टी या गुणांचा संगम आवश्यक हा व्यवसाय उदरनिर्वाहचे साधन हे ठरू शकते हे व्यवसायाचे नवे दालन खुले आहे. सद्यस्थितीमध्ये API करिता शोधनिबंध लेख तसेच पीएचडीचे ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके दरवर्षी लिहल्या गेलेली नवनवीन पुस्तके हे सर्व घरबसल्या तपासण्याचे काम आहे. याकडे आव्हानात्मक नवी संधी म्हणून पाहता येते.

३) संवाद कला

यामध्ये साधारणतहा दोन प्रकार आपल्या करिता येथील व्यक्तिगत व सामूहिक

व्यक्तिगत मध्ये - भाषण, संभाषण, सूत्रसंचालन, निवेदन, मुक्तसंवाद, सादरीकरण.

सामूहिक मध्ये - परिसंवाद, चर्चासत्र, कार्यशाळा, शिबिरे, मेळावे, विविध कार्यक्रम या सर्वांसाठी एक उत्तम सूत्रसंचालक लागतो, मोठमोठ्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणे व सर्वांना एका सूत्रांमध्ये बांधून ठेवण्याचे काम हा सूत्रसंचालक करीत असतो, हा व्यवसाय आज-काल अनेक लोक करतात. मोठमोठे सूत्रसंचालनाचे क्लासेस चालतात. उत्तम वक्तृत्व कसे करावे? म्हणूनच म्हणतात बोलणाऱ्याचे चने ही खपतात हासुद्धा एक उत्तम व्यवसाय ठरू शकतो. त्याच्यामध्ये दर्जेदार बहुश्रुत व प्रसंगावधानी, समय सूचक, ताज्या घडामोडींची जाण असणारा, उत्तम देहबोली असणाऱ्या सूत्रसंचालकाची गरज असते.

IBSN No. : 978-93-91305-02-4

४) संवाद कौशल्य

यामध्ये व्यवहारिक, व्यवसायिक, प्रशासकीय, या प्रकारांमध्ये स्टेशनवर, दुकानांमध्ये, डॉक्टर, वकील, पुरोहित, यांच्याकडे संवाद कौशल्य आवश्यक असत. कारण यांना समोरच्या व्यक्तीला आपले म्हणणे पटवून द्यावे लागत आणि त्याकरीता त्यांच्याजवळ उत्तम संवाद कौशल्य असणे गरजेचे असते वेगवेगळ्या ठिकाणी संवाद कौशल्य निर्मितीची क्लासेस चालतात बरेच वकील, डॉक्टर, दलाल, शेअर मार्केटिंग करणारे या क्लासेसमध्ये येऊन संवाद कौशल्याचे धडे घेतात हा सुद्धा एक उत्तम व्यवसाय आहे.

५) संवादक

यांच्यामध्ये मुलाखतकार, सूत्रसंचालक, कीर्तनकार, समुपदेशक, अध्यापक, नट, सूत्रधार यांचा समावेश करता येईल. अध्यापकाला उत्तम संवाद साधता यायला हवा तेव्हाच तो ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकेल. कीर्तनकाराकडे उत्तम संवाद कौशल्य असतेच तो कीर्तन महाविद्यालयांमधून धडे घेऊन आलेला असतो. अध्यापन हा एक प्रतिष्ठित व्यवसाय आहे. त्याकरिता लागणारी अहर्ता प्राप्त केल्यास यामध्ये हमखास यश मिळणारच टीव्हीच्या वेगवेगळे चॅनेल्सवर कीर्तनकारांचा जोरात चालणारा व्यवसाय डोळे दिपवून टाकणारा आहे.

संवाद कला, दूरचित्रवाणीवर असणाऱ्या अनेक विविध वाहिन्यांवर चालणारे असंख्य कार्यक्रम यामध्ये अनेक करिअरच्या वाटा निर्माण झाल्या आहेत. त्यामध्ये बातमी, वृत्तनिवेदन, चर्चा, परिसंवाद, मुलाखत, वृत्तांकन, सूत्रसंचालन, पटकथा लेखन, संवाद लेखन तसेच विविध उत्पन्नाच्या जाहिराती लेखन व सादरीकरण याकडे सुद्धा व्यवसायाच्या संधी भरपूर उपलब्धता म्हणून पाहता येईल.

६) लिखित कौशल्य

प्रगत लेखन कौशल्य, प्रसारमाध्यमे लेखन कौशल्य, प्रशासकीय लेखन कौशल्य, सार्वजनिक माहितीसाठी लेखन कौशल्य, तसेच विविध प्रकारचे लेखन यांचा समावेश करता येईल ही कौशल्य हस्तगत केल्यास त्यामध्ये निपुणता आणल्यास असंख्य व्यवसायाच्या संधी मराठीमध्ये उपलब्ध आहेत. मराठीला मरणच नाही केवळ त्या दृष्टिकोनातून मधून पाहायला हवं.

पत्रकारितेसाठी उत्तम लेखन कौशल्य नभोवाणी वरील विविध चालणारे कार्यक्रम अगदी निवेदना पासून ते दिग्दर्शनापर्यंतचे सर्व टप्प्यांमध्ये व्यवसायाच्या संधी निर्माण आहेत. संवाद लेखन नाट्य लेखन कथालेखन योग्य ती क्षमता निर्माण करून हे क्षेत्र सुद्धा आव्हानात्मक व प्रसिद्धी देणारे आहे.

महाजालावरील माहिती लेखन - विविध विषयावरील माहिती फुलांमध्ये मिळून ती महाजालावर टाकणे सर्वांपर्यंत पोहोचविणे अर्थात यासाठी तुमचे ज्ञान अभ्यास हा सखोल असायलाच हवा आणि संगणकावर आपण काय काय करू शकतो.

IBSN No. : 978-93-91305-02-4

७) संगणक आणि मराठी

हे संगणकीय युग आहे मानवी जीवनाला व्यापले आहे. याला टंकलेखन क्षेत्र खुणावत आहे. वृत्तपत्रे, नियमितकालीके, शैक्षणिक साहित्य, एम.फील, पीएचडी प्रबंधाचे टंकलेखन करण्यासाठी संगणकाचा उपयोग करून हवा तो बदल करता येतो. तसेच महाजालावरील टंकलेखनाची कौशल्य हस्तगत करणे महत्त्वाचे आहे अर्थार्जनाचा हा एक उत्तम स्त्रोत आहे.

संशोधनाला महत्व आल्यामुळे अगदी प्राथमिक शाळे पासून प्रोजेक्ट वर्क अनिवार्य केले असल्यामुळे संगणकाद्वारे ते पूर्ण करवून देवुन बरेच अर्थार्जनाचे मार्ग मिळू शकतात. तसेच माध्यमिक महाविद्यालय स्तरावर सुद्धा याबाबी अनिवार्य आहे. सबमिशन च्या कालावधीत विद्यार्थी मिळेल त्या किंमतीमध्ये प्रोजेक्ट बनवून घेतात. ही एक नमी संधी आहे. विश्लेषणावर भर असतो त्याचबरोबर यामध्ये अक्षरजुळणी पासून ते संपादनात पर्यंतचे विविध कौशल्यही संधी निर्माण करता.

८) MPSC व UPSC परीक्षा

विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सामान्य ज्ञानाच्या पेपर, (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मध्ये (UPSC) केंद्रीय लोकसेवा आयोगा मध्ये मराठी भाषेला महत्त्वाचे स्थान आहे. UPSC मध्ये मुख्य परीक्षा न मध्ये द्वितीय भाषेचा पेपर मराठी म्हणून निवडता येतो व याला ३०० मार्क्स असतात तर MPSC मध्ये पूर्व व मुख्य परीक्षेत निबंध लेखन, उताऱ्यावरील प्रश्न, व्याकरण, वर्णमाला आदी घटकांवर ३०० गुणांचा पेपर असतो यामध्ये मराठी भाषेचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरू शकतो. याचे क्लासेस मोठ्या प्रमाणात व प्रचंड फी आकारून चालवता.

९) चित्रपट व नाट्यसमीक्षा

आज प्रत्येक व्यक्ती या मनोरंजन क्षेत्रात गुंफल्या गेला आहे. त्याचे आवडीचे हे माध्यम आहे. चित्रपट व नाटक हे महत्वपूर्ण क्षेत्र आहे. यामध्ये पटकथा लेखन, संवाद गीत, संगीत, अभिनय, संवादफेक, हे महत्वपूर्ण घटक आहेत यामध्ये प्रतिभाशक्ती व भाषिकक्षमतेची गरज आहे व यातूनच नवनिर्मिती - सृजनशीलता निर्माण होऊ शकते. यातून भरपूर व्यवसायाच्या संधी निर्माण होतात व प्रसिद्धी व पैसा मिळवून देतात. म्हणून चित्रपट व नाटक ही क्षेत्रे व्यवसाय म्हणून महत्त्वाची ठरतीलच हे निर्विवाद आहे.

१०) समीक्षा

समीक्षेचे वेगवेगळे प्रकार हाताळताना प्रतिभा, व्युत्पन्नता आणि अभ्यासाच्या जोरावर सकस साहित्यनिर्मिती घडू शकते. साहित्याची विविध अंगे कविता, कथा, नाटक, कादंबरी, आत्मचरित्र विविध परीक्षणे, चित्रपट व नाट्य समीक्षा, साहित्य समीक्षा, व्याकरण, कौशल्य निर्मिती यातून व्यवसायाच्या या वाटा मिळू शकतात. सृजनशीलता असणाऱ्यांनी आणि हा क्षेत्राचा व्यवसाय म्हणून विचार करावा.

IBSN No. : 978-93-91305-02-4

११) भाषांतर / अनुवाद

जागतिकीकरणामुळे जग जवळ आले आहे आता एका क्लिकवर आपणाला कोणत्याही देशाची सफर करता येते तेथील पर्यावरण संस्कृती कला यांचा अभ्यास करता येतो त्यामुळे ते इतर भागातील साहित्य आपल्या भाषेमध्ये भाषांतरित करून आपल्या लोकांपर्यंत पोहोचविण्याचे एकमेव दालन उपलब्ध झाले आहे अनेक पाश्चात्य लेखकांच्या पुस्तकांची मराठी मध्ये भाषांतर अनुवाद झाला आहे हा हमखास यश मिळवून देणारा व्यवसाय आहे करिता तुम्हाला भाषेची उत्तम जाण व भरपूर शब्दसाठा असायला हवा.

१२) दूरचित्रवाणी

दूरचित्रवाणी व अखंडित चालू असणार्या विविध चित्रवाहिन्या व त्यावर चाललेले असंख्य कार्यक्रम यामध्ये करिअरच्या अनेक वाटा निर्माण झाल्या आहेत. यात वृत्तनिवेदन, चर्चा, परिसंवाद, मुलाखत, वृत्तांकन कार्यक्रम, सूत्रसंचालन, पटकथा लेखन, संवाद लेखन व प्रमुख भाग म्हणजे जाहिरात लेखन व सादरीकरण याकडे सुद्धा व्यवसाय म्हणून पाहता येईल.

एकंदरीत वरील सर्व बाबी लक्षात घेता व्याकरणाचा भाग अगदी MPSC च्या परिक्षेला असतो तसेच गणेश देवी यांनी केलेली भारतीय भाषांचे सर्वेक्षण त्याच धर्तीवर आपण मराठी भाषेचे संशोधन व भाषेचा अभ्यास विविध बोलींचा अभ्यास आदिवासींच्या भाषेचा अभ्यास यातील शब्द, शास्त्र, शब्दकोश, वांङ्मयकोश, परभाषिक शब्द व हरवत चाललेल्या शब्दांचा संग्रह वाक्यप्रचार म्हणी यांचा अभ्यास व नव्याने त्याची मांडणी करता येऊ शकते. काळ बदलला तसे नवे शब्द येऊ लागले त्याचा परिचय या सर्व गोष्टींचा विचार केल्यास ही नवीन अभ्यास किंवा त्याला आपण बेस्ट प्रॅक्टिस म्हणून त्यात तून व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतातच पण करण्याची गरज आहे.

वरील विवेचना मधून खालील निष्कर्ष निघतात

- मराठी भाषेची चिंता करण्याची गरज नाही सर्व आव्हानांना पेलणारी व आपले अस्तित्व शाबुत ठेवण्यास समर्थ भाषा होय.
- व्यवसायाच्या संधी ची उपलब्धता जेवढी इंग्रजी भाषेमध्ये आहे तेवढेच मराठी भाषेमध्ये सुद्धा आहे.
- मराठी पर्यायी शब्दकोश व इंग्रजी पर्यायी शब्दकोश कोणी लिहिला तर मराठी भाषेची सरशी होणार आहे.
- वक्तृत्व, सूत्रसंचालन, मिडिया, अनुवाद दुभाषी, प्रिंट मीडिया, संगणक, चित्रपट, नाट्यक्षेत्र, अध्ययन, मुद्रितशोधन, आकाशवाणी, दूरचित्रवाणी ही कौशल्य आत्मसात केल्यास प्रचंड संधी उपलब्ध आहेत.

IBSN No. : 978-93-91305-02-4

संदर्भ ग्रंथ

१) उपयोजित मराठी - डॉ. ग. णा जोगळेकर कृतज्ञता ग्रंथ सपा. डॉ. केतकी मोडक, संतोष शेणई, सुजाता शेणई - पद्मगंधा प्रकाशन २०१२

२) उपयोजित मराठी - डॉ. संजय लांडे, दिलिपराज प्रकाशन पुणे, २०११

३) उपयोजित मराठी - प्रसारमाध्यमांची कार्यशैली, सपा. संदीप सांगळे, डायमंड पब्लिकेशन पुणे.

४) मराठी भाषा - संचित आणि नव्या दिशा, सपा. विजय कुवळेकर, डी वाय पाटील अभिमत विद्यापीठ पुणे.

५) http://rajyantra.com/r.p=316 पा. अनिल वांझे.

ISBN: 978-81-926813-0-6



१९.	करोना विषाणूचा भारतीय शिक्षण व्यवस्थेवर झालेला परिणाम	प्रा. डॉ. अरुण मुकुंदराव शेळके	१९५-१९९
२०.	ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यां कडून केला जाणारा ई-लर्निगचा वापर व त्यामध्ये येणाऱ्या समस्यांचे अध्ययन	डॉ. लक्ष्मीकांत शिवदास हुरणे	२००-२०६
२१.	कोविड-१९ चा भारतीय शिक्षण प्रणालीवर परिणाम	डॉ. संजय तु. वराडे	२०७-२१०
२२.	कोरोना काळ आणि शैक्षणिक स्थित्यंतरे	स्वप्नील राजेश इंगोले	२११-२१७
२३.	कोविड-१९ मुळे बदलती शिक्षण व्यवस्था व ई-शिक्षण प्रणाली - एक अभ्यास	डॉ. अनिल महादेवराव तिरकर	२१८-२२१
२४.	कोरोनाकाळातील शैक्षणिक विषमता-प्रखर संकट	प्रा. डॉ. साहेबराव चव्हाण	२२२-२२९
२५.	कोरोना विषाणूचा भारतीय शिक्षण व्यवस्थेवर झालेला परिणामाचा अभ्यास	प्रा. डॉ. मंजुषा दिगांबर समर्थ	२३०-२३४
२६.	कोविड-१९ आणि भारतीय शिक्षण व्यवस्था	प्रा. डॉ. चंद्रशेखर बा. कडू	२३५-२३८
२७.	कोरोना काळातील भारतीय कृषी अर्थव्यवस्था व केंद्र सरकारच्या उपाययोजना	प्रा. डॉ. पांडुरंग डांगे	२३९-२७३
२८.	कोरोना व्हायरस (COVID-19) चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, विश्लेषनात्मक अध्ययन	डॉ. राजेंद्र माणिकपुरे	२७७-२८१

हिन्दी पेपर

२९.	भारतीय शिक्षा प्रणाली पर कोविड -19 महामारी का प्रभाव एक अध्ययन	डॉ. सुनील बोरचाटे	१८२-१८६
३०.	कोविड-19 और भारतीय ग्रामीण अर्थ तन्त्र	डॉ. विमलेश कुमार पाण्डेय	१८७-१९४
३१.	कोरोना का शिक्षा पर असर	डॉ. सविता वै. रूक्के	१९५-१९७
३२.	भारत मे कोरोना का शिक्षा पर प्रभाव	डॉ. फरहाना आझमी मोहम्मद सादीक शैख	१९८-२००

२२

कोरोना काळ आणि शैक्षणिक स्थित्यंतरे

स्वप्नील राजेश इंगोले,
सहायक प्राध्यापक,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

प्रस्तावना :

कोव्हिड १९ या विषाणूने उदभवलेल्या 'कोरोना' या आजाराने संपूर्ण जगभर भयावह आणि भीषण अशी परिस्थिती निर्माण केली आहे. याचे परिणाम संपूर्ण विश्वच अत्यंत दीडमूड होऊन भोगताना दिसत आहे. कोरोना काळातील विश्व अगदी काही दिवस ठप्प झाल्यासारखे होते. ज्यामध्ये लागलेल्या टाळेबंदी किंवा जनसंचार बंदी यामुळे बहुतांश देशांचे सर्वच व्यवहार, सामाजिक ,सांस्कृतिक ,आर्थिक ,व्यापार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शैक्षणिक उपक्रम बंद असलेले पाहायला मिळतात .ज्याप्रमाणे उद्याच्या अन्नधान्याचा प्रश्न यांच्याशी भिडायचे असेल तर त्याची पूर्वतयारी आजच करणे अगत्याचे असते. त्याचप्रमाणे तुम्हाला तुमच्या देशाच्या उत्तम मनुष्यबळ याविषयी आणि भविष्याविषयी चिंता असेल तर त्या देशातील विद्यार्थी आणि शिक्षण व्यवस्था यांची सोय घेणे, निगा राखणे आणि काळजी घेणे आजच अगत्याचे ठरते. मात्र कोरोना काळातील टाळेबंदीमुळे झालेल्या व्यवहारांनी सर्वच बाबतीत शैक्षणिक उपक्रम अध्यापन आदि बाबी ठप्प झाल्या होत्या.

कोरोना पूर्व शिक्षण पद्धती :

संपूर्ण जगभर कोरोना पसरवण्याच्या आधी शिक्षण व्यवस्था काय होती याचा मागवा किंवा अंदाज घेऊ जाता तो वैश्विक विचार होईल मात्र भारताच्या शिक्षण पद्धती विषयी विचार करताना कोरोना आधीची शिक्षणपद्धती अत्यंत कालसुसंगत आणि व्यवसायाभिमुख होती किंवा विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे करणारी, त्यांना स्वतःच्या 'भाकरीसाठी' सशक्त बनवणारी होती असे म्हणता येणार नाही .या शिक्षणपद्धतीने विद्यार्थ्यांच्या हातामध्ये पदव्या दिल्या मात्र त्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानाचे काय ? आणि त्यातीलच भाकरी चे प्रश्न सोडवण्याच्या सामर्थ्याचे काय ?हा प्रश्न कायमच राहतो .हा एकंदरीतच शिक्षण व्यवस्थेच्या रचनेविषयी आणि मूलभूत सिद्धांतांवर बोट ठेवणारा प्रश्न आहे. हा प्रश्न केवळ कोरोनामुळेच उभा झाला असे नाही. तर त्याचेअधोरेखन हे कोरणा काळाने केले आहे, हे सांगणे

महत्त्वाचे आहे .कोरोना पूर्व परिस्थिती अशी होती आणि कोरोना नंतर परिस्थिती काही वेगळी असेल असे नाही.कोरोना नंतर तर परिस्थिती त्याहूनही अधिक भयावह किंवहुना नवीन पर्यायाने, नवीनच समस्या निर्माण केलेल्या आपल्याला पाहायला मिळतात.

कोरोनाकाळातील शिक्षण पद्धती :

भारतामध्ये कोरोनाचा शिरकाव झाल्यानंतर त्यावरील प्रभावी अंमलबजावणी म्हणून टाळेबंदी किंवा जनसंचारबंदी पुकारण्यात आली. त्याद्वारे शाळा, महाविद्यालय सुद्धा बंद करण्यात आली. ज्याच्या माध्यमातून कोरोनाचा अधिक प्रसार होऊ शकतो अशी शक्यता सर्वांनाच वाटत होती. आणि ते बहुतांश खरे सुद्धा होते. त्या वेळेत नेमके काही सत्र पद्धतींच्या परीक्षा संपून पुढील सत्राच्या अभ्यासक्रमांची सुरुवात झाली होती. तर काही पूर्व सत्राच्या परीक्षा आल्या होत्या. अशा महत्त्वाच्या वेळी आणि शैक्षणिक सत्र भरात असताना टाळेबंदी लागल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या आणि याद्वारे शिक्षण पद्धतीने नविनच वळण घेतले. ते म्हणजे 'ऑनलाइन शिक्षण' . यामध्ये ऑनलाइन शिक्षणासाठी वेगवेगळे पर्याय वापरण्याचे शिक्षण विभागाच्या कडून सुचवण्यात आले होते .जसे गुगल मीट , झूम , गुगल फॉर्म ,यूट्यूब आदी अत्याधुनिक उपकरणे आणि ऍप्लिकेशन्स वापरुन शिक्षणाला न थांबवता, त्यामध्ये सातत्य राखून पुढे नेण्याचे आव्हान त्याद्वारे करण्यात आले होते .मात्र त्यामधील प्रत्यक्ष अनुभवांचा विचार केल्यानंतर, पृष्ठभूमीवर जाऊन विचार केल्यानंतर विविध समस्या आपल्याला निर्माण झालेल्या पाहायला मिळतात.

शिक्षणपद्धती मधील 'कोरोना'ने उघड केलेल्या काही वावी:

भारतामध्ये अनेक शैक्षणिक सुधारणांसाठी आयोग नेमण्यात आले आणि त्याद्वारे निर्माण झालेल्या शिक्षणपद्धतीचा जो आकृतीवंध आहे 'दहा अधिक दोन अधिक तीन अधिक दोन 'हा आकृतिबंध आणि त्यामध्ये दोन दशक जाऊनही न झालेले वदल यामुळे शिक्षण पद्धती ही 'पारंपरिकरीतीने'चालत आलेली होती .मात्र या कोरोना काळाने शिक्षण क्षेत्रातील काही वावी उघड केल्या.

आर्थिक वावी:

जेव्हा विद्यार्थ्यांना यांचा अभ्यासक्रम मागे राहू नये किंवा स्थगित राहू नये म्हणून त्यांना ऑनलाईन शिक्षणाची सुविधा आपण केली पाहिजे आणि विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी ऑनलाईन अध्ययन आणि अध्यापन यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे सुचविण्यात आले .मात्र त्यामध्ये आर्थिक बाबी आपल्याला मोठ्या प्रमाणात विवंचनेत टाकणाऱ्या होत्या .यामध्ये ग्रामीण भागातील, आदिवासी

भागातील किंवा गरीब विद्यार्थ्यांकडे ही आधुनिक तंत्रज्ञान आणि त्यासाठी आवश्यक उपकरणे उपलब्ध नाहीत, असे जाणवले. त्याद्वारे शिक्षणामधील गरीब-श्रीमंत, सामान्य,अतिसामान्य ,मध्यमवर्गीय आदी बाबी कोरोनाकालीन शिक्षण पद्धतीने प्रकर्षाने अधोरेखित केल्या ,असे आपल्याला पाहावयास मिळते .

सामाजिक :

कोरोनाकाळातील शिक्षण देण्यासाठी ज्या साधनांचा,ज्या उपकरणांचा वापर करावयाचा होता ते काही विद्यार्थ्यांकडे उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यांना स्वतःच्या अस्तित्वाची, स्वतःच्या परिस्थितीची आणि एकंदरीत आपल्या कौटुंबिक परिस्थितीची काहींना अत्यंत लाज वाटायला लागली तर काहींकडे सर्व सुख सुविधा उपलब्ध आहेत म्हणून अहंगंड निर्माण झालेला दिसतो. म्हणजेच या अतिसंवेदनशील वयामध्ये न्यूनगंड आणि अहंगंड यांच्यामध्ये हे विद्यार्थ्यांची मानसिकता खेळत होती . ही सामाजिक विषमता पुन्हा एकदा कोरोनाकाळातील शिक्षणपद्धतीने अधोरेखित केली आहे.

राजकीय

कोरोना काळातील अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर त्या अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा घ्याव्या की त्या विद्यार्थ्यांना ,त्या देत असलेल्या अंतिम वर्षाच्या पदवी परीक्षांमध्ये उत्तीर्ण करून त्यांना थेट पदव्यांचे वितरण करावे. याबाबतीत विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये राजकीय तीढा निर्माण झालेला होता आणि या राजकारणामध्ये परीक्षा होतील ,न होतील ,होतील तर कशा पद्धतीने? आणि यामध्ये पडून सर्वोच्च न्यायालयाने जो काही निवाडा केला त्यामध्ये सांगण्यात आले होते कि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेशिवाय पदवी देता येणार नाही .परीक्षा केव्हा होणार? निश्चितव्ह झाल्या तर त्याच्या पद्धती ऑनलाइन की ऑफलाइन यामध्ये राज्य सरकारे आणि विद्यापीठे यांच्या मध्ये सुद्धा वेगवेगळ्या पद्धती दिसायला लागल्या .त्यामुळे परीक्षेच्या संदर्भात अनेक राज्य सरकारची परीक्षा आणि कसोटी लागलेली दिसते.

कोरोना आणि त्याने प्रभावित केलेले शिक्षण व्यवस्थेतील विविध घटक :

कोरोना आणि त्याने प्रभावित केले शिक्षण व्यवस्थेतील विविध घटक असे म्हणत असताना कोरोना नियंत्रणासाठी, उपाययोजनांसाठी केले गेलेले प्रयत्न यांचा प्रभाव प्रामुख्याने शिक्षण व्यवस्थेवर पडलेला पहावयास मिळतो. उदाहरणार्थ टाळेबंदी असेल ज्याद्वारे भौतिक दृष्ट्या सर्वच शैक्षणिक उपक्रम बंद होते. टाळेबंदी मध्ये महाविद्यालय, खाजगी शिकवणी आदी सर्वच बंद असल्यामुळे अभ्यासक्रम आणि अध्यापन या वर काय परिणाम झाला हे सुद्धा पाहणे गरजेचे ठरते.

अभ्यासक्रम आणि अध्यापन :

कोरोनावरील प्रभावी उपाय म्हणून टाळेबंदी हा उपाय केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी स्वीकारल्यानंतर देशातील आणि संपूर्ण राज्यातील शाळा महाविद्यालय बंद होती. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे आणि अध्यापनाचे आव्हान सर्व शिक्षणतज्ञापुढे होते. या आव्हानाला तोंड देण्यासाठी ऑनलाइन शिक्षण हा पर्याय सुचवण्यात आला आणि तो स्वीकारण्यात आला .त्यासाठी गुगल मीट, झूम, युट्युब अमेस इत्यादी बाबींचा आणि उपकरणांचा समावेश यामध्ये करण्यात आला मात्र प्रत्यक्ष वर्गातील अध्यापनाप्रति असणारे विध्यार्थ्यांमधील औत्सुक्य आणि अध्यापनानंतरचे समाधान आहे ते त्याद्वारे मिळत नाही. असे शिक्षकांना जाणवले. आणि अभ्यासक्रमही हा एकतर्फी शिकवला जातो आहे .मात्र विद्यार्थ्यांनी तो व्यवस्थित आत्मसात केला आहे का ?,व्यवस्थित अभ्यासला आहे का?, विद्यार्थ्यांना त्याचे आकलन झाले आहे का? याची साधी दखलही शिक्षकांना ऑनलाईन माध्यमातून घेता येत नसल्यामुळे शिक्षणातील संवादाचा सेतू कोलमडलेला पाहायला मिळतो.

शाळा आणि महाविद्यालये:

मोठ्या शहरातील कोरोना आजाराने बाधित असलेल्या रुग्णांची संख्या लक्षात घेता शाळा आणि महाविद्यालय यांना उपचार केंद्र म्हणून बऱ्याचश्या स्थानिक पातळयांवरील प्रशासनाने शाळा-महाविद्यालयांच्या उपचार केंद्र म्हणून वापर केला होता. त्यामुळे शाळा ,महाविद्यालये जवळ जवळ आठ महिने बंद असलेली पाहायला मिळतात .त्यामधील शिक्षणविषयक व्यवहार थांबून त्याला दवाखान्याचे किंवा एखाद्या प्रशस्त रुग्णालयाचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामधील शिक्षण विषयक घडामोडी थांबून तिथे आरोग्यविषयक औषचार चालू झालेले पाहायला मिळतात .

विद्यार्थी आणि पालक

विद्यार्थी आणि पालकांमध्ये कोरोनामुळे एक वेगळ्या प्रकारचा न्यूनगंड आणि भययुक्त वातावरण निर्माण केले होते असे जाणवते. अध्यापनासाठी जेव्हा ऑनलाईन पद्धत स्वीकारली गेली तेव्हा बऱ्याच या विद्यार्थ्यांमध्ये साधनांचा अभाव जाणवत होता आणि हे तंत्रज्ञान नवीन असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्याबाबतीत उत्सुकता आणि आपल्याकडे असावी अशी अपेक्षा होती .पण विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील आदिवासी भागातील आणि गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन तासिकांचे धडे पोहोचत नसल्यामुळे त्यांना स्वतःच्या आर्थिकते विषयी, सामाजिकते विषयी न्यूनगंड जाणवत होता. यातूनच चार-पाच विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटना ही समोर आलेल्या आपल्याला दिसल्या.

आज महात्मा फुले यांच्या जन्माला १९३ वर्षे पूर्ण होत आहे पण त्यांनी वर मांडलेले प्रश्न पूर्णांशाने सुटलेले नाहीत. आज शोषणाचे प्रकार बदलले आहेत. काही बाबतीत शोषणकर्ते बदलले आहेत पण शोषण मात्र कायम आहे. शेतकऱ्यांची विशेषता कोरडवाहू शेतकऱ्यांची परिस्थिती अजूनही महात्मा फुले लिहितात त्याप्रमाणे 'ताक कन्या पोटभरी धन्य म्हणे संसारी' अशीच आहे. त्यामुळे आज पुन्हा फुले यांच्या विचारांकडे जाणे गरजेचे बनले आहे. आजच्या शेतकरी चळवळीचा कार्यक्रम आता आपणास फुले विचारांचा मागोवा घेत ठरवावा लागतो आहे यात त्या विचारांचे क्रांतिकारकत्व दडलेले आहे. शेतकरी चळवळीची प्रत्यक्ष कृती सुरुवातीच्या काळात जोतिरावांचे लक्ष शिक्षण व समाज सुधारणेकडे लागलेले होते पुढे त्यांनी दगड पुरविण्याचे कंत्राट घेतले आणि त्यावेळी त्यांना शेतकरी व कामगार यांच्या शोषणाची व सरकारी नोकर आणि युरोपीय अधिकारी यांची खरीखुरी माहिती झाली. इंजिनिअरिंग खात्यातील भ्रष्टाचार त्यांच्या लक्षात आला त्यानंतर व त्यत्यापूर्वीही ज्योतिरावांनी या विषयावर लिखाण करावयास सुरुवात केली. सत्यशोधक समाज' स्थापन झाल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न महत्त्वाचा समजून त्या विषयावर व्याख्याने द्यावयास सुरुवात केली. सत्यशोधक समाजातर्फे भरविण्यात आलेल्या सभेत 'स्वदेशी म्हणविणाऱ्या राजापेक्षा परदेशी राजाकडून कालव्या यासंबंधीचे शूद्र लोकांचा किती फायदा झाला' या विषयावर निबंध वाचला. त्यानंतर 'सतत दुष्काळ का पडतात 'शूद्र त्यात बळी का पडतात? दुष्काळ टाळण्यासाठी उपाय काय योजावे? या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. १८७७ साली दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी 'बालाश्रम' काढण्यात आला.

खडकवासला कालवा झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात शेतकरी पाण्याचा व्यवस्थित वापर करीत नव्हते पण त्यांना शेती कशी करावी हे समजावून सांगण्यासाठी त्या भागात स्वतः जोतीरावांनी जमीन घेतली नव्या पद्धतीने शेती करून दाखवली. १८८३ साली त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ लिहिला या ग्रंथाची काही प्रकरणे त्यांनी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांना वाचून दाखविली महाराजांनी तो ग्रंथ लक्षपूर्वक ऐकला. सार्वजनिक सभा खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची हित साधू शकत नाही म्हणून त्यांनी' दीनबंधू सार्वजनिक सभा 'स्थापन केली. शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी ज्योतिरावांनी गावोगावी सभा घ्यावयास सुरुवात केली. ते खेडोपाडी जाऊन सभा घेत होते. साधासुधा शेतकरी हा सत्यशोधक समाजाचा कार्यकर्ता होता. या सभा साठी एखाद्या देवळाचा मंडप किंवा शेतकऱ्यांच्या शेतीतील मांडणीची जागाही चालत असे. १८८२ साली ज्योतिरावांनी मुंबई 'हिंदी शेतकऱ्यांची स्थिती' या विषयावर व्याख्यान दिले. या व्याख्यानाला सुमारे चार हजार लोक उपस्थित होते या काळात शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथाचे गावोगावी सार्वजनिक वाचन झाले. ज्योतिरावांचे विचार गावोगावी पसरू लागला. ओतूर या गावी भाऊ कोंडाजी पाटील यांनी फुले यांना बोलवले. तेथे त्यांची भाषणे झाली. त्यांची भाषणे ऐकावयास शेकडो लोक जमू लागले. जुन्नर व आसपासच्या भागातही त्यांनी प्रचाराचा धडाका उडवला .शेतकऱ्याचे दैन्य, त्यांच्या विद्येच्या क्षेत्रातील मागासलेपण, त्यांची धार्मिक व सांस्कृतिक गुलामगिरी आणि समाजावर असणारे ब्राह्मणांचे सर्वांकष वर्चस्व यावर त्यांनी टीकेची झोड उठवली. या सर्व चळवळीचा परिणाम म्हणून १८८५ साली जुन्नर भागात शेतकऱ्यांचा मोठा उठाव झाला. त्यांनी सरकारकडे निवेदन देऊन अशी मागणी केली की सावकार व जमीनदार यापासून आपणास संरक्षण मिळावे कारण सावकार, जमीनदार, वकील, न्यायाधीश ही मंडळी एका जातीतील होती. त्यांच्या एकजुटीमुळे व कारवायांमुळे कुणब्याचे जिणे हराम झाले होते. त्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांनी बहिष्काराचा मार्ग स्वीकारला. एक वर्ष त्यांनी सावकारांच्या व जमीनदाराच्या जमिनी कसा वयास नकार दिला. सरकारकडे त्यांनी तक्रार निवारण करण्याची मागणी केली. चार पाच हजार शेतकऱ्यांच्या सह्यांचा अर्ज सरकारकडे पाठविण्यात आला. ज्योतिरावांनी यामध्ये पुढाकार घेतला. या बहिष्कारामुळे शेवटी शेतकरी, सावकार, जमीनदार व सरकार यांच्यात तडजोड झाली. व्याजाचा व जमिनीच्या लागवडीचा दर कमी करण्यात आला.

सत्यशोधक समाजाचा विचार सगळीकडे पसरू लागला. ब्राह्मणेतर समाजातील डॉक्टर घोले, डॉक्टर लाड ,मस्के यांच्यासारखे लोक ज्योतिरावांना पाठिंबा देऊ लागले. १८८४ साली ज्योतिराव बडोद्याला गेले. तेथे त्यांनी 'शेती सुधारणा' या विषयावर व्याख्याने दिली .त्यांनी सयाजीरावांचा उद्देशून पत्र लिहून सांगितले की, शूद्रांना ब्राह्मणांनी विद्या पासून वंचित करून त्यांची दीनवाणी अवस्था केली आहे, म्हणून शूद्रांना विद्या द्या. भटांना हाकलून

लावा. अक्षर शून्य शूद्रांच्या दयानिधी वा' अशी त्यांनी सयाजी रावांना विनंती केली. या पत्राचा महाराजावर प्रभाव पडला आणि संस्थानातील ब्राह्मणांना मोफत खिचडी देण्याची प्रथा त्यांनी बंद केली. हरी रावजी चिपळूणकर यांनी ड्यूक ऑफ कॅनॉट ला मेजवानीसाठी आमंत्रित केले. ज्योतिरावांना त्याचे निमंत्रण होते. या समारंभात ते शेतकऱ्याच्या वेशात आले. त्यांनी शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची माहिती दिली. ज्योतिरावांचे सहकारी भालेकर यांनी आपल्या दीनमित्र' या पत्रात एक व्यंगचित्र प्रकाशित केले होते. या चित्रात राष्ट्रीय गाडा मराठे, माळी ,कुणबी महार, मांग, भिल्ल ओढत आहे. त्यात यूरोपीय व ब्राम्हणादी लोक बसलेले आहेत. वाट ऊंचवट्यांची असुनही आत बसलेले खाली उतरत नाहीत. युरोपीयाशी जास्त जागा मिळावी म्हणून ब्राम्हण पारशी भांडत आहे. पण गाडा ओढणाऱ्या लोकास पोटभर अन्न नाही. त्यांची दुर्दशा या चित्रात दाखवली होती.

ज्योतिराव फुले यांनी कष्टकरी, शेतकरी यांचा प्रश्न जगासमोर मांडला. त्यांना विद्या मिळावी, ज्ञान मिळावे हे त्यांना कष्टा प्रमाणे पोटभर खायला मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शेतकऱ्यांचे सर्वांगीण शोषण कशा प्रकारे होत आहे त्या शोषणातून त्यांची मुक्ती कोणत्या मार्गाने होईल या बाबतीत यांनी आपले विचार मांडले. शेतकरी प्रश्नांविषयीचे विचार महात्मा जोतीराव फुले यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच तपासला नाही, त्यांच्या हे लक्षात आले होते की शेतकऱ्यांना जर स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर त्या प्रश्नाच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक बाजूही आपण तपासले पाहिजे कारण तो वर्ग ब्राह्मणांनी सर्व बाजूंनी शोषीला आणि नाडलेला आहे .शेतकऱ्यांना जोपर्यंत आत्म स्थितीचे खरेखुरे ज्ञान होत नाही, आपण कोण आहोत हे जोपर्यंत त्याच्या पूर्णपणे लक्षात येत नाही तोपर्यंत त्यांचे शोषण चालूच राहणार आहे म्हणून जोतिरावांनी शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला.

महात्मा फुले यांची ध्येय दृष्टी-

महात्मा फुले यांची दिव्यदृष्टी शासन व शोषण यापासून मुक्त असे बळीचे राज्य स्थापन करण्याची होती. त्यास कधी कधी ते निर्मिका चे राज्य असेही म्हणतात .निर्मितीचे राज्य तेव्हाच स्थापन होईल जेव्हा सर्वांना न्यायाने व समानतेने वागवणारी सर्वधर्मसहिष्णुता व सर्वधर्म समावेशक, विश्व कुटुंबात्मक अशी कष्टकऱ्यांची आदर्श समाज रचना स्थापन करण्यात येईल. त्यामध्ये प्रत्येक जण बंधुभावाने राहील. प्रत्येक जण वस्तूंचा श्रमा प्रमाणे उपभोग घेईल. प्रत्येक जण सत्य धर्माप्रमाणे वागेल. या राज्यात पोलिस, शिपाई, न्यायाधीश व तुरुंग यांना फारसे स्थान असणार नाही.

शेतकऱ्याचे धार्मिक शोषण :

शेतकऱ्याचा आसूड' आणि 'ब्राह्मणांचे कसब' या दोन्ही ग्रंथात जोतिरावांनी शेतकऱ्यांचे धार्मिक शोषण कसे करतात याचे मोठे मार्मिक विवेचन केले आहे. मुळात शेतकरी

हा धार्मिक वृत्तीचा .त्याच्या धार्मिक वृत्तीत अंधश्रद्धा दडलेली. या अंधश्रद्धेचा व देवभोळेपणा चा उपयोग करून ब्राह्मणांनी त्यांच्यामागे वेगवेगळ्या प्रथांचे, विधीचे शुक्लकाष्ट लावून दिले आहे. या सर्व व्रतांचा आणि विधीचा मुख्य उद्देश म्हणजे गरीब शुद्राकडून दक्षिणा लुबाडून घेणे आहे .रोख दक्षिणा, धान्य, सुपारी, बदाम, कपडे इत्यादी अनेक बाबी शूद्र शेतकऱ्याकडून धर्माच्या नावाने ब्राह्मण लुबाडतात.ब्राह्मण खास विधी करून व विविध सणाच्या मुहूर्तावर शेतकऱ्यास सातत्याने लुबाडतात. शूद्रांच्या मृत्यूनंतरही भट शेतकऱ्याच्या पाठीमागे असतो. तो त्याच्या मुलास अनेक विधी करावयास लावतो या सर्वांमधून शेतकऱ्याचे धार्मिक शोषण होते.

सांस्कृतिक शोषण-

धार्मिक शोषणापासून शेतकऱ्यांचे सांस्कृतिक शोषण होते कारण त्यांचे धार्मिक शोषण त्यांच्या अज्ञानामुळे होते म्हणून त्यांनी आत्मस्थिती ओळखावे, आपले अधिकार ओळखावे कारण मानव अधिकार सर्वांना निसर्गाचाच मिळालेले आहे. त्यांचा उपभोग घ्यावा. शूद्रांच्या गुलामगिरीचे मुख्य कारण म्हणजे अज्ञान. विद्या बंदीमुळे शूद्र अज्ञानी राहिले. 'शेतकऱ्याचा आसुड' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत फुले लिहितात-

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले,इतके अनर्थ एका अविद्येने केले।।"

या अविद्येने ब्राह्मणांचे सांस्कृतिक वर्चस्व तयार झाले. शेतकऱ्यांचे सांस्कृतिक गुलामगिरीतून सुटका करायची असेल तर त्यांना आधुनिक शिक्षण दिले पाहिजे.

सावकारांनी केलेले शोषण :

शेतकऱ्याचा भरणा, बी-बियाणे यासाठी लागणारे भांडवल, लग्नाआधी धार्मिक विधीतील खर्च, बैल बारदाना यांची खरेदी यासाठी शेतकऱ्यांना नड पडली की ते गुजर मारवाडी ब्राह्मण सावकाराकडून व्याजाने कर्ज घेत असत. शूद्र शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा व देवभोळेपणा चा फायदा घेऊन हे सावकार शेतजमिनीवर चा माल हडप करीत होते. पुढे त्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन दामदुपटीने व्याज गहाणवट केलेल्या जमिनीवर ते आपला कब्जा बसवीत. जोतीरावांच्या लिखाणातून शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा व त्याच्या सावकाराकडून होणाऱ्या शोषण याचा सातत्याने उल्लेख होतो.

नोकरशाहीने केलेली पिळवणूक :

सावकारांची पिळवणूक शेतकऱ्याचे जीवन हराम करून टाकते .त्याचप्रमाणे सावकाराची हातमिळवणी करून ब्राह्मण नोकरशाही सर्वांगाने शेतकऱ्यांची पिळवणूक करते. त्या काळात भारतात दोन प्रकारची नोकरशाही होती. एक युरोपियन नोकरशाही आणि दुसरी एतद्देशीय नोकरशाही. महात्मा फुलेंच्या मते इंग्रज अधिकारी लठ्ठ पगार घेऊन ऐषारामात राहतात आपल्या

कर्तव्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे भट कामगाराचे फावते. ते शूद्रांच्या अज्ञानाचा आणि अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडतात. फुल्यांच्या मते खेडेगावातील कुलकर्णी शेतकऱ्यांवर अन्याय करतो त्यांच्या मालकी पत्रात लाच खाऊन फेरफार करतो. अज्ञानी शेतकऱ्यास थोडी रक्कम कर्जाऊ देऊन त्याची जमीन लाटण्याचा उद्योग सतत करीत असतो. म्हणून संतापाने महात्मा फुले त्यास 'कलम कसाई' व 'ग्राम राक्षस' म्हणून संबोधतात.

साम्राज्यशाही ची पिळवणूक :

जोतीरावांचे असे मत होते की ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून शेतकऱ्यांना सोडवणारे इंग्रज सरकार तसे शेतकऱ्यांचे तारणहार आहे. भारतातील राणीची सत्ता जागृत नाही म्हणून अन्याय होतो आहे. सरकारी धोरणे शेतकऱ्यांच्या विरोधी आहे. जोतीरावांच्या मते शेतकऱ्यांवरील सारा दर तीस वर्षांनी कोणतीही सुधारणा न करता वाढविण्याचे सरकारचे धोरण अन्यायकारक आहे. कारण केवळ शेतसारा देण्यासाठी त्यास कर्ज काढावे लागते. सरकारने आपल्या अधिकाऱ्यांना मोठे पगार व पेन्शनी देण्यासाठी शेत साऱ्याचे दर वाढवले. गरीब शेतकऱ्याच्या गाड्ग्या मडक्यातून हा सारा वसूल केला. रात्रंदिवस शेतीत राबणारा शेतकऱ्यावर हा सारा कमी होता की काय म्हणून लोकल फंड नावाचा नवा कर त्यांच्यावर लादला. त्याशिवाय आपले धान्य व माडवे विकण्यास शेतकरी जात असताना दर सहा महिन्याला जकातीचे नाके बसून त्यांनी जकात वसूल करावयास सुरुवात केली. त्याचप्रमाणे अकारण सरकारने मिठावर ही कर लादला. बाजारातील दगेबाज दलाल, म्युन्सीपालटीचे लुटारू जकात अधिकारी यांच्यापासून या शेतकऱ्यांची काही सुटका होत नाही. सरकारने जंगल खाते निर्माण करून जंगलाच्या सर्व जमिनी आपल्या घशात घातल्या. विपत्ति च्या काळात शेतकरी आणि त्यांची जनावरे जंगलाच्या संपत्तीची जपणूक करून कसाबसा जंगलाच्या आधारावर दिवस काढीत असे .पण आता तेही शक्य झालेले नाही. गायरान जमिनी सावकारांच्या घशात गेल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्यांचे उत्पन्न घटले. भारतातील शेतकऱ्यांवर शेतसारा व इतर पट्ट्या लावून त्यांची लूट करणे, देशभर दुष्काळ असताना अन्नधान्य व कच्च्या मालाची निर्यात करणे पक्का माल आयात करून येथील कारागीर कंगाल करणे, जंगल खाते सुरू करून शेतकऱ्यांची नाकेबंदी करणे, विलायती सावकाराकडून कर्ज घेऊन त्यांना भरमसाठ व्याज देणे, युरोपियन कामगारांना भरमसाठ पगार व पेन्शन देणे आणि गोऱ्या सोजीरास आरामात ठेवणे. तो आरामाने लाल जागर पडला आहे तर शेतकरी भुकेकंगाल बनला आहे. सरकार लष्करावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहे हेसुद्धा म. फुल्यांनी लोकांना सांगितले शेतकऱ्यांची पिळवणूक धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अंगाने होत आहे. त्या पिळवणूकी वरचा मुख्य उपाय म्हणजे शेतकऱ्याची मानसिक गुलामी नष्ट करणे आहे जोतिरावांनी सरकारला शेतकऱ्याची काळजी घेण्यास सांगितले आहे. कारण शेतकरी अज्ञानी

आहेत तो वाममार्गाने जाऊ शकतो त्याला दारूचे व्यसन लागू शकते, त्याने गैरशिस्त वागू नये ,शेतकऱ्यांनी एकापेक्षा जास्त बायका करू नयेत, मुलांची लग्न लहानपणी करू नयेत, त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण मिळाले पाहिजे. शूद्रांची मुले शिकून सरकारी अधिकारी मामलेदार झाली पाहिजे.

महात्मा फुले यांनी सुचवलेल्या शेती सुधारणा :

शेतीच्या बाबतीत जोतिरावांनी खालील सुधारणा करण्यात याव्यात असे सुचविले आहे.

१. शेतीची योग्य प्रकारे मशागत करता यावी म्हणून चांगल्या जातीच्या गाई बैलांची पैदास करण्यात यावी यासाठी सरकारने परदेशातून चांगल्या गाईचे बेणे आणावेत. गाईनि मारण्याचा कायदा करावा.

२. डोंगर टेकड्या वरील गवत पालापाचोळा, मेलेले कीटक व श्वापद यांच्या हाडा मासाचे सत्व, पानाफुलांचे कुजलेले खत, पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून जागोजागी ताली वजा बंधारे बांधावेत. त्यामुळे वळवाचे पाणी एकंदरीत शेतात मुरून नदी नाल्यास मिळेल असे केल्याने शेती सुपीक होतील.

३. हे काम लष्करातील काड्या गोऱ्या शिपायाकडून करून घ्यावे त्याचप्रमाणे पोलिस व शिपायाकडून डोंगर टेकड्या मधील दऱ्याखोऱ्या नि तलाव तळी जितके होतील तितकी सोयीने बांधून काढावी म्हणजे खालच्या प्रदेशात ओड्या खोळयांनी भर उन्हाळयात पाणी असल्यामुळे जागोजागी धरणे होतील.

४. शेते धुपून त्यात खोंगड्या पडू नयेत म्हणून शेतकऱ्यांनी पाणलोटाच्या बाजूने शेताच्या बांधानी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात

५. ज्या ठिकाणी सापडतील त्या ठिकाणी गावच्या नकाशात नमूद करून विहिरी पाडाव्यात या विहिरी स्वतः बांधणाऱ्यास लहान मोठे बक्षीस देण्याची व्यवस्था सरकारने करावी.

६. एकंदरसर्व नदी,नाले तलावातील साचलेला गाळ पूर्वीप्रमाणे शेतकऱ्याचा फुकट घेऊ द्यावा.

७. गावराने फारेस्ट खात्यास केली असतील तर ती शेतकऱ्यास वापस द्यावीत. जंगलातील इमारती लाकूड तोडू देऊ नयेत पण इतर लाकूड-फाटा तोडण्याची मुभा असावी.

८. उत्तम शेळ्या-मेंढ्या ची पैदास वाढविण्यासाठी परदेशातून त्यांची वेणी आणावी.

९. शेतकऱ्यांचा व त्यांच्या पिकांच्या जंगली जनावरा पासून बचाव करण्यासाठी गावठी तोड्याच्या बंदुका शेतकऱ्यास द्याव्यात.

१०. साल दर साल श्रावण मासी प्रदर्शने करून अश्विन मासी शेत पिकांच्या व औते हाकण्याच्या परीक्षा घेऊन शेतकऱ्याला बक्षीसे द्यावी.

११. शेतकऱ्याच्या मुलास लोहारी, सुतारी कामाचे शिक्षण द्यावे. त्यांना विलायतेतील शेतीशाळा पाहण्यास पाठवावे. तेथील सुधारणा बघून ते आपल्या कडेही त्याच प्रकारच्या सुधारणा करू

शकतील.

१२. शंभर रुपये पगाराच्या वरील सर्व अंमलदारांचे पगार कमी करावे त्यांच्या पेन्शनी कमी कराव्यात मात्र शेत मजूर, कारागीर, लोहार सुतार ,बिगारी यांचे पगार कमी करू नये.

१३. शेतकऱ्याच्या मुलाला पुस्तके, पाट्या व पेन्सिली पुरवाव्यात तसेच शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठी शेती संबंधीचे सर्व ज्ञान देऊन त्यासंबंधी ग्रंथ उपलब्ध करावे.

१४. शेतकी शाळा स्थापन कराव्यात. महात्मा फुले यांचे असे मत होते की, सरकारने शेतकऱ्यांसाठी आणि शेतीसाठी या सुधारणा अमलात आणल्या खेरीज शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारणार नाही.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांचे समकालीन महत्त्व :

आज शेतकरी खऱ्या अर्थाने धर्म, संस्कृती, नोकरशाही,सरकार यांच्या जुलमातून मुक्त झाला आहे असे म्हणता येणार नाही. अजूनही भारतामध्ये निरक्षरांची संख्या आहेत. दहा पैकी सहा मुले चौथीनंतर शाळेत पुढे जातात. शाळेत मोठ्या प्रमाणात गळती आहे. दिले जाणारे शिक्षण निकृष्ट आहे. शिक्षक निरनिराळ्या जातीतून आले असले तरी चांगले शिकविले जात नाही. शिक्षणाचीही जी दयनीय अवस्था आहे तिची शिकार या देशातील बहुसंख्य शेतकरी वर्गच आहे. ज्योतिरावांनी श्रम करणारा शेतकरी हा आपल्या विचारांचा केंद्रबिंदू ठरला होता. मध्यम व कनिष्ठ शेतकरी हा त्यांच्या विश्लेषणाचा आधार होता. या शेतकऱ्यांनी शेती कशी विकसित करावी याबाबत सुचविलेला शेती सुधारणेचा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी कनिष्ठ व मध्यम दर्जाच्या शेतकऱ्यांची चळवळ उभी करणे आज गरजेचे बनत चालले आहे. शेतीबरोबरच पाणी प्रश्न ही आज महत्त्वाचा बनत चालला आहे शेतीसाठी पाणी असणे मोठे गरजेचे आहे हे ज्योतिरावांनी ओळखले होते म्हणून त्यांनी पाणी आडवा पाणी जिरवा ही घोषणा करून पाणी अडवून जमिनीची धूप कशी थांबवावी याबाबत विचार मांडले. पाण्याची नासाडी होऊ नये असे त्यांचे मत होते. पाण्याचे वाटप करीत असताना ते नीट होत नाही म्हणून प्रत्येक शेतकऱ्यास पाणी मोजून मिळावे आणि प्रत्येकाला पाण्याची तोटी मिळावी म्हणजे त्यास पाटकरयावर अवलंबून राहावे लागणार नाही .आज महाराष्ट्रभर या दोन्ही विषयांची चर्चा होत आहे त्यासाठी चळवळी उभारल्या जात आहे यावरून जोतिराव किती द्रष्टे विचारवंत होते, हे आपल्या लक्षात येईल.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. धनंजय कीर,महात्मा ज्योतिराव फुले -आमच्या समाजक्रांतीचे जनक, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८.
२. पंढरीनाथ पाटील, महात्मा ज्योतिराव फुले, मनोविकास प्रकाशन, मुंबई, १९८९.
३. अशोक चौसाळकर, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाड़:मय गृह, मुंबई, १९९८.
४. शरद जोशी, शेतकऱ्याचा आसूड- हा शतकाचा मुजरा, शेतकरी प्रकाशन, अलिबाग,१९८९.

****


ISBN: 978-81-926813-0-6
भारतातील शिक्षण प्रणालीवर
कोविड-१९ चा झालेला परिणाम
डॉ. अनिल म. तिरकर
डॉ. वासुदेव द. गोलाईत
OM SAI
PUBLISHERS &
DISTRIBUTORS
PD

- भारतातील शिक्षण प्रणालीवर कोविड–19 चा झालेला परिणाम
- © डॉ. अनिल म. तिरकर
- © डॉ. वासुदेव द. गोलाईत

No part of this book shall be reproduced, stored in retrieval system or translated in any form or by any means- electronic, mechanical, photocopying and/or otherwise without the prior written permission of the publishers)

ISBN : 978-81-926813-0-6

- **प्रकाशन व मुद्रक :**
  श्री. गणेश राऊत
  प्लाट नं. २९, टी.बी. वार्ड च्या मागे,
  इंदिरा नगर, नागपूर - ४४०००३
  ई-मेल- ospdnagpur@yahoo.com

- **सेल्स ऑफिस :**
  ओम साई पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स,
  २९, इंदिरा नगर, टी.बी. वार्डच्या मागे,
  नागपूर-४४० ००३,
  मो.नं. ९९२३६९३५०६

- **अक्षर रचना :** अक्षरा टायपींग वर्क्स

अनुक्रमणिका

अ.क्र.	पेपर शिर्षक	लेखक	पेज नं.
	मराठी पेपर		
१.	कोरोना काळातील शैक्षणिक विषमता - प्रखर संकट	डॉ. वर्षा गंगणे	१-६
२.	कोविड-१९ मुळे भारताच्या शिक्षण पध्दतीत झालेले बदल	प्रा. डॉ. अमोल स. राऊत	७-११
३.	कोरोना विषाणुमुळे शैक्षणिक क्षेत्रात झालेले बदल व त्याची समर्पकता	प्रा. गणेश बाबुराव दराडे	१२-१७
४.	कोविड-२०१९ चा भारतातील शिक्षणावर परिणाम	प्रा. जया सवाईथूल	१८-२५
५.	भारतीय शैक्षणिक प्रणालीवर कोविड-१९ या महामारीचा परिणाम - एक अभ्यास	प्रा. राजेंद्र घोरपडे	२६-३१
६.	कोरोनाचा शिक्षणावर परिणाम	प्रा. डॉ. नीता तिवारी	३२-३७
७.	भारतातील महाविद्यालयीन शिक्षणासंदर्भात कोविड-१९ चा प्रभाव	प्रा. डॉ. रोनिल कुलभूषण आहले	३८-४७
८.	कोविड-१९ आणि भारतातील दूरस्थ शैक्षणिक प्रणाली	डॉ. गणेश खेकाळे	४८-५१
९.	शिक्षण प्रणालीवर कोविड-१९ चा परिणाम	दत्तात्रय निवृत्ती रावण	५२-५७
१०.	भारतातील शिक्षण प्रणालीवर कोरोना वाइरसचा प्रभाव	शरद कुलट	५८-६६
११.	भारतातील शिक्षण प्रणालीवर कोविड-१९ चे परिणाम	डॉ. गामा मुकुंदराव सेलोकर	६७-७५
१२.	कोविड-१९ कालीन आभासी शिक्षणाचे मृगजळ	आशिष जयराम मुठे	७६-७९
१३.	कोरोना व्हायरस मुळे प्रभावीत झालेले शैक्षणिक क्षेत्र - एक चिंतन	प्रा. डॉ. विनोद बा. चव्हाण (वाणिज्य विभाग)	८०-८४
१४.	आभासी शिक्षण पध्दती विषयी समज-गैरसमज	डॉ. नितीन ज्ञानदेव चौधरी	८५-९१
१५.	कोविड-१९ चे शिक्षण प्रणालीवर झालेले परिणाम	स्मिता रामेश्वर देवर	९२-९८
१६.	कोरोनाचा भारतीय शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम	डॉ. यशवंत राऊत	९९-१०१
१७.	कोविड-१९ व उच्च शिक्षण	प्रा. डॉ. चारुशिला राजेश्वर रूमाले	१०२-१०७
१८.	भारताच्या शिक्षण व्यवस्थेवर कोविड-१९ चा प्रभाव	प्रा. डॉ. स्वाती दीपक दामोदरे	१०८-११४

१२

कोविड १९ कालीन आभासी शिक्षणाचे मृगजळ

आशिष जयराम मुठे,
सहायक प्राध्यापक,
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय,
अकोला.

संपूर्ण जग जैव युद्धाची प्रयोगशाळा बनले आहे. हे covid-19 या काळात पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. पुन्हा एकदा या शब्दाचा अर्थ ' हे प्रयोग नवीन नाही'. महासत्तांच्या असुरी महत्त्वाकांक्षानी असे प्रयोग इतिहासात ही केले आहे. संबंधित पुस्तकाचे शीर्षक लक्षात घेता, येथे त्या राजकारणाचा उल्लेख अपेक्षित नाही. खरंतर covid-19 या प्रयोगाने मात्र शिक्षण क्षेत्राची नाहीतर मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्राची समीक्षा नव्याने केली जाणे किती गरजेचे आहे. हा प्रश्न आपणासमोर ठेवला

Covid-19 कालीन आभासी शिक्षणाचे मृगजळ असे शीर्षक देताना, त्यात मात्र भारतीय शिक्षण व्यवस्थेचे अथवा महाराष्ट्रात महाविद्यालयीन परीक्षा नियोजनात विद्यापीठांचे कमीपण अधोरेखित करणे हा मानस नाही. शिक्षण हे सर्व समावेशी आहे.त्यात संशोधन देखील आले. आणि संशोधनावर चर्चा करायची झाल्यास तो विषय जागतिक आरोग्य संस्थेच्या संशोधनापर्यंत जातो. या covid-19 काळात जागतिक आरोग्य संस्थेने भारतीय हवामान खाते या विभागाच्या अंदाजासोबत साधर्म्य साधले. म्हणून अगदीच प्रादेशिक स्तरावर या विषयाची चर्चा होऊच शकत नाही. वैश्विक महामारी (तथाकथित) चे परिणाम देखील वैश्विक असतील. म्हणून ही चर्चा काहीशी विस्तारित होईल.

मानवी आयुष्य म्हणजे 'अनिश्चितता' हे जरी मान्य असले तरी, पूर्व आपत्ती व्यवस्थापन हे देखील तेवढेच परंतु दुर्लक्षित (सोयीस्कर) सत्य. लॉक डाऊन म्हणजे नक्कीच आपत्तीव्यवस्थापन नाही. लॉक डाऊन म्हणजे मार्ग शोधण्यासाठी घेतलेला अवकाश म्हणता येईल फार तर. किंवा लॉक डाऊन म्हणजे चीनने धूर्तपणे जगाला दाखविलेला चुकीचा मार्ग .त्यामुळे त्याला ' नवीन वैश्विक आर्थिक रचने'ची मागणी आता करावी लागणार नाही. आपण सोयीस्कर मुद्द्यांची चर्चा करण्याचे व्यसन लागलेले लोक आहोत. सोयीस्कर मुद्दा म्हणजे मूळ प्रश्न नाही. या बाष्कल सोयीस्कर चर्चेत आपण देशाचा पाया घडवणाऱ्या शिक्षण व्यवस्थेकडे सर्रास दुर्लक्ष केलेले आहे. तंत्रज्ञानाची क्रांती झाली. ही प्रौढी मिरवताना आपण या क्रांतीची व्यापकता लक्षात घेतो का? खेड्या-पाड्यांमध्ये वाड्या-वस्त्यांमध्ये ही क्रांती पोहोचली का? ही क्रांती सर्वांनाच परवडणारी आहे का? या माफक प्रश्नांची देखील वास्तविक उत्तर आपण पचवू शकणार नाही. अक्षरशः भारतीय शिक्षण व्यवस्था आणि तंत्रज्ञान यांचे वाभाडे

याकाळात निघाले आहे.वरकरणी दिसायला आणि दाखवायला जरी ऑनलाइन क्लासेस आणि परीक्षा होत असल्या तरी त्यांचा दर्जा काय या प्रश्नाकडे आपण राजरोसपणे पाठ फिरवतो.

आजही वस्ती शाळांमध्ये खालून साधळ लागू नये म्हणून खाली पोते टाकून (ते ही घरून आणलेले) बसणारे विद्यार्थी, व दुसरीकडे लेकरांची शाळा पूर्ण होईपर्यंत चार चाकी घेऊन बाहेर वाट पाहणारे धनाढ्य. असे विसंगत चित्र देशात असताना आपण कसं म्हणू शकतो की, संधीची आणि दर्जाची व इतर समानता आहे? शिक्षणाची समानता तरी आहे का? मानवाने या तंत्रज्ञानाला देखील असमानता शिकवली आणि ती असमानता या covid-19 काळात प्रकर्षाने समोर आली.

तंत्रज्ञानाची क्रांती आणि त्या क्रांतीची फळे मात्र शहरापुरती मर्यादित राहिली. इतर भागातील विद्यार्थ्यांपर्यंत ती पोहोचली नाही. शहरात जरी ऑनलाईन शिक्षणाचे 'प्रयोग' झाले असले तरी, ते अजून मात्र खेड्यांमध्ये झालेले नाही. शिवाय मुलं आणि मुली यांच्यात आपल्या समाजाकडून केला जाणारा शैक्षणिक भेद देखील चर्चेच्या स्थाणी या covid-19 ने आणला. अगदी जिल्हा स्तरावरच्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या किती टक्के मुलींकडे ' स्मार्टफोन' आहे? हा वेगळा संशोधनाचा विषय ठरेल. परंतु मुलांची स्थिती याबाबतीत जरा बरी आहे. हा समाज वाचनातून आलेला एक सामान्य निष्कर्ष. स्मार्टफोन म्हणजे ऑनलाईन शिक्षण का? असा प्रतिप्रश्न किंवा दुमत येथे अपेक्षित आहे. परंतु ऑनलाईन शिक्षण वजा स्मार्टफोन बरोबर काय? याचे उत्तर दुमत असणाऱ्यांनी द्यावे. शासनाने फर्मान सोडले की, ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात यावे. पण त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा (विद्यार्थी आणि शिक्षक या दोहोंना सुद्धा) कोणी पुरवाव्या? या प्रश्नाचे उत्तर शासन देत नाही. नक्कीच या सर्व सुविधा सर्वांकडे उपलब्ध नाही. हे शासन देखील जाणून आहे. तरीदेखील ज्यांच्याकडे आहेत त्यांना शिकवा. ही भूमिका असमानता निर्माण करत नाही का? Covid-19 पूर्व काळात ही शिक्षणासंदर्भात उदासीन असणारा आपला सर्वच समाज या काळात शिक्षण सुरू व्हावे या मागणी साठी किती अग्रेसर दिसला? याचे उत्तर नकारात्मकच आहे. आणि त्यात या 'सुविधांचा अभाव' या पर्यायाने भर घातली.

माननीय पंतप्रधानांकडून कोण्या एका मुलीला लॅपटॉप आणि सुविधा पुरवून तिची समस्या सोडविली गेली. अर्थात त्याची जाहिरात ही तेवढीच झाली. पण म्हणून मूळ प्रश्न सुटला नाही या covid-19 काळात अनेक पॅकेज केंद्राने व राज्याने जाहीर केले. आभासी शिक्षणाच्या पायाभूत सोयी-सुविधांसाठी एखादे तोडके, खोटे का असेना असे 'पॅकेज' का जाहिर केले जाऊ नये.? याचे उत्तर शैक्षणिक धोरणाबद्दलची उदासीनता हे आहे.

तंत्रज्ञानाचे उत्तर तंत्रज्ञानानेच दिले जावे. हा तंत्रज्ञानाचा पायाभूत नियम. ते उत्तर भावनिक दृष्टिकोनातून देता कामा नये. किंवा आर्थिक-सामाजिक-राजकीय कारणे त्यासाठी देता कामा नये. या covid-19 काळात जर आम्ही ऑनलाईन (आभासी) पद्धतीने वर्ग घेतले किंवा परीक्षा घेतल्या (अर्थात तंत्रज्ञानाच्या मार्फत) तर त्यात परीक्षेच्या गोपनीयतेचे नियम किती पाळले गेले?ऑनलाइन वर्गामध्ये किती टक्के विद्यार्थी सहभाग घेत आहे? 75% अनिवार्य उपस्थिती हा प्रश्न नाही का? मग आपण म्हणतो 'मानवाच्या सोयीसाठी तंत्रज्ञान आहे, तंत्रज्ञानाच्या सोयीसाठी माणूस नाही'. पण हा युक्तिवाद होत नाही. मुळात प्रश्न हा आहे की, ज्या बेरोजगारीच्या प्रश्नाला मूठमाती देण्यासाठी फुकट विदा (डेटा)

देणाऱ्या सरकार पुरस्कृत कंपन्या होत्या त्या, या काळात फुकट विदा का देऊ शकत नाही? शिवाय शासनाने देखील कधी या फुकट विदा चे महत्व मनोरंजन सोडून शिक्षणही असू शकते, असा प्रचार करण्यासाठी एखादी योजना राबवली का? 'भारतात तंत्रज्ञान ही एक संघटित चालाकी आहे.'(संघटित गुन्हेगारी ठरविण्याची प्रथा निदान आपल्या लोकशाहीत नाही) तंत्रज्ञान मनोरंजनासाठी अधिक वापरले जावे, त्याचे व्यसन लागेपर्यंत व आपण बेरोजगार आहोत हे विसरे पर्यंत ते फुकट विदा पुरवणारे या आणीबाणी काळात ते तंत्रज्ञान अत्यंत हलक्या दर्जाचे आणि महागड्या किमतीत देणे ही राजकीय कृती आहे. असे म्हणणे जरी अतिशयोक्तीचे वाटत असले तरी ते अंतिमतः देखील सत्यच आहे.

Covid-19 काळात शिक्षण व्यवस्थेचे अपुरेपण उजागर झाले. मुठभर शाळा,महाविद्यालय व संस्था अपवाद म्हणून सोडल्यास किती टक्के उपरोक्त तत्त्वांकडे पुरेशा प्रमाणात ऑनलाईन शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध आहे. याची आकडेवारी बाहेर येण्यास वेळ लागेल. आणि ती आहे तशी बाहेर येणार देखील नाही.

मूळ प्रश्न हा आहे की, ' भारतीय शिक्षण व्यवस्था मग ती covid-19 पूर्व काळातील असो, वा covid काळातील. ती विद्यार्थी केंद्री आहे का? तर नाही ती अगदीच विद्यार्थी केंद्री नाही. या प्रश्नाच्या उत्तरार्थ आव आणणारे दुमत होऊ शकेल. मात्र वास्तविकता हीच आहे की, आपली शिक्षण व्यवस्था-शैक्षणिक धोरण-व शिक्षक विद्यार्थी केंद्री नाही. Covid-19 काळात चालवले जाणारे शैक्षणिक प्रयोग मात्र 'विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान' टाळणे या हेतूने होत नाही. त्यामागे एक खूप मोठी अदृश्य शक्ती कार्यरत आहे.(नाही तरी शिक्षण सम्राटांना नव-सरंजाम की उपाधी अलीकडे दिली जात आहेच) उगाच नाही भारतात शिक्षणाला 'दोन नंबरचा व्यवसाय' म्हणत. अर्थात त्या अर्थाने दोन नंबरचा नाही, तर एक नंबरचा व्यवसाय म्हणजे आरोग्य आणि दोन नंबरचा व्यवसाय म्हणजे शिक्षण या अर्थाने दोन नंबरचा. आयुष्यभर सोन्याचं अंड देणारी कोंबडी म्हणजे शैक्षणिक संस्था, त्या कोंबडीचं आरोग्य निकोप रहावं म्हणून देखील ऑनलाईन शिक्षणाचे शहरी प्रयोग 'विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान' या गोड संकल्पनेखाली केली जात आहेत. गाव खेड्यांमध्ये तेवढासा मलिदा या व्यवसायातून बहुतेक या नव-सरंजामाना मिळत नसावा. म्हणून हे प्रयोग तिकडे तेवढेसे होतांना दिसत नाही. लॉकडाऊन काळामध्ये अनेक सेवा बारगळल्या त्यात शिक्षण सेवाही बारगळली तर त्यात नवल काय? जागतिक आणीबाणीच ती. परंतु आपण नैतिकतेचा व पुढारलेपणाचा जो आव आणतो तो आपल्याला घातक ठरतो.खरंतर सहा महिने शिक्षण व्यवस्था पूर्णतः बंद राहिली तरी विद्यार्थ्यांना तेवढा फरक पडत नाही जेवढा या शिक्षण सम्राटांना पडतो. कारण पदवी प्राप्त केल्यावर त्यांना काही दुसऱ्या दिवशीच नोकरी मिळते असे नाही. तसे होत असते तर आपण हा शिक्षणाचा अट्टाहास मान्यही केला असता. पण तशी परिस्थिती नाही. मुळात जेव्हा पदवी मिळवल्यावर देखील आता पुढे काय? हा प्रश्न ज्या शैक्षणिक व्यवस्थेत कायम राहतो, तिथे परीक्षांचा अट्टाहास का? शैक्षणिक नुकसान याचा अर्थ ज्ञानार्जनामध्ये खंड पडणे , की शैक्षणिक वर्ष वाया जाणे वा शिक्षण घेऊन आयुष्य वाया जाणे. याचा जोपर्यंत आपण समर्पक आढावा घेत नाही. तोपर्यंत तरी ऑनलाईन शिक्षणाची प्रौढी मिरवता कामा नये. शेवटी आपण ऑनलाईन शिक्षणाला ज्ञानार्जनाचा नाही तर 'स्टेटस इशू' केलेच आहे. नक्कीच याला काही सन्माननीय अपवाद आहेत. पण ते अपवादापुरतेच मर्यादित आहेत.

७८

Covid-19 काळात प्रामुख्याने शैक्षणिक क्षेत्रातील एक मोठी समस्या समोर आली ती म्हणजे, 'तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेण्याच्या साधनांच्या उपलब्धतेतील असमानता'. जोपर्यंत ही असमानता नष्ट होत नाही तोपर्यंत ही शैक्षणिक क्रांती तळागाळापर्यंत पोहोचली असे म्हणता येणार नाही.

खरंतर समस्या येतात त्या त्यातून काहीतरी बोध घेतला जावा म्हणून. पूर्व आपत्ती व्यवस्थापन म्हणजे ' असे झाले तर काय' या प्रश्नाचा माघोवा घेणे. पण आपल्याला तो प्रश्न पडत नाही. ई-लर्निंग' व्हर्च्युअल लर्निंग इत्यादी संकल्पना वापरताना त्यांचे परिणाम, परिणामकारकता व व्यापकता या तत्त्वांचा देखील उहापोह होणे गरजेचे आहे. या आभासी शिक्षणाच्या रेट्यातील पूर्व आपत्ती व्यवस्थापन काय?दुर्दैवाने आपण तसा विचार करत नाही. स्मार्ट साधनांच्याद्वारे शिकणे म्हणजे स्मार्ट शिक्षण नाही. वाचन संस्कृती का लोप पावत आहे, नव्या पिढ्यांमध्ये डोळ्यांचे विकार का वाढत आहे, मानसोपचार तज्ञांची कधी नव्हे ती एवढी गरज या काळात का भासत आहे? इत्यादी प्रश्नांची उत्तर शोधताना त्यामागे आपला हा तांत्रिक साधनांच्या मार्फत शिकण्याचा हव्यास तर कारणीभूत नाही ना याच उत्तर देखील आपण शोधलं पाहिजे. तंत्रज्ञान नाकारणे हा अर्थ येथे नाही, तर ते तर्कसंगत रित्या स्वीकारावे व मनोरंजनासाठी नाहीतर शिक्षणासाठी स्वीकारावे हा अर्थ आहे. राष्ट्रबांधणी मधील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून शिक्षण या तत्वाकडे पाहिले जाते. मात्र त्यासाठी 'राष्ट्र आणि विद्यार्थी' त्या शिक्षणाच्या केंद्रस्थानी असावे लागते.

Covid-19 या संकटाने आपल्याला आपल्या शिक्षण व्यवस्थेची नव्याने समीक्षा करण्याची संधी दिली आहे. ती संधी आपण गमावता कामा नये. नव्याने समीक्षा झाली तर या संकटाने केलेले अल्पकालीन नुकसान आपल्याला दीर्घकालीन फायदे देऊ शकते.

*****

७९


भारतीय विचारवंत
संपादक
डॉ. नीलम छंगाणी
डॉ. नितीन चौधरी

भारतीय विचारवंत : डॉ. नीलम छंगाणी, डॉ. नितीन चौधरी
प्रकाशक :
ॲड. कु. जे. व्हि. भगत
अजिंक्य प्रकाशन
भिमनगर, वापटा पो. कुपटा
ता. मानोरा जि. वाशिम
संपर्क : ९६०४४०२०५३
WhatsApp : 8007143527
Website : www.ajinkyapublication.com
E-mail : ajinkyapublication@gmail.com

ISBN :978-93-90532-20-9

© लेखकाधिन
प्रथम आवृती : जानेवारी २०२१
अक्षर जुळवणी : अजिंक्य प्रिंटीग्स् ॲण्ड कॉम्प्यूटर्स
मुखपृष्ठ : अरविंद मनवर
मुद्रक : अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम
प्रमुख विक्रेता: अजिंक्य पुस्तकालय, वाशिम
संपर्क : ८००७१४३५२७ / ९६०४४०२०५३
किंमत : रू.४५० फक्त

(या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

भारतीय विचारवंत : डॉ. नीलम छंगाणी, डॉ. नितीन चौधरी
प्रकाशक :
ॲड. कु. जे. व्हि. भगत
अजिंक्य प्रकाशन
भिमनगर, वापटा पो. कुपटा
ता. मानोरा जि. वाशिम
संपर्क : ९६०४४०२०५३
WhatsApp : 8007143527
Website : www.ajinkyapublication.com
E-mail : ajinkyapublication@gmail.com

ISBN :978-93-90532-20-9

© लेखकाधिन
प्रथम आवृती : जानेवारी २०२१
अक्षर जुळवणी : अजिंक्य प्रिंटीग्स् ॲण्ड कॉम्प्यूटर्स
मुखपृष्ठ : अरविंद मनवर
मुद्रक : अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम
प्रमुख विक्रेता: अजिंक्य पुस्तकालय, वाशिम
संपर्क : ८००७१४३५२७ / ९६०४४०२०५३
किंमत : रू.४५० फक्त

(या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

४५.	सावित्रीबाई फुलेंच्या शैक्षणिक विचारांचे समाजशास्त्रीय अध्ययन / डॉ. सुनिल गायगोळ	२१४
४६.	भारतीय विचारवंत / डॉ. केशव गोरे	२२०
४७.	स्वामी विवेकानंदाच्या विचारातील भारतीय स्त्री / प्रा. जगदीश जायेवार	२२६
४८.	भारतातील उदारमतवादी राजकीय विचारवंत न्यायमूर्ती रानडे / डॉ. आशिष मुठे	२३१
४९.	भारतीय स्त्री विचारवंत / डॉ. सुनिता राठोड	२३५
५०.	वि. वा. शिरवाडकर यांच्या नाटकातील जीवनवाद / डॉ. रविंद्रनाथ केवट	२४१
५१.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : समाज आणि राष्ट्रउद्धारक विचारवंत / प्रा. स्वप्नील इंगोले	२४९
५२.	तत्त्वज्ञ जीवनयोगी विनोबा भावे / प्रा. रेखा आढाव	२५५
५३.	भारतीय शास्त्रीय संगीताचे शास्त्रकार - पं. विष्णु नारायण भारतखंडे / प्रा. एस. व्ही. शिंदे	२५९
५४.	महात्मा ज्योतीबा फुले आणि शिक्षण / डॉ. कविता कावरे	२६२
५५.	पंडीत जवाहरलाल नेहरुंचे भारतीय लोकशाहीतील योगदान / डॉ. बी. आर. भोसले	२६७
५६.	सरदार वल्लभभाई पटेल यांचे भारताच्या अंतर्गत सुरक्षानीति / प्रा. शेषराव तायडे	२७१
५७.	राजर्षी शाहू छत्रपती महाराजाचे शैक्षणिक विचार / प्रा. पुरूषोत्तम बांडे	२७६
५८.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील समाजजीवन / डॉ. देविदास शिंदे	२८२
५९.	पंडित विष्णू नारायण भातखंडे : संगीतातील एक थोर विचारवंत / प्रा. सुमेध सगणे	२८८
६०.	संत कबीरकें नारीसंबंधी विचार / डॉ. जितेंद्र शेळके	२९३
६१.	हिन्दी साहित्य का छायाबाद व गांधी विचार धारा / डॉ. सुरेश केसवानी	२९८

भारतातील उदारमतवादी राजकीय विचारवंत न्यायमूर्ती रानडे

डॉ. आशिष जयराम मुठे
सहाय्यक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

भारतातील बौद्धिक पुनर्जागरणाच्या काळातील एक महत्त्वपूर्ण विचारवंत म्हणून न्यायमूर्ती रानडे यांच्याकडे पाहिले जाते. न्यायमूर्ती रानडे भारतातील व प्रामुख्याने महाराष्ट्रातील तत्कालीन समाज सुधारणांचे अग्रगण्य नेते. भारतामध्ये दोन युद्ध ही समांतर काळात लढली गेली. एक म्हणजे इंग्रजांविरुद्धचा स्वातंत्र्यलढा आणि दुसरे युद्ध म्हणजे येथील सामाजिक सुधारणा.एतद्देशीय सामाजिक मानसिकता बदलल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य हे फार काळ टिकू शकणार नाही, याची जाण न्यायमूर्ती रानडे यांना होती. म्हणून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला उदारमतवादी स्वरूप दिले. इंग्रजांच्या राजवटीतील फलदायी गोष्टींचा स्वीकार भारतीयांनी आपल्या उत्थानासाठी केला पाहिजे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. याच काळात स्वातंत्र्यलढ्याचे वेगवेगळे प्रकार आपण पाहतो. स्वातंत्र्यासाठी जहाल व मवाळ मागणी, सनदशीर स्वातंत्र्याची मागणी व हिंस्त्र लढा इत्यादी प्रकारातून स्वातंत्र्याची मागणी झाली. परंतु न्यायमूर्ती रानडे यांनी प्रथम समाज सुधारणांना प्राधान्य दिले, सामाजिक सुधारणांच्या जोडीने स्वातंत्र्याची मागणी त्यांनी केली. सामाजिक सुधारणांना जोर देता यावा यासाठी त्यांनी भारतीय सामाजिक मंडळाची स्थापना केली. व्यक्तिस्वातंत्र्य व स्त्री-पुरुष समानता ही उदारमतवादाची केंद्रीय संकल्पना न्यायमूर्ती रानडे यांच्या राजकीय विचारांतील व सामाजिक सुधार कार्यक्रमातील केंद्रीय विषय राहिले.

सतराव्या शतकात इंग्लंडमध्ये विकसित झालेल्या व नंतर जगभर कवेत घेतलेल्या उदारमतवादी विचारसरणीचे भारतातील एक खंदे समर्थक म्हणून न्यायमूर्ती रानडे यांचे नाव घेतले जाते. कोणतीही विचारसरणी, विचार, सिद्धांत वा विचारवंत आपल्या काळाचे अपत्य असतो.सतराव्या शतकात प्रामुख्याने इंग्लंडमध्ये या विचारसरणीचा विकास होण्याचे कारण म्हणजे तेथे अस्तित्वात असणाऱ्या अनुदारवादी प्रवृत्ती विरोधातील एक पुनरजागरणाची लाट म्हणून सांगता येईल.

उदारमतवाद भारतात कधी आला, यापेक्षा तो का आला हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भारतीय समाजातील अज्ञान, रूढी-परंपरा शिक्षणाचा अभाव व वर्ण व्यवस्थेतून निर्माण झालेली मानवी अधिकारातील विसंगती इत्यादी तत्कालीन कारणं उदारमतवादाला भारतात आमंत्रित करतात.

जेरेमी बेंथम आणि ॲडम स्मिथ यांच्या उदारमतवादी विचारांचा प्रभाव न्यायमूर्ती रानडे यांच्या विचारसरणीवर अधिक होता. परंतु इंग्लंडमधील हे विचारसरणीचे रोपटे भारतीय वातावरणात जगवणे तेवढेसे शक्य वाटत नव्हतं. कारण इथली समाज मानसिकता. मुळात

उदारमतवादाची वैशिष्ट्य व्यक्तिस्वातंत्र्याला राज्यसंस्थेपेक्षा अधिक महत्त्व देणारी असल्यामुळे एतद्देशीय अनिष्ट रूढी, परंपरा मोडण्यासाठी राज्यसंस्थेची गरज अधिक भासू लागते.कायद्याद्वारे समानता आणणे हा एक राजमार्ग आहे. आणि भारतीय असमानता नष्ट करण्याचे काम राज्य संस्थाच करू शकते. म्हणून राज्य प्रथम की व्यक्ती हा प्राथमिक प्रश्न तत्कालिक परिस्थितीत होता.भारतीय समाज मानस लक्षात घेऊन न्यायमूर्ती रानडे 'उदारमतवादाचा भारतीय पॅटर्न' पुढीलप्रमाणे सांगतात.

प्रामुख्याने न्यायमूर्ती रानडे यांच्या काळात ज्या समाजसुधारणेच्या चळवळी महाराष्ट्रामध्ये झाल्या त्यांचा तात्त्विक पाया रानडे यांच्या राजकीय उदारमतवादी विचारांनी रचला. 'यासंदर्भात आचार्य जावडेकर असे म्हणतात की, १८७० ते १८८० हा काळ महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात रानड्यांच्या वर्चस्वाचा काळ होता.' आजच्या महाराष्ट्राची पुरोगामी म्हणून असणारी ओळख ही देखील त्यांच्या विचारांचे फलित म्हणता येईल.

१. सनदशीर मार्गाने स्वातंत्र्यलढ्यावर विश्वास :

व्यक्तिस्वातंत्र्य व घटनात्मक राज्यव्यवस्था या दोन्ही संकल्पनांवर न्यायमूर्ती रानडे यांचा विश्वासि त्यांच्या प्रत्येक भाषणांमधून व कृतीमधून जाणवला. इंग्रजांच्या राज्य पद्धतीवर व चांगुलपणावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्यामते भारतीय समाज मानसिकता बदलण्यासाठी आपण इंग्रजांच्या संस्कृतीचे अनुकरण केले पाहिजे. मुळात या काळात इंग्लंडमध्ये व्यक्तिस्वातंत्र्याचा व्यापक अर्थ स्वीकारण्यात आला होता.ज्यामध्ये जात-पात, धर्म-वंश, लिंग इत्यादी गोष्टी व्यक्तीपेक्षा मोठ्या नव्हत्या. तर भारतीय परिस्थितीत उपरोक्त सर्व गोष्टी या व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ समजल्या जात होत्या. व्यक्तीचे स्वातंत्र्य ही संकल्पनाच आपल्याकडे चिरडली गेली होती, आपण पारतंत्र्यात आहोत याची देखील जाणीव बहुतांश एतद्देशीयांना नव्हती. परदेशी राजवटी पेक्षा येथील उपरोक्त अनिष्ट संकल्पना या अधिक जुलमी होत्या. आपल्या मागण्या या सनदशीर व शांततेच्या मार्गाने मान्य करून घेण्याचे धोरण उदारमतवादी विचारसरणीचे प्रतीक ठरते. इंग्रजांच्या राजवटीत प्रखर विरोध न करता त्यातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करत भारतीयांनी स्वातंत्र्य लढा पुकारावा अशी भूमिका न्यायमूर्ती रानडे यांनी घेतली.

२. मानवी विवेकामध्ये विश्वास :

न्यायमूर्ती रानडे आपल्या विचारांमध्ये नैतिकतेला आत्यंतिक महत्त्व देतात. मानवाच्या अंगी नैतिकता आहे त्याला त्याचे बरे-वाईट कळते ही उदारमतवादाची मध्यवर्ती धारणा. याच धारणेच्या आशयाचे धोरण स्वीकारत न्यायमूर्ती रानडे इंग्रजांच्या भारतातील राजवटीला विकासाची संधी म्हणून पाहतात. इंग्रजांकडून अनेक गोष्टी भारतीय लोकांनी ग्रहण केल्या व करता येतील, त्यांची आधुनिक विचारसरणी, व विज्ञानातील नवनवीन शोध हे भारतासाठी वरदान असल्याचे त्यांचे मत होते. या राजवटीतून भारतीयांनी आपल्या विवेकानुसार फलदायी संकल्पना स्वीकाराव्यात जेणेकरून आपला उत्थान हा जलद होईल ही न्यायमूर्ती रानडे यांची धारणा. इंग्रजांची राजवट ही पूर्णतः वरदान नव्हती हे सत्य आहे. परंतु त्यांच्या राजवटीने येथील

समस्या किमान आपण ओळखू शकलो.त्यांच्या अनुकरणातून वैज्ञानिक व आधुनिक जगाची कास धरू शकलो हे न्यायमूर्ती रानडे यांचे मत मान्य करावे लागते.

३. मानवी हक्क :

डेक्कन सभेच्या स्थापनेत पुढाकार घेऊन न्यायमूर्ती रानडे येथील सामाजिक विषमता नष्ट करू पाहतात. भारतातील सामाजिक विषमता आणि स्त्री-पुरुष भेद हा त्यांच्या नजरेतून सुटला नाही. हा भेद नष्ट करण्यासाठी त्यांनी डेक्कन सभे मार्फत प्रयत्न केले.जनजागृती केली.न्यायमूर्ती रानडे यांच्या शब्दात स्त्री-पुरुष तसेच सर्वच जाती व धर्म ही एकाच ईश्वराची लेकरं आहेत. मानवी स्वार्थाने त्यांना विभागले.या जाती धर्मातून निर्माण झालेल्या अनिष्ट प्रथानी प्रामुख्याने व्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटला आहे. तो मुक्त करण्यासाठी आपण व्यक्तीची प्रतिष्ठा जपली पाहिजे.तिला भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्यांनी जातीसंस्थेच्या उच्चाटनासाठी विशेष प्रयत्न करून, स्त्री पुरुष समानता देखील आपल्या सामाजिक चळवळीच्या केंद्रस्थानी ठेवली.

४. कायद्याचे राज्य :

समकालीन संविधानामध्ये सर्वात पवित्र संकल्पना म्हणून जीचा स्वीकार केला जातो, ती संकल्पना म्हणजे कायद्याचे राज्य. कायद्याचे राज्य म्हणजे हमी, शाश्वती. मानवाधिकाराच्या रक्षणाची हमी, मूलभूत अधिकारांची हमी, विकासाच्या समान संधीची शाश्वती, सामाजिक भेदाभेद नष्ट करण्यासाठी कायद्याचे कवच ई. व्यक्तीची प्रतिष्ठा जपण्याची हमी कायद्याचे राज्य देते. कायद्याचे राज्य म्हणजे विशेषाधिकाराचे उच्चाटन. कायद्याचे राज्य म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व धार्मिक मक्तेदारीला विरोध. भारतीय परिस्थिती मध्ये राज्यसंस्थेची भूमिकाही अत्यंतिक महत्त्वाची आहे. येथील समाजाच्या उत्थानासाठी राज्य संस्थेकडे अधिक जबाबदाऱ्या सोपवण्याची भूमिका न्यायमूर्ती रानडे मांडतात. त्यांच्या या संदर्भातील भूमिके संदर्भात पुढील संदर्भ अत्यंत मार्मिक ठरतो.

'जातीपातीच्या व वंशाच्या दुराभिमानातून मुक्त होऊन माणसामाणसात न्याय प्रस्थापित करण्याच्या सर्व मार्गांना पाठिंबा देणे, राज्यकर्त्यांशी व त्यांना राबवाव्या लागणाऱ्या कायद्यांशी एकनिष्ठ राहणे व त्याचबरोबर शासीताना कोणत्याही कायद्याखालील त्यांचाच अधिकार असलेली समता प्राप्त करून देणे, म्हणजे न्यायमूर्ती रानडे यांचा उदारमतवाद होय. - ना. र. फाटक.'

५. धार्मिक सहिष्णुता :

भारतामध्ये अनेक जाती धर्मांची विविधता आहे, परंतु याच विविधतेच्या आधारे तो विभागला देखील आहे. न्यायमूर्ती रानडे आपल्या धर्माविषयीचे मत मांडताना (भारतीय ईश्वर वादाचे तत्वज्ञान) असे म्हणतात की, 'धर्म ही वैयक्तिक बाब आहे तिचा राजकारणासाठी उपयोग करता कामा नये'. धार्मिक असहिष्णुता उदारमतवादाच्या मानवी स्वतंत्रता, मानवी मूल्य, विकास व शांतता या तत्वांना विरोधी वातावरण निर्माण करते.शाश्वत विकास हा शांततेच्या मार्गाने

केला जाऊ शकतो.व त्यासाठी पूरक असे वातावरण निर्माण करण्यासाठी आपण धार्मिक सहिष्णुता व धोरण स्वीकारले पाहिजे. प्रत्येक धर्मातील नैतिकता ही जीवनाचा आधार बनवली पाहिजे.त्यांच्या मते जगातील कोणताही धर्मग्रंथ वाईट शिकवण देत नाही. आणि एका निश्चित टोकापर्यंत सर्व धर्म शांततेचा अवलंब करतात.तीच शांतता व नैतिकता माणसाला माणूस म्हणून वागते म्हणून धार्मिक सहिष्णुता हे राज्य संस्थेचे धोरण असावे.

६. कल्याणकारी राज्याची अपेक्षा :

न्यायमूर्ती रानडे राज्यसंस्थेला कल्याणकारी व्यवस्था म्हणून मान्य करता. अराजकतावाद ते स्वीकारत नाही. त्यांच्यामते मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास करण्याची भूमिका राज्य संस्थेने स्वीकारावी. उत्तरोत्तर मानवी जीवनाचा दर्जा वाढवण्याचा प्रयत्न राज्यसंस्थेने करावा.राज्यसंस्थेने प्रत्येक कायदा अमलात आणताना 'मानवी गरिमा' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवावी. शिवाय भारतीय समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा व चालीरीती तसेच जाती-धर्म व स्त्री-पुरुष यांच्यातील भेद नष्ट करण्याची जबाबदारी देखील राज्याने पार पाडावी. समाज सुधारणांमध्ये राज्याचा हस्तक्षेप त्यांना मान्य होता.

समकालीन परिस्थितीमध्ये राज्यव्यवस्थेचे जे स्वरूप सर्वत्र स्वीकारण्यात आलेले आहे, ते म्हणजे 'कल्याणकारी राज्य'.स्वातंत्र्यलढ्या दरम्यान न्यायमूर्ती रानडे यांनी, राज्याची हीच संकल्पना तत्कालीन परिस्थितीत स्वीकारली होती. यावरून त्यांच्या दूरदृष्टी पणाची प्रचीती येते. भारतीय बौद्धिक पुनर्जागरणाच्या काळातील एक महत्त्वपूर्ण व भारतीय उदारमतवादी विचारवंत म्हणून त्यांची ओळख पुन्हा एकदा अधोरेखित होते.

संदर्भ ग्रंथ :

१. लेखक - नरहर रघुनाथ फाटक, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : चरित्र. - नीलकंठ प्रकाशन.
२ लेखक - प्रा.डॉ.आनंद दामले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे एका महापुरुषाची चरित्रात्मक झलक. - महाराष्ट्र संस्था पुणे ग्रंथोत्तेजक संस्था,पुणे.
३ लेखक - डॉ.त्र्यं.कृ. टोपे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : व्यक्ती, कार्य आणि कर्तुत्व.

PUBLISHED BOOK & PUBLISHED CHAPTER IN BOOK AND CONFERENCE PROCEEDING

DEPARTMENT OF SOCIOLOGY

2016 - 17 to 2020 – 21

Sr. No.	Name of the Teacher	Number of published Book & Chapter in Book and Conference Proceeding					Total
		2016-17	2017-18	2018-19	2019-20	2020-21	
1	Prof. Narendra S. Manmothe	00	00	00	01	01	02
2	Asst. Prof. Smita R. Dewar	00	00	00	01	04	05
		00	00	00	02	05	07


YKING BOOKS
सामाजिक मानवशास्त्र
प्रा. नरेंद्र मानमोठे

सामाजिक मानवशास्त्र

Smt. R. D. G. College For Women Akola
CENTRAL LIBRARY
Section SOC. ... Acc. No.....14106..
Date ...13-11-17.. Price ...425.....

प्रा. नरेंद्र श्रीपतराव मानमोठे
विभागप्रमुख
(समाजशास्त्र विभाग)
राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय,
अकोला (महाराष्ट्र)

वाईकिंग बुक्स
जयपुर भारत

प्रथम संस्करण : 2019

मूल्य : ₹ 1475

कॉपीराइट : लेखक

आई.एस.बी.एन. : 978-93-87945-56-2

प्रकाशक:

वाईकिंग बुक्स

शोरूम: जी-13, एस.एस. टॉवर, धामाणी स्ट्रीट, चौड़ा रास्ता, जयपुर-302 003
फोन: 0141-4020251, मो. 9414056846
हैड ऑफिस: 18, जैन भवन, एन.बी.सी. के सामने, शान्ति नगर, जयपुर-302 006
फोन: 0141-2221456
e-mail : ykingbooks@gmail.com
website : www.ykingbooks.com

साज-सज्जा:
विक्रम कुमार शर्मा, जयपुर

मुद्रक:
ट्राईडेन्ट एन्टरप्राईसेस, दिल्ली

विषय-सूची

	भूमिका	v
1.	मानवशास्त्र की प्रकृति एवं विषय क्षेत्र	1
2.	सामाजिक मानवशास्त्र	29
3.	परिवार और गोत्र (गण संगठन)	59
4.	विवाह	93
5.	आदिम समाज में महिलाएँ एवं युवागृह	125
6.	प्रजाति की अवधारणा	138
7.	आदिम समाज की अर्थव्यवस्था	159
8.	धर्म एवं जादू	187
9.	भारत में आदिम समाज की समस्याएँ एवं विकास कार्यक्रम	205


आधुनिक समाजशास्त्रीय
विचारों का
सैद्धान्तिक परिप्रेक्ष्य
प्रो. नरेंद्र मानमोठे


आधुनिक समाजशास्त्रीय विचारों का
सैद्धान्तिक परिप्रेक्ष्य
प्रो. नरेंद्र मानमोठे
PeX
Publication
JAIPUR • (INDIA)

अपेक्स पब्लिकेशन
118, चित्रगुप्त नगर प्रथम,
इमलीवाला फाटक, गांधी नगर,
जयपुर – 302 015 (भारत)
Mob.: +917891981213
Email: apexpublicationjpr@gmail.com

आई.एस.बी.एन. : 978-81-950360-9-7
© सर्वाधिकार अधीन : 2021

टाइपसेटिंग : अपेक्स पब्लिकेशन, जयपुर

प्रिंटिंग प्रेस : थॉमसन प्रेस, नई दिल्ली

प्रकाशन से पूर्व लिखित अनुमति प्राप्त किये बिना मात्र उद्धरण के अतिरिक्त अन्य किसी भी उद्देश्य से इस ग्रन्थ के किसी भी अंश का किसी भी रूप में यांत्रिक इलेक्ट्रोनिक, फोटोस्टेट, ध्वन्यालेखन अथवा अन्य किसी भी विधि से प्रतिलिपीकरण, प्रेषण अथवा अनुवाद सर्वत निषिद्ध है।



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
आणि
श्री दादासाहेब गवई चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित

तक्षशिला महाविद्यालय, अमरावती समाजशास्त्र विभाग
आणि
मराठी समाजशास्त्र परिषद
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

मराठी
३० समाजशास्त्र परिषदेचे
वे
राष्ट्रीय अधिवेशन
दि. १३ व १४ जानेवारी
२०२०

-: विषय :-
भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती

स्थळ
"राजवाडा"
देशमुख लॉन समोर, शेगाव नाका रोड, अमरावती

आयोजक
समाजशास्त्र विभाग
तक्षशिला महाविद्यालय, अमरावती

		मगगम	
48	भारतातील सामाजिक चळवळी आणि समाजशास्त्र	डॉ.आचार्य आर.डी.	214
49	भारताच्या सामाजिक परिवर्तनामध्ये समाजशास्त्राची उपयोगिता	प्रा. अस्मिता रामभाऊ ठोंबरे	219
50	भारतातील सामाजीक चळवळी आणि समाजशास्त्र	डॉ. देविदास श्रीराम भगत	223
51	डॉ. जी.एस. घुर्ये यांचे समाजाशास्त्रातील योगदान	प्रा. स्मिता रा. देवर	226
52	डॉ. एम् एन् रॉय यांचे भारतीय समाजशास्त्रात योगदान	डॉ.दीपक कृष्णराव पवार	230
53	भारतातील समकालीन स्त्रीयांच्या चळवळी	कु.गोदावरी विठ्ठलवन वन	237
54	डॉ. जी. एस. धुर्ये यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान	प्रा. लक्ष्मण बापुराव नैताम	245
55	थोर समाजशास्त्रज्ञा डॉ. सुधाताई काळदाते	प्रा. डॉ. वायभासे शिवाजी विठ्ठलराव	248
56	भारतातील सामाजिक चळवळी आणि समाजशास्त्र	प्रा.सौ.माधुरी गोविंद गिरी	249
57	सामाजिक चळवळी एक समाजशास्त्रीय अध्ययन	प्रा. डॉ. वळीराम परशराम अवचार	251
58	स्त्री सुधारणा आणि सामाजिक चळवळी	डॉ. पी. एल. अंबोरे	255
59	भारतातील सामाजिक चळवळ (स्त्रीमुक्ती चळवळ)आणि समाजपाम्त्र	प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार	258
60	भारतिय समाजशाम्त्रज्ञाचे समाजशास्त्रात योगदान	प्रा. संतोष विश्वनाथ यादव	262
61	भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान	मनोहर भी. येरकलवार	266
62	महाराष्ट्रातील दलित चळवळीचे संघटन आणि नेतृत्व- समाजशास्त्रीय अध्ययन.	डॉ.हेमंत सोनकांबळे	269
63	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान	डॉ. राजेंद्र फकिरा बगाटे,	276
64	महाराष्ट्रामधील समाजशास्त्र विकासाच्या वाटचालीमध्ये डॉ. जी. एस. घुर्ये यांचे योगदान	प्रा. धिर्माधिमे किरणकुमार मोहन	285
65	भारताच्या सामाजिक परिवर्तनामध्ये समाजशास्त्राची उपयोगीता	श्री. अशोक रामचद्र गोरे डॉ. ता.प. सोडगे	289
66	समाजशास्त्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यान्च्या विचारातील सामाजिक क्रांती	प्रा. डॉ. शाम ग. दुतोंडे,	292
67	भारतातील समाजशास्त्राचा विकासः एक समाजशास्त्रीय अध्ययन	डॉ. श्रीनिवास पिलगुलवार	296
68	सद्यस्थितीतील समाजशास्त्रज्ञासमोरील आव्हाने	डॉ. मिसाळ हनुमंत दामोधर	304
69	"औरंगाबाद शहराचा सामाजिक विकास" समाजशास्त्रीय महत्वः	डॉ. वर्डे नंदलाल भिमराव	308
70	भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान	प्रा.बोराडे तानाजी रामभाऊ	311
71	भारतात समाजशास्त्राचा विकास (Development of Sociology in India)	प्रा. डॉ. रामेश्वर एम. मोरे,	314
72	३० वी मराठी समाजशास्त्र परिषद अमरावती.	डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे,	320

तपोशक्ती महाविद्यालय, अमरावती समाजशास्त्र विभाग आणि मराठी समाजशास्त्र परिषद-२०२०

डॉ. जी. एस. घुर्ये यांचे समाजाशास्त्रातील योगदान

प्रा. स्मिता रा. देवर
पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग
श्रीमती. राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला

भारतीय समाज हा आदिम काळापासून तर आजपर्यंत अनेक सामाजिक आर्थिक सांस्कृतिक, जातीय, वांशिक, राजकीय, औद्योगिक इत्यादी बदल झालेत. अनेक समस्यापण निर्माण झाल्या त्यांचा सविस्तर अभ्यास समाजाच्या विकासाच्या दृष्टीने करणे गरजेचे आहे. त्यासाठीच स्वतंत्र्यपूर्व काळ असो स्वतंत्र्योत्तर काळ असो की, वर्तमान काळ असो. समाजात सामाजिक अस्थिरता निर्माण होउ नये यासाठी समाजाच्या सर्वच पैलूंचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास होणे गरजेचे आहे. हा अभ्यासच वर्तमान व भविष्यात उद्भवणाऱ्या अडचर्णीना सोडविण्यासाठी मदत करत असतो. समाजात मुळातून अभ्यास करण्याचे काम सामाजिक संशोधन व समाजशास्त्र करत आले व करत आहे. या समाजशास्त्रज्ञांचा भारतीय समाजाचा अभ्रूास करण्यासाठी त्यांच्या समस्या व उपाया करण्यासाठी फार मदत पूर्ण ठरत आहे. म्हणून प्रस्तुत निबंधात डॉ. जी.एस. घुर्ये यांच्या समाजशास्त्रीय विचारांचा यांचा थोडक्यात अभ्यास केला आहे.

संशोधनाची उदिदष्टये :

- डॉ. जी.एस. घुर्ये यांचे समाजशास्त्रातील योगदान अभ्यासणे.
- वर्तमानकाळातील समाजव्यवस्थेत डॉ. जी.एस. घुर्ये यांच्या विचारांची प्रासंगीतकता अभ्यासणे.
- जातीव्यवस्थेत झालेल्या बदलांचा डॉ. जी.एस. घुर्ये यांच्या दृष्टिकोनातून अध्ययन करणे.

डॉ. गोविंद सदाशिव घुर्ये हे ब्रिटीश कालीन समाजशास्त्रज्ञ व अभ्यासक ज्यांनी भारतीय समाजशास्त्राचा मूलभूत पाया घलण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. घुर्ये यांचा जन्म १२ डिसेंबर १८९३ रोजी मालवण येथे झाला. इंग्रजी व संस्कृत या दोन विषयांमध्ये त्यांनी प्राविण्य प्राप्त केले. १९२३ च्या सुमारास Ethnic Theory of Cast या प्रबंधाबद्दल केंब्रिज विद्यापीठाने त्यांना आचार्य ही पदवी बहाल केली. १९२४ च्या सुमारास भारतात परत आल्यानंतर मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य करू लागले. मुंबईत १९५२ झाली The Indian Sociological Society या संस्थेची स्थापना करण्यात विशेष पुढाकार घेतला. समाजशास्त्रीय पत्रिका (Sociological Bulletin) हे नियतकालिक प्रकाशित करण्यास सुरुवात केली. १९३२ साली Cast and Race in India या ग्रंथाचे प्रकाशन केले. आदिम समाजव्यवस्थेचे सूक्ष्मदृष्ट्या अध्ययन करून १९४३ साली The aborigines so called and their future नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. भारताचे मूळ रहिवासी हे आदिवासी लोक आहेत त्यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण या ग्रंथात केलेले आहे.

१९५३ मध्ये The Indian Sadhus भारतातील साधू लोकांची समाजशास्त्रीय दृष्ट्या त्यांनी विवेचन केले आहे. १९६० साली After a century and Quarter या ग्रंथात भारतीय समाजव्यवस्थेत कोण कोणत्या प्रकारची स्थित्यंतरे घडून आली याचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. भारतातील बहुसंख्य लोक मूर्ती पूजेच्या स्वीकार का करतात? याचा अभ्यास Gods & Men या ग्रंथात केलेला आहे. ग्रामीण व नागरी समाजाचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी १९६३ मध्ये Anatomy of a Rururban Community या ग्रंथातून अध्ययन केले धार्मिक स्वरूपाच्या जाणिवांचा अभ्यास करण्यासाठी

करत असत. त्यामुळे व्यक्तींना नवीन प्रदेशात नवीन जाती पोटजाती ओळखाव्या जात असे. मात्र आता हे प्रमाण कमी झाले आहे. युरोपीयन देशात व्यापार किंवा शिक्षणासाठी गेलेल्या व्यक्तींना देशाच्या नावाने ओळखले जाते मात्र त्यांची जात किंवा पोट जात महत्त्वाची नाही. काही ठिकाणी भाषा विविधतेमुळे वेगवेगळेपणा, रंगामुळे वेगळेपणा यामुळेसुद्धा फरक होतो. पण आजची स्थिती समाजात फार कमी दिसून येते. कारण समाजात व्यक्ती स्वत:च्या प्रयत्नाने मग तो स्त्री-पुरुष कोणत्याही भाषा वर्णाचा असो उच्च पद प्राप्त करून घेऊ शकतो. इतर प्रांतात देशात थांबणे वास्तव्य करू शकतो त्यामुळे सदर व्यक्तीला वेगळा ओळख दिली जात नाही. पूर्वी जाती पोटजाती निर्माण होण्यासाठी जे घटक होते आज ते लागू पडत नाहीत. समाजाची वैचारिक पातळी उंचावल्याने हा बदल दिसून येतो. त्यामुळे मिश्रविवाह, व्यवसायिक भिन्नता, धार्मिक पंथभेद, आहार संकल्पना, रीतीरिवाज यांचा समाजावर असलेला असा कमी होताना दिसतो. कारण आत्ताच समाज आंतरजातीय विवाहाला मान्यता देतो. कोणतीही व्यक्ती सर्वप्रकारचे आहार आज घेतो सांस्कृतिक चालीरिती रूढी, परंपरा यावर कोणत्याही एका समाजाचा पगडा राहिलेला नाही असे दिसते.

जातीव्यवस्थेची वैशिष्ट्ये व सद्यस्थिती

डॉ. घुर्ये यांची जातिव्यवस्थेची वैशिष्ट्ये मांडली आहेत की, जी योग्य आहेत समाजाची अनेक खंडात विभागणी झाली आहे. प्रत्येक समाजात लहान-मोठा वरिष्ठ कनिष्ठ असा भेद होता. जातीनुसार सामाजिक धार्मिक व्यवसायिक अधिकार मिळत असत. व्यवसाय निवडीवर जाती मुळे मर्यादा येत होत्या. जोडीदार निवडीवर मर्यादा होत्या, सामाजिकरण्याचा दृष्टिकोन हा फारच कमी होता, मात्र आजच्या काळात आपणास आढळते की, समाजात व्यवसाय निवडतांना जात मध्ये येत नाही, कोणताही व्यक्ती स्वच्छे नुसार व्यवसायाची निवड करून व्यवसाय कौशल्य प्राप्त करून घेऊ शकतो व व्यवसाय करतो. जोडीदार निवडीवर मर्यादा आहेत मात्र हा नियम काळानुसार शिथिल होत आहे. आज शैक्षणिक दर्जा पासून आर्थिक दर्जा पाहून विवाह होताना दिसतात. जातीला महत्व कमी प्रमाणात आहेत. प्रेम विवाह मुळे सुद्धा जोडीदार निवडीच्या मर्यादा कमी झाल्या आहेत. कोणत्याही व्यक्ती तो कोणत्याही प्रदेशाच्या, राज्याचा, धर्माचा, वंशाचा असो की, तो कोणत्याही गटात सामील होऊ शकतो. मग तो राजकीय गट असो, व्यवसायिक गट असो किंवा उद्योग किंवा शिक्षण घेणारा-देणारा गट प्रशासकीय गट असो.

ग्रामीण समाजाचे अध्ययन व सद्यस्थिती :

२९. एमील दुरखिमचे आत्महत्या संबंधी सामाजिक विचार /
डॉ. अनिल ठाकरे १३९
३०. १९६० नंतरची दलित कथा : एक आकलन /

डॉ. राधाकमल मुखर्जी - एक समाजशास्त्रज्ञ

स्मिता रामेश्वर देवर
पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग
श्रीमती राधादेवी गोयनका महीला महाविद्यालय, अकोला

कलकत्ता विद्यापीठात अर्थशास्त्राचे व समाजशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण घेत असताना वीरेंद्र नाथ सील, विनयकुमार सरकार व मुंबई विद्यापीठातील पॅट्रिक गेडीस यांचा प्रभाव राधाकमल मुखर्जी यांच्यावर होता.

अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, जीवशास्त्र, तत्त्वज्ञान, धर्म, कला, इतिहास व राजकारण इत्यादी विविध विषयांवर डॉ.राधाकमाल मुखर्जींनी प्रचंड लेखन केले आहे.भारतीय अर्थव्यवस्थेला सामाजिकतेची व मानव्यतेची जोड देण्यात डॉक्टर मुखर्जी यांचे मोठे योगदान आहे. भारतीय लोकसंख्या वाढीचा वेग, शेतजमिनी विषयक समस्या, अन्नधान्याचे व कुटुंब व्यवस्थेचे नियोजन, श्रमिक वर्गाच्या समस्या, नियोजनबद्ध अर्थव्यवस्था, प्रादेशिक समाजशास्त्र, सामाजिक पर्यावरण मानव व त्यांचे वसतीस्थान, सामाजिक मूल्यव्यवस्था, भारतीय संस्कृती, सामाजिक शास्त्राचे तत्वज्ञान, प्रतीक वाद, इत्यादी अनेक विषयांवर मुखर्जींनी ग्रंथ प्रकाशित केले.

यासोबतच समाजशास्त्र व अन्य विषय प्रकाशित केलेले ग्रंथ पुढीलप्रमाणे- regional Sociology 1926 Social ecology 1940, Man and His Habitation 1940, Social Foundation of Art 1948, Social Structures of Value 1949, History of Indian Civilization 1956, Culture and Art of India 1959, Philosophy of Social Science 1960 etc.

भारतीय समाजशास्त्राच्या संदर्भात डॉ. राधाकमल मुखर्जींचे योगदान..मूल्य व्यवस्था, प्रदेशवाद, प्रतीक वाद व भारतीय संस्कृतीशी निगडित असल्याने त्याचे समाजशास्त्रीय दृष्ट्या विवेचन करणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर भारताच्या नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणात राहून भारतीयांना ज्या पद्धतीचे जीवन आवश्यक आहे त्या जीवन पद्धतीवर प्रभाव टाकणाऱ्या विविध घटकांचा विश्लेषण पूर्ण अभ्यास डॉ. मुखर्जींनी केला आहे त्यांनी मांडलेले विचार आज वर्तमान काळातही लागू पडत आहेत यावरून त्यांची दूरदृष्टी निश्चित दिसून येते. भारतीय समाज व्यवस्थेतील समस्याप्रधान विषय आंतरराष्ट्रीय मंचावर उपस्थित करुन त्या सोडविण्यासाठी विद्वानाचे मार्गदर्शन आणि आंतरराष्ट्रीय संघटना चे आर्थिक व तांत्रिक सहकार्य घेण्याच्या उद्देशातून डॉक्टर मुखर्जींचे योगदान महत्त्वाचे आहे.

डॉक्टर मुखर्जी यांनी मांडलेले विचार पुढील प्रमाणे...

१. समाजाकडे व सामाजिक शास्त्राकडे डॉक्टर मुखर्जींचा पाहण्याचा दृष्टिकोण.

सामाजिक शास्त्रात समाजशास्त्र हे सर्व शास्त्रांना घेऊन चालत असल्यामुळे

समाजव्यवस्था, सामाजिक मूल्य मानवाचे अंतर्गत व बहिर्गत वर्तन सामाजिक व सांस्कृतिक जीवन पद्धत अनेक घटकांचा प्रभाव, समाज जीवनाच्या विविध क्षेत्रांवर सातत्याने पडत असतो. त्यामुळे एखाद्या सामाजिक घडामोडीचे अथवा समस्येचे अध्ययन करतेवेळी एकाच अध्ययन पद्धतीने अथवा अध्ययनाचे तंत्र सामाजिक शास्त्रात अवलंबता येत नाही असे त्यांचे मत होते. म्हणजे समाजशास्त्राचा अभ्यास करताना विविध अभ्यास शास्त्राचा अवलंब करणे मुखर्जी यांना अभिप्रेत होते कारण समाज शास्त्र हे अनेक सामाजिक शास्त्रांना एकत्रितरीत्या घेऊन चालणारे शास्त्र आहे त्यामुळे कोणा एका वैज्ञानिक पद्धतीने समाजशास्त्राचा अभ्यास होऊ शकत नाही. समाजशास्त्र हे जरी आदर्शवादी शास्त्र म्हणून ओळखले जात नसले तरी ते उपयोजित किंवा क्रियाभिमुख शास्त्र म्हणून संबोधले जाते. सामाजिक घडामोडी मधील अथवा सामाजिक समस्या मागील वास्तवता जोपर्यंत स्पष्ट होत नाही तोपर्यंत त्या घडामोडीवर अथवा समस्येवर कोणत्याच प्रकारच्या उपाययोजना राबवता येत नाही असे मत राधाकृष्णन मुखर्जी यांचे होते. समाजशास्त्राकडे डॉक्टर मुखर्जीचा पाहण्याचा दृष्टिकोण तात्विक समाजशास्त्रीय व तार्किक समाजशास्त्रीय असा दुहेरी स्वरूपाचा आहे.

तार्किक मुल्ये ही बऱ्याच अंशी मानवी कल्याणाशी व आदर्श वादाची जरी निगडित असली तरी ती कितपत तार्किक वास्तववादी आहेत याचेही विश्लेषण समाजशास्त्रीय संशोधकांनी केले पाहिजे अशी अपेक्षा मुखर्जी व्यक्त करतात, म्हणून त्यांनी समाजशास्त्र विचार परंपरेत तार्कीक समाजशास्त्र दृष्टिकोनाचा पुरस्कार केला. तर्कशास्त्रीय विवेचन हे बुद्धी वादावर व विज्ञान निष्ठेवर आधारलेले असते. भौतिक शास्त्रे, सामाजिक शास्त्रे व तंत्रज्ञान याची उद्दिष्टे ही एकमेकांपासून भिन्न असल्यामुळे विशिष्ट अभ्यास पद्धतीचा अध्ययन तंत्राचा सामाजिक शास्त्रात अवलंब करण्याकडे त्यांनी भर दिलेला आहे विशेषतः समाजशास्त्राच्या अध्ययनात विविध घटकांच्या मर्यादा पडत असतात असे मुखर्जींचे मत आहे.

२. प्रादेशिक समाजशास्त्र १९२६ साली राधाकमल मुखर्जींनी' Regional Sociology हा ग्रंथ प्रकाशित करून समाजशास्त्रीय अभ्यासाच्या विषयावर प्रादेशिक समाजाच्या मर्यादा टाकल्यास त्या विषयाचे अध्ययन कोणत्याही अभ्यासकाला सहज पडणे करणे सोपे जाते, असे मत मुखर्जी यांनी मांडले. संपूर्ण समाजाचे स्वरूप व व्याप्ती सामाजिक समस्यांची क्लिष्टता व गतिशीलता समाज रचनेतील व सामाजिक संबंधातील वैविधतालक्षात घेतल्यास विशाल मानव समाजाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे अत्यंत कठीण आहे अशा परिवर्तनशील व क्लिष्ट मानव समाजाच्या सुक्ष्म अध्ययनासाठी अभ्यास विषयावर कोणत्याही प्रदेशाची मर्यादा टाकणे हे चुकीचे ठरेल असे मत मुखर्जी यांनी मांडले आहे.

३. गुढ अध्यात्मवाद व मूल्यांची विश्लेषण गुढ अध्यात्मवादाचे विवेचन करतेवेळी त्यांनी तीन सूत्राचा अवलंब केला आहे. पहिले सूत्र असे सूचित करते की गूढ अध्यात्मवाद मानवी मनाला शांती व समाधान प्राप्त करून देतो, दुसऱ्या सुत्रास नुसार गूढ अध्यात्म वादामुळे मानवास

नैतिकतेची जाणीव प्राप्त होत असते, आणि तिसऱ्या सूत्रांनुसार स्वतःच्या कठोर परिश्रमातून व स्वयंशिस्तीचा माध्यमातून व्यक्तीचे उन्नयन होत असते.

४. मूल्य व्यवस्थेचे प्रादेशिक तत्व गुड अध्यात्मवादाच्या तत्त्वावर मूल्य व्यवस्थेचे मुखर्जींनी ज्या पद्धतीने विश्लेषण केले त्याचप्रमाणे प्रादेशिक तत्त्वाच्या आधारावर मूल्य व्यवस्थेचे विवेचन त्यांनी १९४९ साली प्रसिद्ध केलेल्या The Social Structure of Value या ग्रंथात केले. आपल्या मूल्य विषय सिद्धांत मांडते वेळी त्यांनी सामाजिक मानसशास्त्राची जोड घेतली आहे.त्यांच्या मते एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा मानवी समूह म्हणजे परस्पर पूरक संबंधाचे एक जाळेच आहे. रूढी, परंपरा व संस्कृती घडविण्यात संबंधित भूप्रदेशातील पर्यावरणाचे घटक प्रभावीपणे कार्य करीत असतात. आपले अस्तित्व व विकास साध्य करतेवेळी मानवी समूहातील लोक वनस्पती, प्राणी व मानवा सभोवतालची जैविक व अजैविक परिस्थितीशी नेहमी मदत करीत असतात, प्रादेशिक समाजाची आर्थिक, सामाजिक, संस्कृती व व्यावसायिक मूल्य त्या त्या प्रदेशाच्या पर्यावरणात्मक घटकांवर आधारलेली असल्याने मूल्य व्यवस्थेत भिन्नता आढळून येते. पर्यावरणात स्वभाविक पद्धतीने अथवा मानवी हस्तक्षेपापासून जसजसा बदल होतो त्याप्रमाणे मूल्य व्यवस्थेतही बदल होत जातो म्हणून विशिष्ट भूप्रदेश व मुल्ये यांच्यातील संबंध प्रकट करण्याचा प्रयत्न मुखर्जींनी आपल्या मूल्य विषयक सिद्धांतात केला आहे. प्रदेशाचा अभ्यास करते वेळीमुखर्जींनी सर्वप्रथम प्रादेशिक समतोल यावर विशेष भर दिला आहे, त्याचप्रमाणे वनस्पती, प्रदेश व व्यक्ती यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास केला. मानव एकत्र येण्याची कारण केवळ प्रदेश असू शकते असे नाही तर त्यांचे परस्पर संबंध मानवी संस्था, माती, हवामान, वनस्पती इत्यादी नैसर्गिक घटकांचा महत्त्वाचा वाटा आहे, म्हणजेच एका विशिष्ट प्रदेशातील मानवाचा अभ्यास करताना त्यात वास्तवास कारणीभूत घटक आणि सोबतच तेथील प्रदेशाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. म्हणजेच व्यक्तीच्या संबंधाचा सोबतच व्यक्तीच्या भौगोलिक व नैसर्गिक वातावरणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

५. मुल्ये व प्रतिके मानवा सभोवतालच्या वैविध्यपूर्ण विश्वात मानव मूल्य प्रतीके यांचा नवीन शोध घेत असतो त्यांच्यामध्ये सुसंस्कृत मानवाच्या मनातून मूल्य विषयक व प्रतिकार विषयक विचार विकसित होत असतात व याच आधारावर मानवी संबंध दृढ होत असतात मूल्य व प्रतीके हे विविध स्तरातील लोकांना जोडण्याचे काम करत असते जनसंपर्काचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून मुल्ये व प्रतीके यांना महत्त्वाचे स्थान आहे. समाजाने विकृत केलेली जीवनात प्राणी म्हणजे मूल्य होय समाजामध्ये नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी व समाज व्यवस्था टिकण्यासाठी समाजामध्ये ज्या गोष्टींना मान्यता दिली जाते व ज्या प्रकारे वाटचाल केली जाते त्याला मूल्य असे म्हणतात सुसंघटित समाज निर्मितीसाठी मूल्य व्यवस्था आवश्यक आहे असे मुखर्जी यांचे मत आहे. पण मूल्यांचा विचार प्रतीकात्मक पातळीवर केला पाहिजे असे मुखर्जी यांचे मत होते.मुलेही जेव्हा सारांश आत्मक स्वरूपातून व दुधी करण्याच्या स्वरूपातून अभिव्यक्त केली जातात तेव्हाच त्यांना प्रतीकांची स्वरूप प्राप्त होते मानवी समाजात प्रत्येक मूल्याची प्रतीके

वेगळी असतात व या प्रत्येक प्रतिकांचा असे वेगवेगळ्या परिस्थितीत वेळ लागतो नैतिक मूल्ये यांच्या पायावर जगाची पुनर्रचना होऊ शकते असे मुखर्जी यांचे मत होते.

६. व्यक्तिमत्व मूल्य प्रत्येक समाजामध्ये जी मूल्ये असतात त्या मूल्यांचा प्रभाव प्रत्येक व्यक्ती व त्याच्या व्यक्तिमत्त्वावर हा सातत्याने पडत असतो मूल्यांच्या अस्तित्वामुळे व्यक्तींचा गुणात्मक विकास साध्य होतो व या विकासामुळे प्रत्येक व्यक्ती मूल्याच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी सतत प्रयत्न करत असतो. परंतु काळानुरूप या मूल्यांमध्ये बदल होतो व यामुळे जुनी मुल्ये रचना व नवीन मुल्ये रचना निर्माण होतात त्याच मुळे नवीन पिढी व जुनी पिढी यांच्यामध्ये आपल्याला मूल्य संघर्ष प्रकर्षाने आढळून येतो. मूल्यांमुळे व्यक्ती वर्तन घडत असते व या च्यक्तीच्या वर्तन क्रमात एका पातळी करून दुसर्या पातळीकडे कसा बदल होतो याचे तीन प्रकारे विवेचन मुखर्जी यांनी केले आहे पहिल्या प्रकारात आपले सामाजिक संबंध सुधारावेत व ते सुधारण्यासाठी आपली मुले विशेष जाणीव समृद्ध करण्याचा व्यक्ती प्रयत्न करते. तर दुसऱ्या प्रकारात मानसिक एकात्मता दृढ करण्यासाठी व्यक्ती सतत झगडत राहत असते स्वतःचा संपूर्ण विकास करण्यासाठी आपल्या समाजबांधवांची प्रेमाने व सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करते. तिसऱ्या प्रकारात व्यक्ती अध्यात्मिक आणि परमार्थिक मूल्यांचा समावेश करून घेते व त्यानुसार वाटचाल करते. व्यापक उदारमतवादी व विशाल आचार विचारांच्या पायावरच व्यक्तीचे सामाजिक व मूल्य विशेष स्थान निश्चित होत असते असा मूलभूत विचार मुखर्जी यांनी मूल्य विषय सिद्धांत मांडला आहे.

७. समाजाचा सामान्य सिद्धांत समाजाचे संरचनात्मक व कार्यात्मक स्वरूप लक्षात घेऊन मानवी समाजाचा सामान्य सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न मुखर्जी यांनी केला. हा सिद्धांत मांडताना मूल्य व्यवस्थेचा उगम व विकास व्यक्ती व समाज यांच्यातील एकात्मतेची आवश्यकता समाजव्यवस्थेचे बदलते स्वरूप आणि सामाजिक शास्त्रातील अन्य शाखांचा समाजशास्त्राची असणारा संबंध याचा परिपूर्ण अभ्यास केलेला आहे.व्यक्ती हा समाजात राहत असतो समाजात राहत असताना त्याला बरेच बरे वाईट अनुभव आलेले असतात या अनुभवातूनच तो आपकी जीवन मूल्य जीवननिष्ठा व जीवन पद्धती निर्धारित करत असतो व त्यानुसार जीवन व्यतीत करतो मुखर्जी यांच्या मते व्यक्तीची जडणघडण ही पर्यावरणात्मक, मानव सामाजिक, आणि आधि-नैतिक, या तीन स्तरावर होत असते.

८. समाजशास्त्र व सामाजिक शास्त्र यातील संबंध मुखर्जी हे भारतीय विचारवंत होते त्यांनी अनेक सिद्धांत मांडले मानव समाजाचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन केले व ते करतेवेळी समाजाचा सामान्यसिद्धांत मांडला त्याचबरोबर पर्यावरणात्मक सिद्धांत, समाजशास्त्रीय सिद्धांत व मूल्य व प्रतीकात्मक सिद्धांत, सुद्धा मांडला व एवढेच नाही तर या सर्व सिद्धांत यांमधील परस्पर पूरकता व सहसंबंध हासुद्धा विषद त्यांनी केलेला आहे.सामाजिक विज्ञान अंतर्गत येणाऱ्या शास्त्रांचा अभ्यास करताना कोणा एका शास्त्राचे ज्ञान असणे आवश्यक नसून बहुअंगी विविध ज्ञानशाखांचा अवलंब करणे आवश्यक आहे त्यामुळे नवीन शोध लागतात व मानवी जीवन

अधिक समृद्ध व सुखी करण्याचा व जीवनाला अर्थ प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जातो. समाजव्यवस्थेचे व समाज जीवनाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करतेवेळी ही सामाजिक मूल्यांचा आधार घेण्याचा प्रयत्न सर्व मानव्यशास्त्र करीत असतात त्यामुळे समाजशास्त्र पेक्षा सामाजिक विज्ञान अंतर्गत विषयाची व्याप्ती अधिक विशाल स्वरूपाची आहे समाजजीवनाचे प्रत्येक क्षेत्र वेगळे करून अध्ययन करण्याऐवजी जीवनाच्या विविध अंगाचा संपुर्णरित्या व शास्त्र सामाजिक शास्त्रज्ञांनी स्वीकार करावा व त्यानुसार अभ्यास करावा अशी अपेक्षा मुखर्जी यांची आहे. समाजशास्त्र हे सर्व सामाजिक शास्त्रात पैकी व्यापक शास्त्र आहे असे ते म्हणतात प्रत्येक समाजातील विविध समस्यांची कारणमीमांसा व त्या सोडवण्यासाठी त्यावर उपाययोजना करण्यासाठी अनेक मार्गांचा व साधनांचा व दृष्टीकोनाचा अवलंब करण्याच्या हेतूने समाजशास्त्राला महत्त्वाचे कार्य करावे लागते असे यांचे म्हणणे आहे. अभ्यासकांनी समाजाच्या विविध अंगांचा अभ्यास करून नवीन सिद्धांत मानण्यात प्रयत्न करीत रहावे असे त्यांचे मत आहे.

९. मूल्यांची वैशिष्ट्ये डॉक्टर मुखर्जी यांनी समाजशास्त्रात मूल्यांचे समाजशास्त्र ही नवीन शाखा उदयास आणली, समाजाची अभ्यास करताना आंतरिक संबंध समाज जीवन संस्कार पद्धती मूल्यव्यवस्था आणि संस्कृती हीच संबंध जाणून घेतल्याशिवाय समाजाचा सूक्ष्मपणे अभ्यास करता येत नाही म्हणजेच मूल्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रत्येक समाजात आढळून येणारी मूल्यव्यवस्था ही त्या समाजाच्या नैसर्गिक व भौगोलिक परिस्थितीशी निगडित असते त्यामुळे प्रत्येक समाजाची मूल्य व्यवस्था ही भिंत दिसते आदिल समाज ग्रामीण समाज नागरी समाज किंवा पाश्चिमात्य समाज येथील प्रत्येकाचा जीवन विषयक दृष्टीकोण व वर्तन विषयक दृष्टिकोन हा भिन्न दिसून येतो म्हणजेच मूल्यव्यवस्था निर्माण होण्यास बरेच वेळा भौगोलिक परिस्थिती सुद्धा कारणीभूत असते असे मुखर्जी यांचे मत होते समाजामधील असलेली मूल्यव्यवस्थेला सर्व समाजाने स्वीकार केल्यास सामाजिक कल्याण व सामाजिक संघटन साध्य होऊ शकते म्हणजेच मूल्याधिष्ठित समाज व्यवस्थेची निर्मिती यामुळे व्यक्तीचे अंतर्गत व बहिर्गत वर्तन निर्धारित करते आणि सामाजिक एकता व संघटन सुनिश्चित होण्यास मदत होते. मूल्य ही सांस्कृतिक जीवनाचे एक मूलभूत असे कारण आहे ज्यामुळे समाजव्यवस्था आपले अस्तित्व टिकवून ठेवते. मूल्यांचे महत्त्व सांगताना त्यांनी मूल्यांची काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

अ. क्लिष्टता मानवी समाज हा विविध पूर्ण आहे समाजामध्ये जेवढी विविधता आढळून येते तेवढेच मूल्य विविधताही आहे आणि त्या मूल्य विविधतेमुळे समाजामध्ये क्लिष्टता निर्माण झालेली दिसून येते वैयक्तिक व सामाजिक मूल्यांचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवर परिणाम पडत असतो.

ब. सार्वत्रिकता मानवी समाज हा सर्वत्र दिसतो समाजाचे अस्तित्व व सातत्य टिकवण्याच्या प्रक्रियेत मूल्यांचा वाटा खूप मोठा आहे एवढेच नव्हे तर मुल्ये नीतिमूल्यांसी निगडित असल्याने त्यांचे संरक्षण व संवर्धन करणारी एक विशिष्ट व्यवस्था समाजात निर्माण होते व त्याकरिता ती

व्यवस्था प्रयत्नशील असते. समाज व्यवस्था चालवण्यासाठी अस्तित्व टिकवण्यासाठी व किमान गरजा भागवण्यासाठी ज्या मुल्यांची आवश्यकता असते अशा मूल्यांचा अंतर्भाव सार्वत्रिक मुल्यात केला जातो म्हणजे ही मूल्य प्रत्येक समाजात आपल्याला दिसून येतात.

क. व्यक्तिनिष्ठता मूल्यांचे स्वरूप हे सामाजिक व वैयक्तिक दोन्ही स्वरूपाचे असते व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासात वैयक्तिक मूल्यांची स्थान खूप मोठे मानले आहे जीवनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व विशिष्ट मार्गाचा अवलंब करण्यासाठी व्यक्ती स्वतंत्र असते व दैनंदिन जीवनात बऱ्यावाईट अनुभवातुन मूल्यांचा स्वीकार करते व त्यानुसार पुढील वाटचाल करून आपले आयुष्य सुखकर बनवण्याचा प्रयत्न करते.

ड. सांस्कृतिक महत्त्व समाज व्यवस्था व सांस्कृतिक व्यवस्था यांच्या घनिष्ठ संबंध आतून मूल्य व्यवस्थेचा उदय झाला आहे मूल्य हे व्यक्तीला जीवन जगण्याची व्यवस्था शिकवत असतात मूल्य व्यक्तीला रूढी परंपरा चालीरीती पेहराव जीवन विषयक दृष्टीकोण इत्यादींशी जुळून घेण्यास भाग पाडतात त्यामुळे समाजावर नियंत्रण प्रस्थापित राहतेच पण समाजाची वेगळी अशी ओळख निर्माण होते हीच वेगळी ओळख म्हणजे संस्कृती होय मूल्य जपल्यामुळे संस्कृतीचे जतन होते.

ई. सांकेतिकता मूल्यांचे स्वरूप हे जरी अमृत असले तरी मूल्यांना प्रकट करण्यासाठी काही ना काही सांकेतिक माध्यमांचा युवा प्रतीकांचा अवलंब करणे आवश्यक असते चांगल्या मुलांसाठी जी प्रतीके वापरली जातात त्यांना पवित्र स्वरूप प्राप्त झालेले असते अशी पवित्र मुल्ये संकेताच्या रुपाने व्यक्तीच्या मनावर बिंबवली जातात.

म्हणजेच आदर्श समाज व्यवस्थेसाठी आणि व्यक्तीचा अनैतिक दर्जा उंचावण्यासाठी मूल्य व्यवस्था अत्यंत आवश्यक आहे समाजाच्या मूल्य व्यवस्थेत कालानुरूप व परिस्थितीनुरूप बदल होण्याची अत्यंत आवश्यकता आहे काही कारणास्तव नवीन व जुन्या मूल्यात जर संघर्ष निर्माण होत असेल तर दोन्ही मूल्यांचा सुवर्णमध्य साधून वाटचाल करणे नेम योग्य राहील याबद्दल मुखर्जी यांचे दुमत नाही

१०. समूह मानसशास्त्र समाजात वावरत असताना प्रत्येक व्यक्ती सांस्कृतिक मानवी मूल्य व्यवस्थेच्या मर्यादेत राहून व्यक्तिमत्त्वाचा विकास साध्य करतो त्याच्या महत्त्वाकांक्षा परिपूर्ण करणे हे सामाजिक समूहाचे ध्येय असते आपल्या सभोवतालच्या भौतिक परिस्थितीशी समायोजन करून आपल्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न मानव करतो परंतु तरीही सामाजिक समूहाचे सभासदत्व स्वीकारून विविध प्रकारची कार्य करण्याचा तो प्रयत्न करतो एकाच वेळी अनेक सामाजिक समूहाचे अथवा संस्थांचे सभासद हा मानव असतो आपल्या गरजा व महत्वकांक्षा व्यक्तीला पूर्ण करावे लागतात त्यावेळी सामाजिक समूह त्याच्या मनाची अशा रीतीने जडण-घडण करण्याचा प्रयत्न करतो की ज्यामुळे समूहाच्या उद्दिष्टांना धोका पोहोचणार नाही व व्यक्तींची उद्दिष्टही साध्य होतीलपण जर एखाद्या समूहात व्यक्तीची उद्दिष्टे साध्य होत नसतील तर व्यक्ती दुसरा समूह किंवा सभासदत्व स्वीकारण्याचा प्रयत्न करतो. परंतु जर या समूहामध्ये व्यक्तीच्या उद्देश पूर्ण होत नसेल तर राग ,भावना व प्रेरणा यांचा उद्रेक होतो यातूनच व्यक्तीच्या

मनाची जडणघडण होते. म्हणजेच समूहामध्ये व्यक्तीला येणारे अनुभव याचा व्यक्तीच्या मानसशास्त्रावर परिणाम होत असतो.

राधाकमल मुखर्जी यांच्या समाजशास्त्रातील या योगदानामुळे भारतीय समाजशास्त्र ला एक नवीन दिशा प्राप्त झाली आहे तत्वज्ञान आणि विज्ञान या दोघांचा सुवर्णमध्य मुखर्जी यांनी साधण्याचा प्रयत्न केला आहे.विश्लेषण वर्णन आणि स्पष्टीकरण यांच्या आधारावर सामाजिक शास्त्राची मांडणी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला तसेच भौतिक शास्त्र तत्त्वज्ञान आणि मानव्यशास्त्रीय ही एकमेकांशी कशी पूरक आहेत हे सुद्धा त्यांनी स्पष्ट करुन सांगितली. तसेच अभ्यासकाने वस्तुनिष्ठता व व्यक्तीनिष्ठ दा याच्या मर्यादे पासून स्वतःला मुक्त ठेवावे तेव्हाच सिद्धांताची व्यवस्थित अध्ययन करता येईल असे त्यांचे मत होते एवढेच नव्हे तर भारतीय परिस्थितीच्या संदर्भात पाश्चिमात्य विचारवंतांनी किंवा समाजशास्त्रज्ञांनी मांडलेले विचार कितपत लागू पडू शकतील याचा देखील त्यांनी अभ्यास केलाभारतीय समाजशास्त्राला तत्त्वज्ञानाची व विज्ञानाची जोड देण्याला राधाकमल मुखर्जी यांचे मोठे योगदान आहे. मानव शास्त्राची व विज्ञानाची उभारणी ही तत्त्वज्ञानावर आधारलेली असली पाहिजे व त्यासाठी निगमनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात व त्यांनी भर दिला. अशाप्रकारे डॉक्टर राधाकमल मुखर्जी यांचे समाजशास्त्रातील योगदान आपल्याला स्पष्ट करता येईल त्यांनी समाजशास्त्राला वेगळी दिशा प्रदान करण्याचे काम केले आहे.

संदर्भ सूची :

१. आगलावे प्रदीप, पाश्चिमात्य व भारतीय विचारवंत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७
२ गजेंद्रगड व्ही.एन., भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९३
३ लोटे रा.ज, सामाजिक विचारवंत

PUBLISHED BOOK & PUBLISHED CHAPTER IN BOOK AND CONFERENCE PROCEEDING

DEPARTMENT OF ECONOMICS

2016 - 17 to 2020 – 2021

Sr. No.	Name of the Teacher	**Number of published Book & Chapter in Book and Conference Proceeding**					**Total**
		2016-17	2017-18	2018-19	2019-20	2020-21	
1	Dr. Nitin Choudhari	00	00	00	00	**02**	**02**
	Total	00	00	00	00	**02**	**02**


ISBN: 978-81-926813-0-6
भारतातील शिक्षण प्रणालीवर
कोविड-१९ चा झालेला परिणाम
डॉ. अनिल म. तिरकर
डॉ. वासुदेव द. गोलाईत
OM SAI
PUBLISHERS &
DISTRIBUTORS
PD

- भारतातील शिक्षण प्रणालीवर कोविड–19 चा झालेला परिणाम
- © डॉ. अनिल म. तिरकर
- © डॉ. वासुदेव द. गोलाईत

No part of this book shall be reproduced, stored in retrieval system or translated in any form or by any means- electronic, mechanical, photocopying and/or otherwise without the prior written permission of the publishers)

ISBN : 978-81-926813-0-6

- **प्रकाशन व मुद्रक :**
  श्री. गणेश राऊत
  प्लाट नं. २९, टी.बी. वार्ड च्या मागे,
  इंदिरा नगर, नागपूर - ४४०००३
  ई-मेल- ospdnagpur@yahoo.com

- **सेल्स ऑफिस :**
  ओम साई पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स,
  २९, इंदिरा नगर, टी.बी. वार्डच्या मागे,
  नागपूर-४४० ००३,
  मो.नं. ९९२३६९३५०६

- **अक्षर रचना :** अक्षरा टायपींग वर्क्स

(१४)

आभासी **शिक्षण** पध्दती विषयी समज-गैरसमज

डॉ. नितीन ज्ञानदेव चौधरी,
सहायक प्राध्यापक तथा विभाग प्रमुख
अर्थशास्त्र विभाग,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

प्रस्तावना :

शिक्षण व्यवस्था covid-19 काळातील शिक्षण व्यवस्था ही अकल्पनीय अशी आहे या काळात देशातील शिक्षण क्षेत्राने दहा वर्षापूर्वीच नंतरच्या स्थितीचा अनुभव घेतला मात्र हा अनुभव घेत असताना यासाठी देशातील जनता पूर्णपणे तयार होती का हा प्रश्न महत्वपूर्ण होता covid-19 हया जागतिक मामाने संपूर्ण विश्वाला आपल्या जीवनशैली बदलवण्यास भाग पाडले या महामार्ग मुळे विश्वातील प्रत्येक राष्ट्राला वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागले एकंदरीत संपूर्ण जागतिक संचार बंदी मध्ये या ऑनलाईन शिक्षणपद्धतीला महत्त्व प्राप्त होऊ लागले मोठ्या प्रमाणात ाश्चात्त्य राष्ट्रांत बरोबरच जगातील अनेक देशांमध्ये ही आभासी शिक्षण पद्धती वापरले जात आहे पण तू हे शिक्षण समाजातील प्रत्येक व्यक्ती अथवा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचते आहे का याचे उत्तर शोधुनही सापडणार नाही.

भारतातील परंपरागत शिक्षण पद्धती ही गुरू-शिष्य परंपरा असलेली शिक्षण पद्धती आहे येथे गुरुकुल शाळा महाविद्यालय यांच्या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या अध्यक्ष आतून जनार्दनाचे व ज्ञानदानाचे कार्य केले जात आहे परंतु covid-19 यामध्येसुद्धा एक क्रांती घडून आली जी शिक्षण पद्धती फक्त श्रीमंत वर्गातील लोकच प्राप्त करू शकत होते त्यामध्ये बदल होऊन आज covid-19 मुळे समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला ऑनलाईन शिक्षण कसे देता येईल याचा विचार केला जात आहे हया शिक्षण पद्धतीचा सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे कोणत्याही स्थळी काळी घेता येणारी शिक्षण होईल यालाच आभासी शिक्षणपद्धती असेसुद्धा म्हटले जाते .

राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर ऑनलाईन शिक्षणासाठी आवश्यक संसाधनांच्या उपलब्धीबाबतचे काही अभ्यास उपलब्ध आहेत. त्यातून ग्रामीण भागातल्या

जेमतेम २० ते २७ टक्के स्मार्ट फोन, इंटरनेट इ. सुविधा उपलब्ध आहेत हे अधोरेखित झालेले आहे.परंतु साधा फोनवर निरोप मिळण्याचीही सोय नसताना ऑनलाईन क्लासेसचा विचार हे गुलबकावलीचे फूल ठरावे असे वास्तव आपल्याकडे अस्तित्वात आहे हे आधी स्वीकारावे लागेल.

ऑनलाईन शिक्षण म्हणजे काय?

ऑनलाइन शिक्षण याचा सोपा अर्थ तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याला घरबसल्या शैक्षणिक सोयी-सुविधा मिळणे. शैक्षणिक संस्थेत न जाता प्रवेशापासून डिग्रीपर्यंतच्या सगळ्या गोष्टी आपण इंटरनेट या माध्यमातून मिळवू शकतो. यामध्ये...

- प्रवेश प्रक्रिया डिजिटल असणे
- पुस्तके व शैक्षणिक साहित्य इलेक्ट्रॉनिक (फक्त पीडीएफ नव्हे) स्वरूपात मिळणे.
- विषय शिकवताना ज्या संकल्पना महत्त्वाच्या असतात त्यांचे सहा ते सात मिनिटाचे छोटे व्हिडिओ युट्युब सारख्या माध्यमातून मुलांपर्यंत पोहोचविणे.
- ई-पुस्तके वाचण्यासाठीचे सॉफ्टवेअर तयार करणे.
- छापील पुस्तकांच्या डिजिटल आवृत्त्या तयार करणे.
- जसे प्रत्यक्ष वर्ग भरतात, तसे ऑनलाइन माध्यमातून वर्ग भरवणे.
- E-content वाचून किंवा बघून विद्यार्थ्यांना ज्या शंका उत्पन्न होतात त्याचे निराकरण करण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांच्यात थेट सुसंवाद घडवून आणणे.
- सत्राच्या शेवटी ऑनलाईन माध्यमातून परीक्षा घेणे.
- त्या परीक्षेसाठीचे प्रश्न कसे असतील त्याची उत्तरे विद्यार्थ्यांनी कशी लिहिणे अपेक्षित आहे त्याचे मूल्यमापन कसे केले जाईल याविषयी आराखडा बनवणे.
- परीक्षा आराखड्यानुसार त्या परीक्षा प्रत्यक्ष ऑनलाईन घेण्यासाठी पोर्टल सॉफ्टवेअर तयार करणे.
- एकाच वेळी परीक्षा घेता येतील अशा प्रकारची वेळापत्रकाची आखणी करणे.
- ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी जे गॅजेट लागतात उदाहरणार्थ डेस्कटॉप, कॉम्प्युटर, लॅपटॉप, स्मार्टफोन, चांगल्या दर्जाचे हेडफोन, वेगवान इंटरनेट याची रास्त दरात उपलब्धता असणे.

शिक्षणाबाबतचा कोणताही धोरणात्मक निर्णय घेताना 'सर्व मुलांना समान संधी' या घटनेतील मार्गदर्शक तत्वाला अनुसरूनच घेतला पाहिजे. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण पुरस्कृत

करताना त्याआधी सर्वांना समान access मिळेल यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, संसाधने सर्व मुलांपर्यंत कशी पोचतील, त्यासाठी शासनाचा कृती आराखडा काय आहे, त्यासाठी लागणाऱ्या अर्थिक तरतूदीची काय व्यवस्था केलेली आहे याचे ठोस नियोजन शासनाने मांडावे. यातली मेख अशी आहे की, हे काही एकट्या शिक्षण विभागाचे काम नाही; तर वीज पुरवठा करणाऱ्या महावितरण विभागापासून ते जिल्हा-तालुका प्रशासनापर्यंत आणि इंटरनेट सुविधा पुरवणाऱ्या शासकीय व खाजगी पुरवठादारांपर्यंत अनेक पातळ्यांवरच्या प्रशासनाने मिळून काम करणे अपेक्षित आहे. हे कसे साध्य करणार याचा कोणता विचार शासकीय-प्रशासकीय पातळीवर झाला आहे ते देखील सार्वजनिक व्यासपीठावर मांडले जाण्याची गरज आहे. अन्यथा घाईगडबडीने व अंधानुकरण पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेण्याच्या परंपरेचे पुन्हा एकदा पालन होईल व पुरेशा अभ्यासाच्या पायाअभावी ऑनलाईन शिक्षणाचा डोलारा कोसळेल.

यासंदर्भातला धोरणात्मक निर्णय घेताना केवळ संसाधनांची उपलब्धता या एकाच मुद्द्याचा विचार पुरेसा नाही, तर मुळात आपण या माध्यमाचा उपयोग कसा करू इच्छितो याची स्पष्टता असणे जास्त महत्त्वाचे आहे. शाळा व्यवस्थेला पर्यायी व्यवस्था म्हणून ऑनलाईन माध्यमाचा विचार शासन करत आहे की, शाळा व्यवस्थेला पूरक म्हणून डिजिटल माध्यमाचा विचार होत आहे याबाबतची स्पष्ट मांडणी होणे गरजेचे आहे.

तंत्रज्ञानाचा वापर नेमका कशासाठी याचा नीट विचार झालेला नसेल, तर ऑनलाईन शिक्षण म्हणजे जुनीच दारू नव्या बाटलीत भरून विकण्याचा प्रकार होईल. शिक्षणानुभवांना जीवनानुभवांशी जोडणे, माहितीच्या महासागरातून आपल्या गरजेची माहिती नेमकी गाळीव पद्धतीने निवडता येणे, पडताळून पाहता येणे, समस्यचे नेमके आकलन होऊन त्यावर परिस्थितीला सुसंगत असे उत्तर शोधता येणे या गोष्टी शिक्षण प्रक्रियेत महत्त्वाच्या आहेत. त्यांच्याअभावी अत्याधुनिक माध्यम वापरूनही शिक्षणाचा गाभा अधिक अर्थपूर्ण होऊन ते विद्यार्थीकेंद्री, काल व परिस्थितीसुसंगत आणि प्रभावी होण्याच्या शक्यता शून्य राहतील.

त्याजोडीनेच ज्यांनी हे आधुनिक माध्यम वापरून शिक्षण मुलांपर्यंत पोचवायचं त्यांची नीट पूर्वतयारी करून घ्यावी लागेल. यामध्ये केवळ तंत्रज्ञान कसे हाताळायचे याचे प्रशिक्षण तर द्यावे लागेलच पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण अधिक अर्थपूर्ण व प्रभावी करण्यासाठी नेमका कसा करायचा याची समज विकसित

होण्यासाठी मुख्यतः प्रशिक्षण करावे लागेल. शिवाय वर्षानुवर्षे रूळलेली सवयीची, सोयीची पद्धत सोडून नवी वाट चोखाळण्यासाठी मानसिक तयारी करून घ्यावी लागेल.

शाळेला पर्याय म्हणून पूर्णतः ऑनलाईन शिक्षणाचा कोणी विचार करत असेल तर त्यांना शाळा या केंद्राच्या अनेकपदरी भूमिकांची कल्पनाच नाही असे म्हणावे लागेल. अनेक मुलामुलींसाठी शाळा या निव्वळ शिक्षणकेंद्रे नसून त्यापेक्षा खूप काही आहे. ती वेगळ्या आधुनिक जगाची खिडकी आहे, मैत्रीचं अंगण आहे, काहींसाठी पोटभर खाणं मिळण्याची सोयही आहे. हंगामी स्थलांतर करणाऱ्या ग्रामीण-आदिवासी पालकांच्या निवासी शाळेत राहणाऱ्या मुलांसाठी ते पाळणाघरही आहे. अगदी शहरातल्या आयटी क्षेत्रात ११-१२ तास कामाच्या निमित्ताने बाहेर राहणाऱ्या पालकांच्या मुलांसाठीही शाळा हे शिक्षणकेंद्राच्या बरोबरीनेच पाळणाघर, सकस आहार देणारं केंद्र आहे. ऑनलाईन शिक्षण हे या सर्वांसाठी पर्याय ठरू शकत नाही.

ऑनलाईन शिक्षणाबाबत प्रश्न उपस्थित करणाऱ्या गटांनीही, आपण नकळत ऑनलाईन शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान संपूर्णतः नाकारतो आहोत असा अर्थ निघणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्याच्या शाळा व्यवस्थेला सक्षम करण्यासाठी, शिकण्या-शिकवण्याची प्रक्रिया अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञान कसे वापरायचे याचा विचार जरूर व्हायला हवा. किंबहुना माहितीचा स्फोट झालेल्या युगात पाठांतराची कास न सोडणाऱ्या आणि विषयाशी सुसंगत अशी दृक्-श्राव्य साधने एका क्लिकवर उपलब्ध असताना पाठ्यपुस्तक-फळा-खडू-डस्टर या चौकटी पलिकडे तसूभरही न पाहणाऱ्या शिक्षकांना त्यांचा कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्याची वेळ आलेली आहे. कल्पक, स्वतंत्र विचार करणाऱ्या कित्येक खटपट्या शिक्षकांनी संगणक, इंटरनेट यासारख्या साधनांचा उपयोग करून मुलांना स्वयंशिक्षणाची, एखाद्या विषयात खोलवर उतरण्याची, प्रकल्पाधारित अनुभवसिद्ध शिक्षण रंजकपणे घेण्याची संधी उपलब्ध कशी करता येते याचे नमुने साकार केलेले आहेत. यांत ग्रामीण भागात काम करणारे जिल्हा परिषदांच्या शाळांतीलही शिक्षकही आहेत. डिजिटल शिक्षणासंबंधी धोरणे आखताना असा प्रयत्नांना विचारात घेतले गेले पाहिजे.

शिक्षणासाठी केलेला खर्च, हा खर्च की गुंतवणूक?

आपल्याकडे कनिष्ठ मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय अशा विविध वर्गातील लोकांचा शिक्षण क्षेत्रातील खर्चाचा दृष्टिकोन व्यापक नाही. आपल्या

मुलाला/मुलीला शाळेत प्रवेश दिल्यापासून ते शिक्षण पूर्ण होईपर्यंत फक्त सुखसोयी द्यायच्या नसतात, तर शैक्षणिक वातावरण सुद्धा निर्माण करायचे असते. संगणकावर फक्त गेम खेळले जातात, आपल्याला कॉम्प्युटर सायन्स किंवा आयटीला ॲडमिशन घ्यायची आहे का? मग कशाला हवाय लॅपटॉप? इंटरनेटवर कोणाला शिक्षण मिळते काय? अशा प्रकारचे विचार पालक वर्गामध्ये घाऊक प्रमाणात पसरले आहेत. आपण विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लावू शकलो नाही, त्यांच्यामध्ये अभ्यासू दृष्टिकोन निर्माण करू शकलो नाही याची खंत कमी, पण तंत्रज्ञानच मुलांना भरकटत नेते हा दृष्टिकोन ठाम! अशी धारणा असलेल्या समाजाला ऑनलाइन शिक्षण समजायला थोडा वेळ लागेल.

शिक्षणावरील खर्च आणि मनोवृत्ती

वार्षिक स्नेहसंमेलने, वाढदिवस, मित्रपरिवाराबरोबर सहलीला जाणे, महिन्यातून एखाद दुसऱ्या वेळेला हॉटेलमध्ये जेवायला जाणे, विविध सणाच्या निमित्ताने कपडेलत्ते, गृहोपयोगी वस्तू यांची खरेदी करणे, लग्नकार्यासाठी सोने खरेदी करून ठेवणे, यात काहीही गैर नाही, असे मानणारा समाज दर महिन्याला पाचशे रुपये वेगवान इंटरनेटसाठी खर्च करायला सहजासहजी तयार नसतो. आपल्या मुलाला वाढदिवसाला टू व्हीलर द्यायच्या ऐवजी एखादा दर्जेदार लॅपटॉप का देत नाही? कारण शिक्षण क्षेत्रात केला जाणारा खर्च असतो ही गुंतवणूक नसते ही समाजाची मानसिकता आहे.

शिक्षणाचा उद्देश चहूबाजूंनी मिळणारे ज्ञान आत्मसात करणे व त्यातून आपले उत्तम व्यक्तिमत्व घडवणे आहे, हा आहे. त्यासाठी तंत्रज्ञानाचा जेवढा वापर होऊ शकतो, तेवढा अन्य कशाचाही होऊ शकत नाही. यासाठी शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी पालक वर्गाचे प्रबोधन करण्याची नितांत आवश्यकता आहे. वाढदिवसाचे बक्षीस म्हणून मुलाला त्याचे नातेवाईक एखाद्या संगणकीय कोर्सची फी आम्ही भरतो अशी ऑफर का देत नाहीत?

ऑनलाइन शिक्षणातील तांत्रिक अडचणी

मागच्या नउ महिन्यांपासून घरी बसल्यामुळे व भविष्यात बाहेर पडणे तितकेसे सुरक्षित नसल्यामुळे ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय समोर आला व त्यामुळे ऑनलाइन

शिक्षणाची गरज भागवण्यासाठी असलेल्या आवश्यक असलेल्या साधनांची मागणी सुद्धा वाढली. उत्तम दर्जाचे इंटरनेट उपलब्ध नाही, मोबाईल फोनवर सतत लेक्चर ऐकल्यामुळे व पाहिल्यामुळे डोळ्यांना व कानांना त्रास होतो. या आणि अशा अनेक अडचणी अगदी शंभर टक्के आहेत. पण त्या कायमस्वरूपी टिकणाऱ्या नाहीत. व्यवस्थित नियोजन केल्यास यातील समस्या सोडवण्याच्या दृष्टीने नक्कीच सकारात्मक पावले उचलली जाऊ शकतात.

ऑनलाईन शिक्षण आणि दूरस्थ शिक्षण

भारताचा बराच ग्रामीण भाग भौगोलिकदृष्ट्या दुर्गम आहेच, पण शैक्षणिक सुविधांच्या दृष्टीनेसुद्धा वंचित आहे. सरसकटपणे नाही तरीसुद्धा अत्यंत सुमार दर्जाचे शिक्षक, भ्रष्ट पद्धतीने चालवलेल्या शिक्षण संस्था किंवा दर्जेदार शिक्षणाचा अभाव यामुळेच विद्यार्थी शहराकडे आकर्षित होतात. ऑनलाईन माध्यमातून जे विषय प्रयोगशाळेत शिकवायचे असतात त्यांचा अपवाद वगळता, ऐकून व पाहून शिकायचे विषय नक्कीच परिणामकारकरित्या शिकवले जातात. एखादी जागा विकत अथवा भाड्याने घेऊन वर्ग भरण्यापेक्षा हे शिक्षण स्वस्त असल्याने सर्व प्रकारच्या आर्थिक स्तरातील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळू शकतो.

विविध स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी महाराष्ट्राच्या विविध भागातून पुण्या-मुंबईसारख्या शहरात येतात. विविध खाजगी संस्थांमध्ये शिकून वाचनालय आणि त्या माध्यमातून होणारी सोय यासाठी अगदी कॉट बेसिसवर राहतात. ऑनलाईन शिक्षणाच्या योग्य अंमलबजावणीने थेट प्रसारणाच्या माध्यमातून विद्यार्थी घरबसल्या शिक्षण घेऊ शकतात. हे दोन माध्यमाद्वारे होऊ शकते. आधीच रेकॉर्ड केलेली व्हिडिओची बँक विद्यार्थ्यांना मदत करू शकते व जसे प्रत्यक्ष वर्गात शिक्षक शिकवतात त्याच प्रमाणे ऑनलाइन माध्यमातून शिक्षण घेणे शक्य आहे. Google Meet, Zoom, Cisco Webex, Microsoft Teams अशी सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. दरमहा फक्त दोन हजार रुपयांपेक्षा कमी किमतीत एकावेळी शंभर विद्यार्थीलाईव्ह लेक्चर ऐकू शकतील अशी सोय यामध्ये आहे. उत्तम शिकवू शकणारे शिक्षक याद्वारे आपला व्यवसाय वाढवू शकतात व विद्यार्थ्यांनासुद्धा याचा फायदा होईल.

CRITERION III: RESEARCH, INNOVATIONS AND EXTENSION
Metric: 3.3.3- books and chapters in edited volumes/books published


भारतीय आर्थिक विचारवंत
संपादक
डॉ. नीलम छंगाणी
डॉ. नितीन चौधरी

भारतीय आर्थिक विचारवंत

(INDIAN ECONOMIC THINKER)

संपादक

डॉ. नीलम छंगाणी
एम.ए., पीएच.डी.
सहाय्यक प्राध्यापक
तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री. किसनलाल नथमल गोयंका
कला व वाणिज्य महाविद्यालय
कारंजा (लाड) जि. वाशिम

डॉ. नितीन चौधरी
एम.ए., एम.फील., पीएच.डी.
सहाय्यक प्राध्यापक
तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती राधादेवी गोयंका
महिला महाविद्यालय, अकोला
जि. अकोला

अजिंक्य प्रकाशन

भारतीय आर्थिक विचारवंत : डॉ. नीलम छंगाणी, डॉ. नितीन चौधरी
प्रकाशक :
ॲड. कु. जे. व्हि. भगत
अजिंक्य प्रकाशन
भिमनगर, वापटा पो. कुपटा
ता. मानोरा जि. वाशिम
संपर्क : ९६०४४०२०५३
WhatsApp : 8007143527
Website : www.ajinkyapublication.com
E-mail : ajinkyapublication@gmail.com

ISBN :978-93-90532-21-6

© लेखकाधिन

प्रथम आवृती : २६ जानेवारी २०२१
अक्षर जुळवणी : अजिंक्य प्रिंटीग्स् ॲण्ड कॉम्प्यूटर्स
मुखपृष्ठ : अरविंद मनवर
मुद्रक : अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम
प्रमुख विक्रेता: अजिंक्य पुस्तकालय, वाशिम
संपर्क : ८००७१४३५२७ / ९६०४४०२०५३
किंमत : रू.३५० फक्त

(या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

अनुक्रमणिका

अ. क्र.	प्रकरणाचे नाव	पृ. क्र.
१.	दादाभाई नौरोजी यांचा लूटीचा सिद्धांत व दारिद्र्यविषयक विचार / प्रा. डॉ. सुभाष गुर्जर	१२
२.	दादाभाई नौरोजी - आर्थिक शोषणाची संकल्पना / डॉ. पंकज तायडे	४२
३.	शुक्राचार्य यांचे आर्थिक विचार / डॉ. नितीन चौधरी	५७
४.	चाणक्य कौटील्य यांचे मजूर विषयक धोरण / प्रा. डॉ. प्रदीप ठाकरे	८६
५.	छत्रपती शिवाजी महाराजांची आर्थिक निती / प्रा. डॉ. निलम छंगाणी	१०८
६.	संत तुकाराम महाराज यांचे संपत्ती विषयक विचार / डॉ. अरूण चांदूरकर	१२९
७.	संत एकनाथांचे अर्थाजन आणि विनियोगासंबंधी विचार / प्रा. डॉ. संतोष कुबडे	१४७
८.	महादेव गोविन्द रानाडे के आर्थिक विचारधारा / डॉ. विष्णु पवार	१६१
९.	गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आर्थिक विचारांचा आढावा / डॉ. देवेंद्र व्यास	२१२
१०.	छत्रपती शाहूमहाराजांचे सिंचन विषयक धोरण / प्रा. डॉ. गजेंद्र वासनिक	१२
११.	लोकमान्य टिळकांचे स्वदेशी अर्थशास्त्र / डॉ. मधुकर ताकतोडे	४२
१२.	महात्मा फुलेंच्या कृषीविषयक विचाराची आजच्या काळातील यथार्तता / प्रा. डॉ. संतोष धामने	५७
१३.	राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि आर्थिक विकेंद्रीकरण / प्रा. दिनेश खेरडे	८६
१४.	पंडीत नेहरूंच्या विचारातील आर्थिक संकल्पना / प्रा. डॉ. गजानन बनचरे	१०८

१५.	पंडीत दीनदयाल यांचे अर्थशास्त्रातील योगदान / प्रा. गिरीष मायी	१२९
१६.	डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक कार्ये / डॉ. सुनिता सावरकर	१४७
१७.	मा. वसंतराव नाईक हरित क्रांतिचे प्रणेते / डॉ. दयाळू राठोड	१६१
१८.	इंदिरा गांधी यांची अर्थनीती / डॉ. संजय मुंडकर	२१२
१९.	डॉ. आर. सी. दत्त यांची ब्रिटिश आर्थिक धोरणांवर टिका / प्रा. डॉ. प्रदिप ताकतोडे	१२
२०.	डॉ. अमर्त्य सेन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्रातील योगदान / प्रा. डॉ. टी. पी. मोरे	४२
२१.	भारतातील विविध अर्थतज्ञांचे आर्थिक विचारमंथन / प्रा. डॉ. विनोद चव्हाण	५७
२२.	अमर्त्य सेन के आर्थिक विचार / प्रा. डॉ. नीता तिवारी	८६
२३.	गोपाळ गणेश आगरकरांचे हिंदुस्थानच्या आर्थिक दैण्यावस्था अथवा दारिद्र्यासंबंधी विचार / डॉ. ज्योती पवार	१०८
२४.	Dr. Babasaheb Ambedkar : An Economist / Dr. Anil Bansod	१२९
२५.	The Role of Dr. Manmohan Singh's in Indian Economic Growth / Dr. Baljeet Kaur	१४७
२६.	Gopal Krisna Gokhale's Economic View / Dr. Pradip Yeole	१६१
२७.	Rashtrapita Mahatma Gandhi's Philosophy and Indian Economy / Dr. Nilesh Chotiya	२१२
२८.	Thoughts of Kautilya on Economic Ideas / Dr. Shashikant Adsod	२१२

शुक्राचार्य यांचे आर्थिक विचार

डॉ. नितीन चौधरी
सहाय्यक प्राध्यापक
तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती राधादेवी गोयंका महिला महाविद्यालय, अकोला

अर्थशास्त्र या शब्दाला प्रदीर्घ असा इतिहास प्राप्त आहे. जागतिक पातळीवर विचार करता प्राचीन कालावधितील आर्थिक विचार हे प्रामुख्याने धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, दर्शनशास्त्र, राजनीती यांच्या माध्यमातून प्रसारीत झाले होते. अर्थशास्त्र हे एक असे महाकाय वृक्ष आहे की, ज्याची उत्पत्ति आणि अंत याविषयी स्पष्ट मत दर्शविता येत नाही. याचा विकासक्रम हा सातत्याने वाढत जाणारा असून भविष्यातही आपणास तो विकसित व विस्तारित होताना दिसणार आहे. आजच्या स्थितीत जे आर्थिक सिद्धांत तयार आहेत. त्यामागे कमीत कमी २ ते ३ हजार वर्षाचे चिंतन, मनन, निरीक्षण तथा अनुभव दडलेला आहे.

अर्थशास्त्राचा इतिहास आणि आर्थिक विचारांचा इतिहास या दोन्ही वेगवेगळ्या संकल्पना आहेत. एच. एल. हैने यांच्या मते, 'अर्थशास्त्राचा इतिहास हा तेव्हापासून आहे जेव्हा अर्थशास्त्राला विज्ञानाच्या स्वरूपात स्वीकारण्यात आले तर आर्थिक विचारांचा इतिहास धर्मशास्त्र तथा प्राचीन ग्रंथांमध्ये दोन-तीन हजार वर्षापूर्वीच नोंदविला गेला आहे.' आर्थिक विचार ही संकल्पना विस्तृत असून यामध्ये अर्थशास्त्राचा इतिहास अंतर्भूत आहे.

प्रदीर्घकाळ भारत पारतंत्र्यात राहला. यामुळे या देशातील संस्कृती, इतिहास, परंपरा, साहित्य, हेसुद्धा लुप्त राहिले. एक गुलाम राष्ट्र म्हणून देशातील विज्ञान, कला, साहित्य हे विश्वापर्यंत पोहोचू दिले गेले नाही असे म्हणता येते. जेथे आपण ॲडम स्मीथ यांना त्यांच्याद्वारे १७७६ मध्ये लिखित राष्ट्राची संपत्ती (An Enquiry in to the cause of Wealth of Nation) या ग्रंथामुळे अर्थशास्त्राचे जनक म्हणतो. तिथे भारतात इ. स. पूर्व सहाव्या व पाचव्या शतकांमध्ये बृहस्पति शुक्राचार्य, तिसऱ्या शतकामधील कौटिल्य यांना हजारो वर्षाचा इतिहास आहे. यांच्याद्वारे लिखित वैदिक साहित्य, स्मृतिग्रंथ, पुराण साहित्य, प्राचीन संस्कृत साहित्य, ऐतिहासिक सामग्री इत्यादीद्वारे भारतात आर्थिक विचार मांडण्यात आले होते. तरीही

आज आपण आपल्या देशातील शास्त्र, साहित्य, सिध्दांत जगतामध्ये मांडण्यास अपयशी ठरलो आहे. बृहस्पति व शुक्राचार्यांच्या ग्रंथांची रचना इ. स. पूर्व ६०० ते ५०० मध्ये कौटिल्याचे 'अर्थशास्त्र' इ. स. पूर्व ३२० मधील आहे हे प्रामुख्याने नोंद करता येते.

भारतातील अर्थशास्त्रविषयक प्रथम ग्रंथ 'बार्हस्पत्य अर्थशास्त्र' हा बृहस्पती यांनी इ. स. पूर्व ५०० ते ६०० यादरम्यान तयार केला आहे. बृहस्पती यांनी त्यांच्या ग्रंथात ६ अध्यायद्वारे आपले आर्थिक विचार मांडले आहेत. यामध्ये संपत्ती संग्रह, प्राप्ती, तसेच कृषी व्यापार, नैतिक मार्गाने अर्थप्राप्ती, यासोबतच संपत्ती या जगताचे मूळ असल्याने संपत्ती प्राप्तीसाठी सगळे कार्य करतात याबाबत आपले मत प्रदर्शित आहे.

भारतात आर्थिक विचारांच्या संदर्भात श्री के. पी. जयस्वाल यांनी The Ancient Indian Policy, श्यामशास्त्री यांनी कोटिलीय अर्थशास्त्र तसेच के.टी. शाह यांनी Ancient Foundation of Economics in India, के. वी. एम. आयंगर यांनी Aspects of Ancient Indian Economic Thoughts, तर के. एम. सरन यांचे Labour in Ancient India प्रमुख योगदान लक्षात घेता येईल.

शुक्राचार्य यांचे आर्थिक विचार :

शुक्राचार्य यांना आर्थिक विचारांचा पितामह म्हटले जाते. त्यांनी 'शुक्रनीति' नामक ग्रंथातून अर्थशास्त्र विषयक विचार मांडले आहेत. शुक्राचार्यांच्या कालावधी हा आचार्य कौटिल्य यांच्या पूर्वीचा होता. कारण कौटिल्य यांनी आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात सर्वप्रथम शुक्र बृहस्पती यांना वंदन व अभिनंदन केलेले आहे.

''ओउम् नमः शुक्र बृहस्पतिभ्याम् पृथिव्या लाभो पालने व यावन्त्यर्थशास्त्राणि पूर्वाचार्यै पस्थापितानि प्रायशस्तानि संहृत्यैमिदमर्थशास्त्रंकृतम्''

शुक्रनीति ह्या ग्रंथामध्ये विशेष लोकांच्या आधारे राज्यशासनाच्या कारभार यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. शुक्राचार्यांनी शास्त्रांच्या अभ्यासात अर्थशास्त्राला प्रमुख स्थान दिलेले आहे. त्यांनी ज्ञान आणि कला यामध्ये फरक सांगत असताना ज्ञान हे ध्यान करण्याचा विषय असून कला हा मुख किंवा बहिरा व्यक्तीही संपादन करू शकतो असे मत व्यक्त केले आहे.

ज्ञानामध्ये चार वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेद) याव्यतिरिक्त सहा वेदांत (व्याकरण, शिक्षा, कल्प, निवृत्त, ज्योतिष्य तथा छंद) इत्यादीचा विचार होतो.

यानंतर अर्थशास्त्रामध्ये कामशास्त्र, शिल्पशास्त्र, अलंकार, काव्य, देशभाषा इत्यादी विषय येतात. शुक्राचार्यांनी या सर्वांचा अर्थ शुक्रनीतिमध्ये स्पष्ट केलेले आहे. त्यांच्या ६४ कलांमध्ये संगीत, आरोग्य, पाककला, धातु, शिल्प, नीती निर्धारण, गृहनिर्माण, वस्त्र निर्माण, पोलाद इत्यादी बरोबरच कार्यांमध्ये पशुपालन, दुग्ध व्यवसाय, समावेश होतो. त्यांच्या मते कला ह्या व्यावहारिक आहेत आणि विद्या या बौद्धिक आणि सैद्धांतिक आहेत.

शुक्रनीतिमध्ये अर्थशास्त्राची व्याख्या करतांना असे मत प्रकट केले आहे की, राजाने आपल्या मैत्रिपूर्ण संबधातून राज्यासाठी संपत्ती प्राप्त करण्याची कला संपादन करणे गरजेचे आहे.

अर्थशास्त्राची कदाचित प्रथम व्याख्या असेल की, जिथे राजा हा फक्त राज्याच्या राजा नसून प्रजेचा पालक, प्रजेच्या पालना करिता उत्पन्नाची प्राप्ती कशाप्रकारे करावी आणि त्याचे व्यवस्थापन कशा प्रकारे करावे हे त्यांच्या व्याख्या वरुन लक्षात येते.

शुक्राचार्यांनी अर्थशास्त्राच्या दुसऱ्या आणि महत्त्वाच्या व्यवहारिक भागांमध्ये व्यावहारिक अर्थव्यवस्था ज्याला आपण Applied Economics असे संबोधतो, याबाबत मत व्यक्त केले आहे. यामध्ये शुक्राचार्यांनी प्रथम अध्यायामध्ये चर्चेच्या विषयांमध्ये लिहित असताना असे म्हटले आहे की, अर्थ आणि अनर्थ हा चर्चेचा विषय आहे हीच परिभाषा पुढे कौटिल्य यांनी केली आहे.

शुक्राचार्य यांनी चर्चेची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, व्याजावर पैसे देणे, शेती, व्यापार, गोरक्ष हे प्रमुख चार बाबींचा अभ्यास व्यावहारिक अर्थशास्त्र मध्ये केला जातो.

शुक्र यांची मुद्रा व संपत्तीविषयी मत :

विविध प्रकारची चलने, कवडी, रत्न यास त्यांनी मुद्रा असे म्हटले आहे. तर पशु, जनावरे, चारा, अन्नधान्य, वस्त्र यास त्यांनी संपत्ती असे संबोधले आहे. यामध्ये महत्त्वपूर्ण गोष्ट अशी की पशुसाठी लागणारा चारा याचा सुद्धा समावेश शुक्र यांनी संपत्तीमध्ये केला आहे.

शुक्र यांचे मूल्य विश्लेषण :

शुक्राचार्यांनी मूल्य म्हणजेच किमतीविषयी महत्त्वपूर्ण असे विचार आज पासून २६०० वर्षापूर्वीच मांडलेले आहेत. परंतु आपले भारतीय साहित्याचे दुर्भाग्य

एवढं की अर्थशास्त्राच्या इतिहासात आपणास याचा उल्लेख कुठेही दिसून येत नाही. शुक्राचार्यांनी मूल्याचे प्रामुख्याने दोन भागांमधील वर्गीकरण केले आहे. एक सामान्य मूल्य आणि दुसरे बाजारमूल्य या दोघांमधील अंतर आणि त्यांच्या कारणांचे स्पष्टीकरण आपल्याला शुक्रनीति मध्ये पहावयास मिळते.

ज्या खर्चापासून कोणतीही वस्तू प्राप्त होत असेल त्यास सामान्य मूल्य असे म्हटले जाते. बाजारमूल्यामध्ये सहज-असहज प्राप्त होणारी तसेच त्या वस्तू मधील असणारी उपयोगिता त्या वस्तूमध्ये असणारी इच्छा या सर्व बाबींचा समावेश होतो. सामान्य वस्तूची सामान्यमूल्य हे दीर्घकालीन स्वरूपाची असते. ते प्रामुख्याने उत्पादन खर्चाच्या आधारावर निर्भर असते. बाजार मूल्य हे वस्तूची उपलब्धता, उपयोगिता आणि मागणी यावर निर्भर असते.

हेच विचार आपणास आज आधुनिक मूल्य सिद्धांत मध्ये सुद्धा पहावयास मिळतात. शुक्राचार्य यांनी ह्या सिद्धांताची विस्तृत अशी व्याख्या केलेली नाही. परंतु याची मांडणी त्यांनी सूत्र रूपामध्ये केलेली आहे. कारण तत्कालीन सिद्धांत हे प्रामुख्याने सूत्र स्वरूपातच मोठ्या प्रमाणामध्ये असायचे. तत्कालीन योग, न्याय, वेदांत, व्याकरण इत्यादी ग्रंथ हे सूत्र रूपामध्ये असलेली दिसून येतात.

एका ठिकाणी शुक्र असे म्हणतात की, ज्या वस्तूमध्ये उपयोगिता नाही तसेच ती प्रत्यक्ष व्यवहारांमध्ये वापरणे शक्य नाही अशा वस्तूला कोणतेही मूल्य नसते.

शुक्राचार्य यांचे वेतन संबंधी विचार.

शुक्राचार्यांनी श्रम आणि श्रमिकांचे वेतन याबाबत महत्वपूर्ण विचार मांडलेले आहेत. शुक्रनीति मध्ये वेतनाचे दर, बोनस, पेन्शन, क्षतीपूर्ती, कामाचे तास, सुट्टी इत्यादी बाबत नियमावली असलेली दिसून येते. तसेच एका वर्षांमध्ये १५ दिवस सुट्टी, तसेच वयाची ४० वर्षे पर्यंत काम करणे आणि त्यानंतर पेन्शन या सारखी सुविधा, आजारी अवस्थेमध्ये तीन महिने पर्यंत सुट्टी, तसेच सतत आठ दिवस आजारी आल्यानंतरही वेतन कपात होणार नाही, याची व्यवस्था आपल्याला शुक्रनीतिमध्ये पहावयास मिळते. शुक्राचार्यांनी श्रमिकांची वेतनासाठी तीन वर्ग केले आहेत. प्रथम वर्गामध्ये कामानुसार वेतन दुसऱ्या वर्गामध्ये वेळेनुसार वेतन आजही आपणास अशा प्रकारची श्रमिकांना मिळणाऱ्या वेतनाबाबतची वर्गवारी पहावयास मिळते.

शुक्राचार्यांनी श्रमिकांच्या वेतनाचे उत्तम वेतन, मध्यम वेतन आणि निम्न वेतन असे वर्गीकरण केले. उत्तम वेतन त्यास म्हटले आहे की, वेतन प्राप्त करणारा आपल्या सर्व गरजा भागवू शकेल यास आपण आधुनिक जगतामध्ये जीवन निर्वाह वेतन असा शब्दप्रयोग करतो. तर मध्यम वेतनामध्ये श्रमिकांच्या परिवाराचे केवळ भोजन आणि वस्त्र ह्या गरजा पूर्ण होतील एवढे वेतन यास मिळते. आपण यास न्युनतम वेतन म्हणतो तर निम्न वेतन यामध्ये वरील कोणतेही गरजा पूर्ण होऊ शकत नाही. वेतन अशा प्रकारची संकल्पना शुक्राचार्यांनी शुक्रनीति मध्ये नमूद केलेली आहे.

शुक्राचार्य यांचे संपत्तिविषयी विचार :

शुक्राचार्यांनी संपत्ती चे महत्व विशद करीत असताना असे मत प्रकट केले आहे की, 'संपत्ती ही कोणाचीही दासी नसते संपत्तीचे सर्व दास असतात.' प्रत्येकाने नैतिक मार्गाने संपत्ती प्राप्त करावयास हवी. दानधर्म तप हे सर्व व्यक्तीला निर्धन करीत असतात. अधिक व्याजाच्या आधारावर कर्ज प्राप्त करणे हे मानवाला निर्धनते कडे घेऊन जाते. निर्धन व्यक्तीला त्याचा स्वतःचा परिवारही त्यागतो. संसारामध्ये संपत्तीला खूप अधिक महत्त्व आहे. अशा प्रकारचे मौलिक विचार शुक्रनीतिमध्ये मांडलेले दिसून येतात. आजच्या या आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये रोखता ही समस्या बनत चाललेली संकल्पना याबाबत २६०० वर्षांपूर्वी शुक्रनीतिमध्ये जे लिखाण झाले त्यामधील एका वाक्यावरून असे लक्षात येते की, हेच विचार आधी आपल्याला नवीन वाटतात. 'उत्पन्नापेक्षा खर्च अधिक करणारा कुबेर सुद्धा निर्धन होऊ शकतो' याप्रकारचे अर्थशास्त्रीय विचार शुक्रनीति मध्ये लिखित स्वरूपामध्ये पहावयास मिळतात.

लेखांकनासंबंधी विचार :

शुक्राचार्य यांना भारतीय लेखा प्रणालीचे प्रथम आचार्य असे सुद्धा म्हटले जाऊ शकते. शुक्रनीतिच्या द्वितीय अध्यायामध्ये लेखांकन पद्धतीविषयी विविध श्लोकांच्या आधारे व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. ज्यामध्ये कर्ज, संचित राशी, इत्यादींचे विस्तृत वर्णन केलेले आहे. राजाला राज्यशासनाविषयी चे हिशोब ठेवण्याची सूचना शुक्रनीतिमध्ये आहे. त्यांच्या मते संपत्ती किंवा मूल्य याची देवाण-घेवाण होत असताना ती लिखित स्वरूपामध्ये कुठेतरी नोंद व्हावयास हवी.

यासोबतच शुक्राचार्यांनी लोक वित्त यासंबंधी सुद्धा विचार मांडलेले आहेत. ज्यामध्ये उत्पन्न प्राप्तीचे मार्ग, सार्वजनिक खर्च, प्रशासकीय खर्च इत्यादीबाबत मत प्रकट केलेले आहे. राजाने आपल्या उत्पन्नाचे सहा भागांमध्ये कसे विभाजन करावे. तसेच सैनिक खर्च, दान, धर्म, अधिकारी व कर्मचारी यांचे पालन पोषण तसेच प्रजेची उपजीविका पूर्ण व्हावी याकरिता नियोजन, कृषी विषयक विचार, कृषी मधील सिंचन व्यवस्थापन संबंधी विचार, आपल्याला शुक्रनीतिमध्ये पहावयास मिळतात.

उपसंहार

शुक्राचार्य यांचे उपरोक्त लेखामध्ये मजुरांचे वेतन, संपत्तीचे महत्त्व, मूल्य विषयक विचार, अर्थशास्त्राची व्याख्या, मुद्रा, संपत्ती, लोक व्यवस्थापन याबाबत आज पासून २६०० वर्षापूर्वी लिखाण झालेले आहे. परंतु आज भारतीय साहित्याचा प्रचार व प्रसार न होऊ शकला कारणाने शुक्रनीति सारखे अर्थशास्त्रविषयक ग्रंथ आजही आपल्या अभ्यासात नाहीत ही शोकांतिका आहे. जर हे साहित्य, भारतीय ऐतिहासिक परंपरा, भारतीय अर्थशास्त्रीय विचार, परंपरागत आर्थिक सिद्धांत, शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या माध्यमातून येत असतील तर आज अर्थशास्त्राला नवीन दिशा प्राप्त होईल आणि आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये सुद्धा अशा प्रकारचे अर्थशास्त्रीय विचार हे आजच्या अर्थशास्त्राच्या विकासाला व प्रसाराला नक्कीच सहाय्यभूत ठरतील अशी अपेक्षा करता येते.

संदर्भ ग्रंथसूची

१. Haney L.H., (2013) History of Economics Thoughts, The Macmillan Compny, Newyork,
२. चतुर्वेदी महेश, चतुर्वेदी मिथलेश, आर्थिक चिन्तन का इतिहास, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा
३. भागवत दुर्गा, हिवरगावकर, ब. रा. मराठी भाषांतर, २०१२, कौटिलीय अर्थशास्त्र, वरदा प्रकाशन, पुणे

CRITERION III: RESEARCH, INNOVATIONS AND EXTENSION
Metric: 3.3.3- books and chapters in edited volumes/books published

PUBLISHED BOOK & PUBLISHED CHAPTER IN BOOK / CONFERENCE PROCEEDING

DEPARTMENT OF MUSIC

2016 - 17 to 2020 - 21

Sr. No.	Name of the Teacher	Number of published Book & Chapter in Book and Conference Proceeding					Total
		2016-17	2017-18	2018-19	2019-20	2020-21	
1	Dr. A. M. Ambhore	00	00	00	00	00	00
2	Dr. N. L. Gondane	01	02	01	01	01	06
3	Dr. D. V. Pande	01	00	01	01	00	03
4	Mr. V. S. Chapke	00	00	00	01	01	02
5	Mr. A. P. Nimbalkar	01	00	00	00	00	01
6	Mr. S. B. Sagane	01	00	00	00	01	02
	Total	**04**	**02**	**02**	**03**	**03**	**14**


ISBN 978-93-86011-480
Vasantrao Naik Government Institute of Arts and Social Sciences, Nagpur
One Day International Conference
21st September 2016
Gharana Tradition in Music
:: Organized By ::
DEPARTMENT OF MUSIC
V. N. G. I. A. S. S., Nagpur
प
ं
प
रा
International Conference Proceedings
Department of Music
Vasantrao Naik Government Institute of
Arts and Social Sciences, Nagpur
R.B.I Square, Pt. Jawaharlal Nehru Marg, Nagpur - 440001
Website : www.vngiassnagpur.org, Email : directorvnglass@rediffmail.com
(Re-Accredited with Grade 'A' by NAAC)

ISBN 978- 93-86011 - 480

28.	Prof .Aparna A.Shelar	114-116
29.	Dr.Archana S. Deshpande	117-120
30.	Prof . Dushmita Rathod	121-124
31.	Prof .Likeshwar K. Verma	125-127
32.	Prof .Sunil Kolhe	128-130
33.	Prof .Abhishek Singh	131-136
34.	Prof . Prashant N.Gugilwar	137-140
35.	Prof .Nana Jadhav	141-144
36.	Prof . Jitesh Gadpaile	145-146
37.	Prof . S.K Khandare	147-151
38.	Prof .Dipali C.Pande	152-156
39.	Prof .Narendra .K Dhruv	157-161
40.	Prof . Aruna C. Harle	162-165
41.	Shri Wahedullah Saghar	166-167
42.	Prof .Santosh M.Dandhare	168-170
43.	Prof .Satish D. Jamdhade	171-173
44.	Prof .Sushil A. Vawalkar	174-176
45.	Prof .Priya Patil	177-180
46.	Prof . Chandrashekhar Kudmethe	181-184
47.	Mr. Sumedh B. Sahane	185-190
48.	Prof .Pallavi P. Kulkarni	191-192
49.	Prof .Seema C. Joshi	193-195
50.	Prof .R.L Sarkate	196-200
51.	Dr.Shilpi Nahar	201-204
52.	Dr.Shobhit K. Nahar	205-209
53.	Dr.Punit k.Patel	210-214
54.	Dr.Vidya Gavande	215-218
55.	Dr.N. L Gondane	219-224
56.	Prof . Pradnya D. Meshram	225-229
57.	Dr.Jaishree M. Vaishnav	230-233

ISBN 978- 93-86011 -

Necessity of Gharana in present era

Dr. N.L Gondane

Radhadevi Goenka Mahila
Mahavidhyalay, Akola.
Mo. 8793429782

Introduction

The purpose is to bring some awareness about music, with explanation using audio/video resources. After all, there is so much unexplained delight in sitting on a beach at night, and listening to a magnificent Malkauns from Amir Khansahib !! For the listener, it is an out of the world experience. It is an unparalleled state of mind, completely beyond the words. That Malkauns stays lingering in the ears and the arcades of mind, and makes one forget his worries and sorrows. It is such a huge subject that writing each and everything about it not possible, even though someone spends whole life in writing on it The word **Gharana** means "family". In relation to music, **Gharana** refers to a family of musicians, a school of music or a musical lineage connected with the name of a particular person or place. Khayal music is represented by a number of more or less stylistically different schools called *Gharanas*. These schools have their basis in the traditional mode of musical training and education. Every Gharana has a few discernible features, which allow us to distinguish between schools and also enable us to identify different approaches to interpretation of the ragas. The main areas where differences arise, relate to the raga repertoire adopted by the Gharana, the manner in which the notes are sung, particularly the relative emphasis given in the Gharana philosophy to swara and laya, the role and importance of the *Bandish* in the aesthetic viewpoint of the Gharana, the manner

ISBN 978- 93-86011 -48

in which the raga is presented, and the type of Tans employed.

GwaliorGharana: This is the oldest among all the Khayal Gayaki (voca styles. The distinctive feature of this style of singing has been noted as i lucidity and simplicity. This gayaki is also characterized by serious mien ar slow singing pace. This Gharana involves presenting familiar and well know ragas such as Alakya Bilawal, Yaman, Bhairav, Sarang, Multani, Sri, Bhoo Kamod, Hamir, Basant, etc. It also pays great attention to singing Khayals usir traditional Bandishes. This Gharana is also noted for its straight and simp Tans, while stressing on the use of Meendh and Gamak in its Dhrupad-styl khayals. The best known artistes of this Gharana were Balkrishna BaIch Karanjikar (1849 - 1927) and his student Vishnu Digambar Paluskar (1872 1931), Pandit Omkarnath Thakur (1897 - 1967) and in recent times, Veer Sahasrabuddhe

2. संगीत, चिकित्सा आणि उपचार, डॉ विजय तारे, प्रकाशक श्रीमती वर्षा सतपाळकर,मैत्रेय प्रकाशन
3. डॉ.लाल मणी मिश्र(1973),भारतीय संगीत वाद्य, भारतीय ज्ञान पीठ प्रकाशन,नई दिल्ली.
4. डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग (2012), संगीत निबंध सागर, कार्यालय, हाथरस.
5. डॉ मुकेश गर्ग (2010), साहित्य और सौंदर्य बोध, पब्लिकेशंस डिसटीब्यूटर्स, नई दिल्ली. ISBN : 978–81–7391–478–8
6. डॉ लक्ष्मी नारायण गर्ग,(2012) निबंध संगीत, संगीत कार्यालय, हाथरस.
7. डॉ. भावना रानी (2008),शास्त्रीय संगीत की लोकप्रियता में संगीतिक संस्थाओं का महत्व, संजय प्रकाशन, दिल्ली ISBN : 81–7453–265
8. डॉ. शुचिस्मिता (2014) आकाशवाणी एवं हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत, कनिष्क पब्लिशर्स डिसटीब्यूटर्स, नई दिल्ली. ISBN : 978–81–7391–836–8
9. डॉ. शुभा श्रीवास्तव (2013),उत्तर भारतीय तालों में छंद, रस और सौंदर्यतत्व, कनिष्क पब्लिशर्स डिसटीब्यूटर्स, नई दिल्ली. ISBN : 978–81–8457–425–8
10. विमलाकांत रायचौधरी (2010),भारतीय संगीत कोश, वाणी प्रकाशन ISBN : 978–93–5000–463–0

2020-21


ISBN - 978-81-951551-6-3
बौद्ध समाजाच्या समस्या
Peer-Reviewed Book Chapter
संपादक:- प्रा. डॉ. एस. एम. भोवते



ISBN-978-81-951551-6-3

बौद्ध समाजाच्या समस्या

Peer-Reviewed
Book Chapter

संपादक

प्रा. डॉ. एस. एम. भोवते
श्रीमती पंचफुला देवी पाटील समाजकार्य
महाविद्यालय खडकी, अकोला.

आधार पब्लिकेशन, अमरावती



ISBN-978-81-951551-6-3

सपांदक मडंळ

प्रा. डॉ. एस. एम. भोवते
डॉ. सुरेखा ना. पाटील (मेश्राम)
डॉ. भिमराव ऋ. मेश्राम
डॉ. अस्मिता रामभाऊ ठोंबरे
प्रा. दिवाकर विश्राम सदांशिव
डॉ. एन. एल. गोंडाणे,
Prof. Rahul G. Mahure

ISBN-978-81-951551-6-3

अनुक्रमणिका

१) विपश्यना पंथी धम्मीस्टांसाठी बाबसाहेबांचा इशारा /१
डॉ. सुरेखा ना. पाटील (मेश्राम)
२) बौध्द समाजातील लोकांना येणाऱ्या आर्थीकसमस्या/१२
डॉ. एन. एल. गोंडाणे,
३) बौध्द लोकांच्या समस्या /२१
डॉ. नंदकिशोर उकंडराव राऊत,
४) बौद्ध समाजातील लोकांच्या कौटूंबिक,सामाजिकजिवनावर विपश्यनाचा प्रभाव /३४
डॉ. भिमराव ऋ. मेश्राम
५) बौध्द समाजातील महिलांच्या शिक्षण विषयक समस्यांचा अभ्यास /५०
रविंद्र श्रावण मडावी
६) बौध्द समाजाच्या शैक्षणीक समस्या /६३
प्रा.प्रदीप राउत
७) बौध्द समाजातील लोकांच्या शैक्षणिक समस्या'' /६७
डॉ. संतोष दामोदर पेठे (प्राचार्य)
८) मानवी समाजाची प्रगती करण्यासाठी बुद्ध धम्माची गरज— /७१
प्रा. डॉ. मिनाक्षी कांबळे
९) बौध्द समाजातील स्त्रियांच्या समस्या /८०
प्रा.डॉ.संजय उत्तम बेंद्रे
१०) बौध्द समाजातील लोकांच्या आर्थिक समस्या /८६
प्रा. प्रसेनजित सत्यजीत चिखलीकर

ISBN-978-81-951551-6-3

बौध्द समाजातील लोकांना येणाऱ्या आर्थीक समस्या

डॉ. एन. एल. गोंडाणे,
सहयोगी प्राध्यापक
प्लॉट नं. ११,बलोदे लेआउट, हिगलाज माता
मंदीराजवळ, हिंगणा रोड, अकोला

बौध्द धर्माचा मुळ पाया काय आहे. इतर धर्मात व बौध्द धर्मात काय फरक आहे. इतर धर्मात बदल हा घडून यावयाचाच नाही. कारण मनुष्य व ईश्वर यांचा संबंध ते धर्म सांगतात. इतर धर्मांचे म्हणणे असे की, ईश्वराने सृष्टी निर्माण केली. ईश्वराने आकाश, वायु, चंद्र, सुर्य सर्व काही निर्माण केले. आम्हाला ईश्वराने काहीही करावयाचे बाकी ठेवले नाही. म्हणून ईश्वरास भजावे खिस्ती धर्माप्रमाणे तर मृत्यूनंतर एक निर्णयाचा दिवस असतो व त्या निर्णयाप्रमाणे सर्व काही घडते देव व आत्मा यांना बौध्द धर्मात जागा नाही.

बौध्द धर्माचा प्रसार: बौध्द धर्म अत्यंत अल्प कालावधीत लोकप्रिय होवून तो जगाच्या पाठीवर इतरत्र पसरण्यामागे त्याची तत्त्वे ही अतिशय महत्वपूर्ण असलेली दिसून येतात. म्हणूनच असे म्हणता येईल की बौध्द तत्त्वज्ञानात स्वतंत्र बुध्दिला अतिशय महत्त्व आहे. कारण अशाप्रकारे बुध्दिप्रामाण्यावर आधारित असे हे तत्त्वज्ञान असल्यामुळे व चमत्कार, अंधश्रध्दांना त्यात स्थान नसल्यामुळे या धर्मांचा प्रचार व प्रसार अतिशय वेगाने झाला. बौध्द धर्म हा राष्ट्रीय धर्म बनला. बुध्दाचा धम्म हा

ISBN-978-81-951551-6-3

मानवतावादी असून नैतिक शीलाचरणावर आधारलेला होता. या पार्श्वभुमिवर बुध्दाचा उपदेश हा मानव जातीच्या कल्याणाचा, प्रगतीचा असून त्यात सर्व मानव समान आहेत हा विचार अंतर्भूत होता. पंचशील आणि अष्टांगिक मार्ग यानुसार आचरण करून व्यक्ती आपला सर्वांगिण विकास साधू शकतो अशी बुध्दाची विचारसरणी होती. अहिंसेच्या सिध्दांतावर बुध्दाने अधिक भर दिला. केवळ मानवाप्रतीच नाही तर सृष्टीतील प्रत्येक प्राणीमात्राबद्दल अहिंसेचे पालन करणे आवश्यक आहे. बुध्दाच्या मानवतावादी दृष्टीकोनमुळेच तो अतिशय कमी काळात लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचला. सर्व जाती व वंशाच्या लोकांनी याचा स्वीकार केला. तो भारतापुरताच मर्यादित न राहता संपूर्ण आशिया खंडात त्याने आपले स्थान निर्माण केले. इतकेच नव्हे तर जगाच्या अनेक भागात या धर्मांचा प्रसार झाला.

भारतात जातीय व्यवस्थेमध्ये दलितांचे सामाजिक आणि आर्थिक शोषण होत असे ते नष्ट करून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या जिवन मूल्यावर आधारित समाज रचना असावी हिच बाबासाहेबांची अपेक्षा होती. अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून श्रम विभागणी ही जर कौशल्याच्या आधारे होत असेल तर अशा श्रम विशेषीकरणामुळे आर्थिक विकासाला प्रेरणा मिळते. परंतु भारत मात्र जातीय व्यवस्थेमुळे श्रमाचे विभाजन होत नाही तर श्रमिकांचे विभाजन होते. त्यामुळे श्रमीक हा जातीनुसार विभागल्या गेल्यामुळे कामगारामध्ये एकसंघपणा राहत नाही. पर्यायाने त्यांच्या आर्थिक कार्यक्षमतेवर प्रतिकूल

ISBN-978-81-951551-6-3

परिणाम होतो. त्यासाठी व्यक्तीला व्यवसाय स्वातंत्र्यांची संधी देणे गरजेचे आहे.

सामाजिक, बौध्दीक, आर्थिक व राजकीय स्वातंत्राचाही बुध्दाने पुरस्कार केलेला आहेच. पुरूषामध्येच नव्हे तर स्त्री पुरूषामध्येही सतेचा पुस्कार त्यांनी केलेला आहे. बुध्दाच्या तोडीचा धर्म शिक्षक जगात आजवर झाला नाही. बुध्दाच्या शिकवणीनुसार वर्तन केल्यास आजचे सर्व सामाजिक प्रश्न चुटकीसारखे सोडविता येतील. बौध्दधर्म हा नव्या जगाला सर्वतोपरी साजेसा असा धर्म असून तो इहलोकीच मनुष्यमात्रास मुक्त करण्यास सर्वतोपरी समर्थ असाच धर्म आहे. म्हणून मेल्याशिवाय स्वर्ग न दिसू देणाऱ्या इतर कोणत्याही धर्मापेक्षा तो केव्हाही श्रेष्ठाच ठरणारा बौध्द धर्माचे आचरण करणारी चालती बोलती माणसे जनतेच्या डोळ्यापुढे सतत उभी राखणे याच उद्देशाने बुध्दाने भिक्खसंघाची स्थापना केलेली आहे. सर्वसाधारण माणसांना बौध्द धर्माचे ध्येय साध्य करणे शक्य नसले तरी त्यांच्यापुढे बौध्द धर्माचा चालता बोलता आदर्श सतत ठेवत राहावा असाच भिक्षुसंघ स्थापना करण्यात व या संघातील भिक्षुसाठी विनयाची बंधणे निर्माण करण्यात बुध्दांचा उद्देश होता. याच उद्देशाची नितांत गरज आज दिसून येत आहे.

आज आपल्या समाजाने बौध्द धर्माचा स्वीकार केला आहे. पण गौतम बुध्दाने सांगितलेला स्वत: विचार करण्याचे तत्व आत्मसात केले नाही. आपण शब्द प्रमान्य स्वीकारतो. स्वत: विचार न करता दुसऱ्याच्या शब्दाला चिकटून राहतो. शब्दाला चिकटून राहण्याच्या प्रवृत्तीचे दुष्परिणाम आपल्या जीवनात अगदी ठळकपणे आढळून येातात. मनुष्य हिंसा करतो

ISBN-978-81-951551-6-3

म्हणतन तयाच्या जीवनात असंख्या कलह निर्माण होतात. म्हणून जीवनातील हिंसा नष्ट करण्यासाठी माणसाच्या मनात आमुलाग्र क्रांती झाली पाहिजे असे त्यांनी सांगितले आहे. माणसाने खऱ्या अर्थाने अहिंसक बनविण्यासाठी 'हिंसेने हिंसा वाढते' हे तत्व समजून ते अंगी आत्मसात केले पाहिजे. आपल्या स्वत:च्या स्वार्थी विचारांमुळे दु:ख निर्माण होते. म्हणून प्रत्येकाने आपले विचार स्वच्छ व सुजाण केले पाहिजेत यावर बुध्दाने भर दिला आहे. यासाठी त्यांनी दु:ख कोणत्या कारणामुळे निर्माण होते त्यांचे निरिक्षण करण्यास सांगितले. दु:खाची निर्मिती माणसाच्या दुराचामुळे घडते. मनुष्य स्वत:ची हिंसेने वागतो तसेच दुसऱ्याची हिंसेने वागतो म्हणून त्याच्या जीवनात दु:ख येते. दुसऱ्याच्या सुख दु:खाचा विचार न करता स्वत:च्याच हिताचा विचार करणारा मनुष्य हिंसेने वागणारा मनुष्य होय. जास्त नफा मिळावा म्हणून अन्न धान्य किंवा इतर वस्तुचा काळा बाजार करणारा किंवा दुष्काळ निर्माण करणारा व्यापारी हिंसा करीत असतो.

डॉ. आंबेडकरांच्या मते दारिद्र्य ही देशापुढील प्रमुख समस्या असून त्यावर उपाय म्हणजे देशाच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे हा होय. १२० कोटी लोकसंख्या झालेल्या या देशाला बाबासाहेबांच्या वरील विचारांची प्रकर्षाने आजही जाणीव होते आहे. त्यासाठी त्यावेळी लोकसंख्या नियंत्रीत करण्यासाठी कुटूंब नियोजन करणे हा प्रभावी उपाय सांगितला होता. जेव्हा १९२६ रोजी रॉयल कमिशन भारतात भारतीय चलन विषयक विचार विनिमय करण्यासाठी आले असता या कमिशनपुढे डॉ. आंबेडकरांची साक्ष झाली आणि आश्चार्य हे

ISBN-978-81-951551-6-3

की त्या कमिशनच्या प्रतयेक सदस्याजवळ बाबासाहेबांच्या भारतीय राष्ट्रीय नफ्याच्या वाटा ऐतिहासिक पृथक्करण या ग्रंथाची प्रत होती. यावरून अर्थशास्त्रातील डॉ. आंबेडकरांच द्रष्टेपण लक्षात आल्यावाचून राहात नाही. म्हणूनच ते केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील नामवंत अर्थशास्त्रज्ञामध्ये उच्च दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ व विचारवंत होते.

भारताच्या संदर्भात आर्थिक विचारधारा काही मूठभर व धनिक लोकांच्या हितास कशी फायदेशीर राहील याचा विचार करून येथील आर्थिक निती सरकारद्वारा राबविण्यात येत असते. या पार्श्वभूमीवर तत्कालीन परिस्थितीत भारताच्या विविध आर्थिक धोरणाविषयी डॉ. आंबेडकरांनी आपले परखड विचार मांडलेले आहेत. त्यात प्रामुख्याने भारतीय अंदाज पत्रके, संविधानातील भाषणे, १९३६ रोजी त्यांनी स्थापलेला स्वतंत्र मजूर पक्ष, १९४२ रोजी त्यांनीच स्थापलेला शेड्युल कास्ट फेडरेशन व १९५७ रोजी स्थापना झालेली रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षाची ध्येय व धोरणे पाहिली तर याद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार व्यक्त झालेले दिसतात. भारतात आर्थिक समानता प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक आहे.

धर्माने व्यक्तीला विकासाची पूर्ण संधी उपलबध करून द्यायला हवी, पण धर्माचे विशेषत: हिंदू धर्माचे तत्वज्ञान पाहिले तर ते मुळातच असमानतेवर आधारित आहे. शिवाय गरीब हा त्याच्या पूर्व जन्माच्या फळांमध्ये गरीब आहे, असे सांगून दारिद्र्याचे गोडवे गाणारे व दारिद्र्याचे उदाततीकरण करणारे आहे.

ISBN-978-81-951551-6-3

याउलट बौध्द धम्म हा व्यक्ती गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाला उन्नत जीवन जगण्याची पूर्ण संधी उपलब्ध करून देतो. एखाद्या सामाजाची स्थिती दयनीय, दरिद्री होण्यामागील मानवी कारणांची चिकित्सा करतो. परिश्रमाच्या बळावर उन्नती साधता येते असा आशावाद व्यक्तींमध्ये रूजवितो. यामुळेच बौध्द धम्म स्वाकारलेली व्यक्ती परिश्रमपूर्वक कष्ट करून स्वत:ची परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्नशील दिसते. या संदर्भात सर्व्हेक्षणात दिसून आले की, धर्मातरापूर्वी जातीव्यवस्थेने ठरवून दिलेली गलिच्छ व हलकी 'महारकी'ची कामे अस्पृश्यांना करावी लागत. धम्म दीक्षेनंतर मात्र बौध्दांनी महारकीची सर्व कामे टाकून दिली. त्यांनी मिळेल ते नवे काम – व्यवसाय करण्यास प्रारंभ केला. परिणामी त्यांच्यात कमालीची व्यावसायिक गतिशीलता निर्माण होवून त्याचीच परिणती शेती, मजुरी असे व्यवसाय सोडून चांगल्या पगारांच्या सरकारी नोकऱ्या मिळविण्यात झाली. संशोधनासाठी केलेल्या पाहणीत बौध्दांच्या मागील दोन पिढ्यांपेक्षा तिसऱ्या पिढीत नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक झाले. या सर्व प्रक्रीयेद्वारे बौध्दांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागला. त्यांचे पूर्वाश्रमीचे दरिद्री जीवन संपुष्टात आले. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांची हिंदू समाज व्यवस्थेने लादलेल्या फुकटात श्रम पुरविण्याच्या बेठबिगारीतून मुक्तता झाली. धर्मातरित बौध्दांमध्ये झालेला हा आर्थिक बदल आजही प्रस्थापित बहुसंख्यांक स्पृश्य जातीतील लोकांच्या तुलनेत अल्प असला तरी जे मुळातच दरिद्री व कंगाल होते ते लोक धर्मातरानंतर आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनले. ही गोष्ट आज भारतातील चाळीस टक्के



ISBN-978-81-951551-6-3

लोक दरिद्री रेषेखाली जीवन जगत असतांनाच्या पार्श्वभूमीवर निश्चितच महत्वूपर्ण इरते. इतर दरिद्री समुहासाठी प्रेरणादायी ठरते.

भारतातील परंपरावादी धर्मव्यवस्थेने दलित–शोषित समाजाचे प्राचीन काळापासून राजनैतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक शोषन करता आले आहे. याच कारणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजाच्या आर्थिक ढांच्याला संविधानाच्या मुलभुत नियमांच्या अंतर्गत करण्याच्या प्रयत्नांत होते. भारतासारख्या गरीब, आर्थिक तसेच सामाजिक असमानतेने ग्रस्त अश्या देशात समाजवादी अर्थव्यवस्थाच असावयास पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. यालाच वास्तविकतेचे स्वरूप देण्याकरिता त्यांनी घटना समितीची 'स्टेट्स ॲन्ड मायन्यारिटीज' नावाचा प्रबंध प्रस्तुत केला. या प्रबंधाची दोन विशेषता होत्या.

भारताची आर्थिक धोरण राज्य समाजवादी असली पाहिजे. या अर्थव्यवस्थेला स्थापना करण्याचे काम विधिमंडळावर निर्भर न ठेवता ते घटनात्मक विधिनियमाच्या आधारावर निश्चित करावयास पाहिजे. कारण विधिमंडळातील कार्यकारी मंडळला कुठल्याही कायद्याने या अर्थव्यवस्थेत बदल करता येणे शक्य नसले पाहिजे. या प्रबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रात समतेसाठी आणि मागासवर्गीय लोकांच्या कल्याणासाठी, समाज शोषणमुक्त करण्यासाठी आपले आर्थिक विचार स्पष्ट केले आहे.

निष्कर्ष :–

बौध्द मताचे शास्त्रशुध्द असे वेगळे स्वरूप म्हणजे त्यातील मतांची बदलत्या समाजधारणांना आत्मसात करून



ISBN-978-81-951551-6-3

घेण्याची प्रवृत्ती परिवर्तन हा केवळ समाजाचाच नियम नाही तर तो निसर्गाचाही आहे. त्यामुळे बौध्दमताने आपल्या मूलभूत धारणेमध्ये या तत्त्वाला बिंबविले आहे. बौध्दमताने या मीमांसेला बीजनियम असे म्हणजे आहे. आणि बौध्द मताची हे आगळे वैशिष्ट्य लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांची संजीवनी होय. बौध्द मत 'रिलीजन ऑफ प्रिन्सिपल' आहे. त्यामुळे बदलत्या समाजसुधारणांनुसार लोकशाही प्रक्रियेने अशा नियमांना निर्माण करता येत यालाच आधुनिक संज्ञेत लोकशाही म्हणतात. अशा प्रकारचे विचार स्वातंत्र्य केवळ बौध्दमतानेच दिलेले आहे.

बौध्द मताने प्रतिपादन केलेली विशेष मूलभूत बाबा म्हणजे नीतिमत्ता, ही नीतिमत्ता म्हणजेच धम्म होय. नीतिमत्तेशिवाय समाजसुधारणा होऊ शकत नाही. अर्थात या नीतिमत्तेच्या उभारणी स्वातंत्र्य, बंधुता, न्याय यांच्या संवर्धनासाठी झालेली आहे. या समाजमनाच्या बदलत्या प्रवृत्तीचे नियंत्रण नीतिमत्तेनेच करावयाचे आहे. बाबासाहेब आंबेडकर या नीतिमत्तेलाच धम्म म्हणतात आणि या नीतिमत्तेलाचे लोकशाही म्हटले आहे.

भारतीय राज्य घटना अंमलात येवून आज ६५ वर्षे लोटली तरी राज्य घटनेच्या या शिल्पकाराला अपेक्षित असणारी आर्थिक समता प्रस्थापित होऊ शकली नाही हे सत्य आहे. म्हणून त्यांचा वरील इशारा आजही दिपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरणारा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आर्थिक परिवर्तनाला लोकशाहीचे प्राण मानतात. भारत सरकारच्या अर्थव्यवस्थेचे शिथीलीकरण, मुक्तीकरण व खाजगीकरण या त्रिसुची फॉर्म्युल्यामुळे डॉ. आंबेडकर प्रणीत लोकशाही आर्थिक दृष्टीने

ISBN-978-81-951551-6-3

कमकुवत झाली आहे, मोडकळीस आली आहे. यामुळे १२० कोटी लोकसंख्या असलेल्या या देशाला डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाची खरी आवश्यकता आहे.

संदर्भ ग्रंथ :—

१. जाधव राजा (१९९४), डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्य चळवळ, रू. राजलक्ष्मी प्रकाशन, मुंबई
२. खांडेकर ताराचंद, 'आंबेडकर तत्त्वज्ञान: प्रचिती आणि आविष्कार, संकेत प्रकाशन, नागपूर, २००९, पृ. १३७
३. ओळे भा. ल. 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जून २००३, पृ. ५४५
४. महावगपल्लि, हिंदी अनुवाद आणि संपादक स्वामी द्वारकादास शास्त्री, वाराणसी, बौध्द भारती प्रकाशन, पृ. ३५
५. संपादक—प्रा.निंबाळकर, वामन, सामाजिक क्रांतीची दिशा (प्राचार्य म.मि.चिटणीस समग्र वाड्.मय) प्रबोधन प्रकाशन नागपूर, २००७
६. अनुवादक इंजि. पाटील, व्ही.टी. बुध्द आणि त्याचा धम्म, लेखक डॉ. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल असोशिएशन, ऑफ इंजिनिअर्स, नागपूर — २०१३
७. बौध्दधर्माची मुळतत्वे — भिक्षु धर्मराक्षीत
८. जगाला बौध्द धर्माशिवाय तरणोपाय नाही — लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर
९. बुध्द — विचार — विवेचन — दि. मा. खेरकर
१०. बौध्द धम्मसार — उदित राज


भारतीय विचारवंत
संपादक
डॉ. नीलम छंगाणी
डॉ. नितीन चौधरी



भारतीय विचारवंत

(INDIAN THINKER)

संपादक

डॉ. नीलम छंगाणी
एम.ए., पीएच.डी.
सहाय्यक प्राध्यापक
तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री. किसनलाल नथमल गोयनका
कला व वाणिज्य महाविद्यालय
कारंजा (लाड) जि. वाशिम

डॉ. नितीन चौधरी
एम.ए., एम.फील., पीएच.डी.
सहाय्यक प्राध्यापक
तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती राधादेवी गोयनका
महिला महाविद्यालय, अकोला
जि. अकोला

अजिंक्य प्रकाशन

भारतीय विचारवंत : डॉ. नीलम छंगाणी, डॉ. नितीन चौधरी

प्रकाशक :

ॲड. कु. जे. व्हि. भगत
अजिंक्य प्रकाशन
भिमनगर, वापटा पो. कुपटा
ता. मानोरा जि. वाशिम

संपर्क : ९६०४४०२०५३
WhatsApp : 8007143527
Website : www.ajinkyapublication.com
E-mail : ajinkyapublication@gmail.com

ISBN :978-93-90532-20-9

© लेखकाधिन

प्रथम आवृती : जानेवारी २०२१
अक्षर जुळवणी : अजिंक्य प्रिंटीग्स् ॲण्ड कॉम्प्यूटर्स
मुखपृष्ठ : अरविंद मनवर
मुद्रक : अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम
प्रमुख विक्रेता: अजिंक्य पुस्तकालय, वाशिम
संपर्क : ८००७१४३५२७ / ९६०४४०२०५३
किंमत : रु.४५० फक्त

(या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

CRITERION III: RESEARCH, INNOVATIONS AND EXTENSION
Metric: 3.3.3- Books and chapters in edited volumes/books published

	डॉ. अनिल ठाकरे	१३९
३०.	१९६० नंतरची दलित कथा : एक आकलन / डॉ. अशोक वाहुरवाघ	१४१
३१.	पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन / डॉ. अमित गावंडे	१४६
३२.	राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन / डॉ. भारती देशमुख	१५२
३३.	गानसरस्वती किशोरीताई आमोणकर : एक प्रयोगशील गायिका / प्रा. विवेक चापके	१५७
३४.	विनायक दामोदर सावरकरांची राजकीय विचार सृष्टी / डॉ. व्ही. आर. कोडापे	१६३
३५.	राजश्री शाहु महाराजांचे सामाजिक व शैक्षणिक विचारांचे विश्लेषणात्मक अध्ययन / प्रा. अमरिष गावंडे	१६८
३६.	राष्ट्रपिता महात्मा गांधी / प्रा. दिपाली देशमुख	१७२
३७.	थोर साहित्यिका सावित्रीबाई फुले / प्रा. दिपाली शिरसाट	१७६
३८.	आधुनिक विख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर / डॉ. बालाजी राठोड	१८२
३९.	अनुभवमंटप प्रत्यक्ष लोकशाहीसाठी संसद : महात्मा बसवेश्वर / डॉ. व्यंकट पाटील	१८८
४०.	खाशाबा दादासाहेब जाधव यांचा ऑलिम्पिक मेडलचा रोमांचक प्रवास / डॉ. तातेराव केंद्रे	१९२
४१.	आचार्य विनोबा भावे और विश्वस्त वत्ती / डॉ. तुषार कोटक	१९७
४२.	डॉ. रंगनाथन - ग्रंथालयाचे भीष्म पितामह / डॉ. नामदेव राठोड	२०१
४३.	छत्रपती शाहूमहाराजांचे जातिभेदाच्या विध्वंसक उच्चाटनार्थ कार्य / डॉ. शाम दुतोंडे	२०५
४४.	पंजाब केसरी लाला लजपतराय यांचे ब्रिटिश शासनाविरुद्ध धोरण / प्रा. डॉ. आर. पी. झनके	२१०

गानसरस्वती किशोरीताई आमोणकर : एक प्रयोगशील गायिका

प्रा. विवेक संतोषराव चापके
सहायक प्राध्यापक
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला

घराणे ही संकल्पना न मानता केवळ आणि केवळ संगीतच हे शाश्वत सत्य आहे असे मानणारी जेष्ठ आणि श्रेष्ठ गायिका म्हणजे 'गानसरस्वती' किशोरिताई आमोंणकर या होत. भारतीय शास्त्रीय संगीतात घराणेशाही ही फार काळापासून अस्तित्वात आहे आणि सर्व मोठ्मोठे कलाकार तसेच संगीतकार याच घराणेदार पद्धतीतून म्हणजेच गुरु-शिष्य परंपरेतून तयार झालेले आहेत. परंतु किशोरीताईंसारख्या प्रयोगशील गायिकेने कोणत्याही विशिष्ट अशा एकाच घराण्याची गायकी आत्मसात न करता किंवा एकाचं घराण्याचे रीती-नियम आदि न पाळता इतर घराण्यांचा देखील अभ्यास करून,प्रत्येक घराण्यात ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या मोठ्या आत्मीयतेने शिकून आणि त्यांचा आपल्या गायकीत समावेश करूनआपली गायकी जोपासली आणि पुढील नवीन पिढीमध्ये ती पेरली. स्वतःच्या कुशाग्र अभ्यासू व कल्पक अशा वृत्तीमुळे ख्यालगायनात नवनवीन प्रयोग करून तसेच ठुमरी, दादरा, भजन, गझल, भावगीत इत्यादी आविष्कृतीत स्वतःचे अधिकारत्व सिद्ध केले. आणि म्हणूनच असे म्हणणे वावगे ठरणार नाही, की स्वतःच्या प्रयोगशील गायकीच्या माध्यमातून भारतीय शास्त्रीय संगीतात स्वतःचे नवीन असे एक घराणेच जणू किशोरीताईंनी निर्माण केले.

घरातूनच संगीताचे बाळकडू :

घरातच मोगुबाईंसारख्या श्रेष्ठ शास्त्रीय गायिका आई म्हणून लाभल्याने किशोरीताईंच्या कानावर शास्त्रीय संगीताचा संस्कारलहानपणा पासूनच झाला. माईंचे नाव भारतीय शास्त्रीय संगीतात फार आदराने व अभिमानाने घेतले जाते. अशा जयपूर-अत्रौली घराण्याच्या सुप्रसिद्ध गायिका म्हणजे गानसरस्वती किशोरिताई आमोंणकर होत. संगीत स्वरांच्या या आकाशात तेजपूंज सूर्या समान तेजोमय असणाऱ्या गानकोकिळा किशोरीताई या संगीत सूर्याचा जन्म १० एप्रिल १९३२ रोजी मुंबई येथे झाला. जयपूर घराण्याच्या सुप्रसिद्ध गायिका गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर व माधवदास भाटिया या दाम्पत्याच्या पोटी किशोरीताईंचा जन्म झाला. संगीताचे अध्ययन करायचे झाल्यास त्याकरिता योग्य गुरु मिळायला हवा जे महत् भाग्य किशोरी ताईंना लाभलं होतं आणि याचे कारण म्हणजे एखाद्या घरंदाज कलावंताच्या पोटी जन्माला येणं. हे कलावंत म्हणून बाळसण तसेच संगीताचं बाळकडू लाभन या सर्व गोष्टी यांचा योग जुळून येणंकिशोरीताईंसाठी खरोखरीच महत भाग्याच ठरलं. किशोरीताईंच शालेय शिक्षण मुंबईमधील बालमोहन व प्रार्थना समाज या शाळांमध्ये झालं. पुढे महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी जयहिंद महाविद्यालयातून घेतलं. पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी विज्ञान शाखेतून घेतल आणि हेच कारण असू शकतं की त्यांची चिकित्सक अभ्यासू वृत्ती आपल्याला त्यांच्या गायनात देखील दिसून

येते. किशोरीताई ह्या मोगुबाईंच्या तीन अपत्यांपैकी ज्येष्ठ कन्या होत्या. १९३९ मध्ये पती माधवदास यांचे निधन झाल्यामुळे मोगुबाईंना घरसंसार चालविण्यासाठी अर्थार्जन करणे भाग पडले व त्यासाठी त्या घराबाहेर पडल्या. तीन मुलांची जबाबदारी त्यांच्यावर असल्यामुळे त्यांना घराबाहेर पडणं भाग पडलं.

माईची कडक व शिस्तबद्ध तालीम :

मोगुबाई कुर्डीकर म्हणजेच किशोरीताईंच्या आई. त्यांना सर्वजण प्रेमाने माई म्हणत असत. माई या कडक शिस्तीच्या भोक्त्या होत्या. त्यांच्या कडक शिस्तीच्या तालमीत बाल किशोरीताईंनी गायनाचे धडे गिरविण्यास सुरुवात केली. उस्ताद अल्लादिया खाँ साहेबांकडून मोगु बाईंना जी गायनाची तालीम मिळत असे त्याच तालमीचा व गायकीच्या अंगाचा खोल संस्कार बालवयातच किशोरीताईंवर होऊ लागला. सोबतच मोगूबाई यांनीदेखील जयपूर घराण्याची गायकीची तालीम द्यायला सुरुवात केली. मोगुबाईंनी किशोरीताईंना जयपूर घराण्याची शिस्तशीर व विधिवत अशी तालीम दिली. माईंकडून मिळालेली संगीत तालीम हा त्यांच्यासाठी एक अद्‌भुत असा ठेवा होता. आजन्म सोबत पुरणारी ही स्वरमयी शिदोरी किशोरीताईंनी शेवटच्या श्वासापर्यंत जपून ठेवली.माईंच्या शिकवणी बद्दल किशोरीताई सांगत, रागदारी शिकवीत असताना रागातील एखादी सुरावट एक वेळा गायल्यानंतर त्या तीच सुरावटपुन्हा गात नसत. माईंनी किशोरीताईंना गायन शिकण्यापासून कधीही रोखले नाही किंबहुना त्यामुळेच सर्व घराण्यातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशा गुरूंकडून किशोरीताई तालीम घेऊ शकल्या. माईंची अशी इच्छा होती की किशोरीताईंनी सर्वचघराण्यांचीतालीम घ्यावी जेणेकरून त्यांचा आवाज पाण्यासारखा नितळ व स्वच्छ असा होईल. लहानपणापासूनच त्या माईंबरोबर स्टेजवर तानपुरा च्या साथी करिता बसत. माईंनी त्यांना जयपूर घराण्याची संपूर्ण तालीम दिली. माईंनी त्यांना वेगवेगळेव अनवट राग शिकविले व किशोरीताईंनी देखील त्याच रागांचा भरपूर रियाज केला, जेणेकरून त्या रागांची गायकी त्यांच्या गळ्यात चपखल बसेल. मोगूबाई शिकवण बाळकृष्ण पर्वतकर, आग्रा घराण्याचे अन्वर हुसेन खान, जयपूर घराण्याचे मोहनराव पालेकर, भेंडीबाजार घराण्याच्या अंजनीबाई मालपेकर व काहीकाळ मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर आणि शरदचंद्र आरोलकर यांचेही मार्गदर्शन किशोरी ताईंना लाभले.

सांगीतिक कारकीर्द :

किशोरी ताईंना लहानपणापासूनच गायनाची अत्यंत आवड असल्याने कुशाग्र सांगितिक सौंदर्य बुद्धीच्या जोरावर ख्याल गायकीसोबतच ठुमरी, भजन, अभंग, गझल यासारख्या उपशास्त्रीय गायन प्रकारात देखील लहान वयातचप्राविण्य मिळविले. इथपर्यंतच आपल्या गाण्याचा प्रवास न थांबवता त्यांनी चित्रपट संगीतात देखील पार्श्वगायन केले. "गीत गाया पत्थरोंने" या हिंदी चित्रपटासाठी किशोरीताईंनी पार्श्वगायन केले परंतु माईंना ही गोष्ट खटकली व त्यांनी किशोरी ताईंना शास्त्रीय गायनावरच आपले लक्ष केंद्रित करायला सांगितले. पण नंतर चित्रपट संगीताकडे ओढ असल्यानेपुढे चालून त्यांनी १९९० मध्ये 'दृष्टी' या हिंदी चित्रपटास

संगीत देखील दिले. संत साहित्याचा देखील त्यांच्या मनावर प्रचंड पगडा होता. त्यांनी बरेच मराठी अभंगांनासंगीत दिले.किशोरीताईंनी भारतभरआपले संगीताचे कार्यक्रम केलेत आणि भारतातीलबहुतेक सर्वच प्रमुख संगीत महोत्सवांत आपली कला सादर केली. या सर्वच महोत्सवांत त्यांना अतिशय सन्मानपूर्वक बोलावले जात असे. गायना बरोबरच त्यांनी भारतभर भ्रमण करून रससिद्धांत यावर देखील अनेक भाषणे केलीत. त्यांनी 'स्वरार्थरमणी-रागरस सिद्धांत' हा शास्त्रीय संगीतावर आधारित ग्रंथदेखील लिहिला. राग, मल्हार मालिका, म्हारो प्रणाम, घट घट मे पंछी बोलता, प्रभात, समर्पण, संप्रदाय, बॉर्न टू सिंग, लाईव्ह इन लंडन ह्या त्यांच्या गाजलेल्या काही ध्वनिमुद्रिका होत.

गायन शैली :

"There is nothing called a gharana.There is only music.It has been found in this gharanas and that is like dividing music into specific castes.One should not teach the students the limits of this art. There are none. But one has to understand the grammar.Which is why, one is taught the alankar the ragas."

घराण्याबद्दल किशोरीताईंचे स्पष्ट आणि परखड असं मत होते. घराणे ही संकल्पना न मानता केवळ आणि केवळ संगीत मात्र अस्तित्वात आहे असे किशोरीताई मानत. घराणे हे संगीताला विशिष्ट जातींमध्ये विभाजित करतात असे त्यांचे मत होते. कोणत्याही गुरुने आपल्या शिष्याला संगीत कलेच्या सीमांत बंदिस्त करून न ठेवता त्याला मुक्तपणे, स्वच्छंदी, एखाद्या पक्षाप्रमाणे आकाशात विहार करू द्यायला हवा असे त्यांचे गुरु-शिष्य परंपरेबद्दल स्पष्ट मत होते. संगीत हे काय आहे? त्याचे व्याकरण कसे आहे? हे समजून घ्यायला हवे, तसेच प्रत्येक शिष्याला अलंकार, राग, पलटे हे शिकविल्या जायला हवेत; जेणेकरून त्यारागातील व्याकरण त्याला सहज कळेल. हे सर्व कळल्यावर तो शिष्य हे सर्व समजून घेऊन त्याच्या मनातील विचार व कल्पना प्रत्यक्ष स्वतःच्या गायकीत अंगीकारून ते श्रोत्यांसमोर सादर करेल.

घराण्यांमध्ये बंदिस्त राहून आपल्या गायन कलेचा उत्कर्ष करणे त्यांना कदापि मान्य नव्हते. त्यामुळे जेथून जे मिळेल तेथून ते ते ग्रहण करत, त्याचा उपयोग आपल्या गायनाविष्कारात करून एका निराळ्याच पद्धतीची गायकी निर्माण केली. स्वतःचे वेगळे असे घराणेच जणू त्यांनी निर्माण केले. त्या काळातील अथवा त्या आधीच्या देखील काळातील गायिकांनी तिलवाडा, झुमरा, विलंबितया सारख्या तालांमध्ये बंदिशी गायल्या. किशोरीताईंनी सादरीकरणाकरिता विलंबित तीनताल, झपताल हे जयपूर घराण्याच्या पठडीतले ताल क्वचितच वापरले. आणि जयपूर घराण्याच्या गायकीतला उजळपणा अथवा बंदिस्तपणा पुरेपूर टाळण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या गायकीला एक लालित्य पूर्ण रूप देऊन बऱ्याच अंशी तो यशस्वी देखील ठरला. आपल्या गायकीत केलेल्या या सकारात्मक बदलामुळे त्यांच्या कर्मठ समजल्या जाणाऱ्या जयपूर गायकीला निराळच विलोभनीय रूप प्राप्त झालं. साठच्या दशकात त्यांना संगीतापासून काही काळ दूर राहावं लागलं. दोन वर्ष त्यांना त्यांचा आवाज गमवावा लागला

होता. परंतु हा काळ त्यांच्या फार सत्कारणी लागला असं त्या मानत. हा काळ त्यांनी स्वतःची गायकी विकसित करण्याकरिता लावला. या काळात त्यांनी संगीत विषयक अनेक ग्रंथांचे वाचन, चिंतन, मनन केले. भरत, नारद, शारंगदेव यांनी लिहिलेले ग्रंथ वाचून ते समजून घेऊन त्याचा स्वतःच्या गायकीत प्रत्यक्ष उतरवण्याचा प्रयत्न केला. रियाज व साधनेविषयी त्या म्हणतात की जसजशी तुम्ही साधना अथवा रियाज करत जाल तसा तो तुम्हाला पुढे जाण्यासाठी नवी ऊर्जा देतो. शास्त्रीय गायनाच्या मैफिली सोबतच किशोरीताईंनी संगीतातील रससिद्धांतावर अनेक ठिकाणी भाषणे देखील केलेली आहेत. रागाला विशिष्ट चौकट नसावी या मतांच्या त्या होत्या. प्रत्येक रागाची बढत ही आधी विलंबित लयीत आलाप, बोल आलाप, बोल ताना व शेवटी ताना याच अंगाने नसावी असे त्यांचे मत होते. प्रत्येक राग हा तानांनीच का संपतो? असा प्रश्न त्यांच्या मनाला पडायचा. मग त्यात काही बदल करून तो श्रोत्यांसमोर पेश करत. अशी आणि यासारख्या बऱ्याच वेगळ्या पद्धती त्यांनी श्रोत्यांसमोर मांडल्यामुळे अनेक परंपरावादी लोकांकडून टीकादेखील झाली. राग विषयी सांगताना किशोरीताई रागाला एका विशिष्ट चौकटीत बांधत नाहीत. निसर्गाला अनुस्यूत जे आहे त्यावरून रियाज करता करता राग हाच स्वतः जिवंत होतो तसेच चैतन्यमय होतो आणि त्याला जे काही पाहिजे ते तो करत असतो, तुमचा कंठ हा; तो राग श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याचे केवळ एक माध्यम असतो. राग नाट्य हे रागाचे एक स्वरूप आहे. किशोरीताई त्यांनी लिहिलेल्या त्यांच्या पुस्तकात राग गायन राग साधना राग नाट्य राग काव्य आणि राग ही रागाची स्वरूपे सांगतात.

किशोरीताईंनी त्यांच्या गायकीला अपेक्षित असलेली अभिव्यक्ती करणाऱ्या अनेक भावपूर्ण बंदिशी रचल्या. जसे भूप (प्रथम सूर साधे, सहेला रे, मै तेरी रे) यमन (मो मन लगन लागि, तोसे नेहा लागा), बागेश्री (बिरहा ना जरा, आज सह्योना जाये बिरहा, एरी माई साजन नही आये), नंद (आजा रे बालमा), खंबावती (रे निर्मोही सजना), हंसध्वनी (गणपती विघ्नहरण), यासारख्या अनेक रागातून बंदिशी त्यांनी रचल्या. तसेच आनंद मल्हार, सावन मल्हार हे राग देखील त्यांनी निर्माण केले. उस्ताद विलायत खान यांना किशोरीताई एक कलाकार आणि माणूस म्हणून फार मान देत असत. किशोरीताई त्यांच्यापेक्षा वयाने मोठ्या होत्या तरीदेखील नेहमी त्यांना चरणस्पर्श करून त्यांचा आशीर्वाद घेत. पंडित मल्लिकार्जून मन्सूर तर किशोरी ताईंना, "हमारे घर आने की शान" असे अभिमानाने म्हणत.

मराठी संगीतास दिलेले योगदान:

किशोरीताईंचे मराठी संगीतासाठीचे योगदान तसे फार काही जास्त नाही. मराठीत संगीतकार म्हणून त्यांच्या बहुतेक रचना ह्या संतांच्याच होत्या. परंतु ह्या सर्वच रचना त्यांच्या विशिष्ट अशा होत्या आणि सर्वसाधारण माणसाच्या हृदयाचा ठाव घेणाऱ्या होत्या. त्या सर्वच रचनांमध्ये त्यांचाअत्यंत सौंदर्यवादी दृष्टीकोन प्रकर्षाने दिसून येतो. स्वर लावण्याची पद्धत, दोन शहरांमधील असणारा स्वराचा लगाव, शब्द फेकताना केलेला ध्वनीचा चढ-उतार, अशा सर्व गोष्टींमुळे त्यांच्या अभंगांमध्ये एक वैशिष्ट्यपूर्ण असा माधुर्य ऐकू येत. किशोरीताईंच्या



गाण्यातील आधुनिक पणा हा त्यांच्या संपक समकक्ष असणाऱ्या इतर गायिकांची पेक्षा किंबहुना त्यांच्या नंतरच्या एक ते दोन पिढ्या आलेल्या गायिकांपेक्षा देखील अधिक वाखाणण्याजोगा होता. याचं कारण म्हणजे त्यांचं कुठलंही गाणं आता जरी ऐकलं तरी ते पूर्णपणे आजच वाटतं. कुठलीही ओळ सोडताना ज्या पद्धतीने शेवटच्या सुराची आस त्या कायम ठेवत, ते अतिशय विलक्षण अस होतं. परंतु जवळजवळ साठ-सत्तर वर्षांपूर्वी हे तंत्र किशोरी ताईंना उमगलं होतं आणि त्याच्याच जोरावर त्यांच्या गायकीने उत्तुंग असे शिखर घातले होते. किशोरीताईंच्या सर्व रचनांमध्ये प्रकर्षाने जाणवणारी एक गोष्ट म्हणजे त्यांनी त्या रचनांना दिलेला अतिशय दमदार आणि सुरेल असा ताल हा होय. ताल या अंगा विषयी सांगायचे झाल्यास किशोरीताई स्वतः तबला वाजवून विद्यार्थ्यांना तालाविषयीचे बारकावे अगदी सुस्पष्टपणे समजावून सांगत असत. त्यांनी संगीत दिलेले काही अभंग - अवघा तो शकुन, बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल, अवघा रंग एक झाला, या पंढरीचे सुख, मी माझे मोहित. याच बरोबर 'हे श्यामसुंदर' आणि 'जाईन विचारीत रानफुला' या सुगम संगीतातील रचना देखील त्यांनी गायिल्या.

पुरस्कार व सन्मान:

- संगीत नाटक अकादमी पुरस्कार, इ.स. १९८५
- गानसरस्वती इ.स. १९८७
- पद्मभूषण पुरस्कार, इ.स. १९८७
- संगीत सम्राज्ञीपुरस्कार, इ.स. १९९७
- गोदावरी गौरव, इ.स. १९९८
- पद्मविभूषण पुरस्कार, इ.स. २००२
- आय टी सी संगीत रिसर्च अकादमी पुरस्कार इ.स. २००३
- संगीत नाटक अकादमी फेलोशिप, इ.स. २००९
- पु. ल.देशपांडे बहुरूपी पुरस्कार इ.स. २००९
- किशोरीताई आमोणकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी 'गानसरस्वती महोत्सव' नावाचा गायन-वादन-नृत्य असा तीन दिवसांचा संगीताचा कार्यक्रम होतो.
- गानसरस्वती किशोरी अमोणकर यांचे नावाचा पुरस्कार देखील दरवर्षी दिल्या जातो.

शिष्यवर्ग :

किशोरीताईंच्या प्रयोगात्मक गायकीच्या रूपात लावलेला वटवृक्ष त्यांचा संपूर्ण शिष्यवर्गरूपि दाट फांद्यांच्या छायेत श्रोतृसम वाटसरूंना शास्त्रीय, उपशास्त्रीय, सुगम संगीताची शीतल छाया प्रदान करत आहे. त्यांची नात तेजश्री अमोणकर तर त्यांच्या गायकीचा वारसा घराघरातून पुढे चालवत आहे. त्यांची उच्चविद्याविभूषित शिष्य मंडळी म्हणजे माणिक भिडे, पद्मा तळवलकर, अरुण द्रविड, सुहासिनी मुळगावकर, देवकी पंडित, अश्विनी भिडे-देशपांडे,

रघुनंदन पणशीकर, मीरा पणशीकर, मीना जोशी, नंदिनी बेडेकर, विद्या भागवत, माया उपाध्याय, किशोरी ताईंची नात तेजश्री आमोणकर, व्हायोलिन वादक मिलिंद रायकर यासारखे अनेक कलावंत होत.

सांगीतिक प्रयोगरुपी सूर्याचा अस्त :

आपल्या प्रयोगात्मक गायनशैलीच्या माध्यमातून सर्व श्रोतृवर्गाला भुरळ पाडणाऱ्या सूर्याचा अस्त निसर्गाच्या नियमाप्रमाणे वृद्धापकाळाने वयाच्या ८४ व्या वर्षी मुंबई येथे झाला. परंतुशिष्यरुपि अनेक सूर्य या आकाशात नेहमीसाठी प्रकाश देत राहण्यासाठी.

संदर्भ :

- विकिपीडिया
- संगीतातील घराणी आणि चरित्रे, मंगरूळकर डॉ. नारायण, प्रकाशिका सौ. विजया मंगरूळकर सिताबर्डी, नागपूर.
- संगीत कला विहार, किशोरी आमोंणकर विशेषांक, मिरज, १९८८
- भिडे नरेंद्र, दैनिक लोकसत्ता, वेगळी वाट, ०८/११/२०२०
- सिंग, गुरींदर एच., द हिंदू, किशोरी आमोंणकर : अ व्हॉइस ऍज फ्लुईड ऍजवॉटर, ३१/०३/२०१८
- यू ट्यूब-संग्रहीत मुलाखत


भारतीय विचारवंत
संपादक
डॉ. नीलम छंगाणी
डॉ. नितीन चौधरी

भारतीय विचारवंत : डॉ. नीलम छंगाणी, डॉ. नितीन चौधरी

प्रकाशक :

ॲड. कु. जे. व्हि. भगत
अजिंक्य प्रकाशन
भिमनगर, वापटा पो. कुपटा
ता. मानोरा जि. वाशिम

संपर्क : ९६०४४०२०५३
WhatsApp : 8007143527
Website : www.ajinkyapublication.com
E-mail : ajinkyapublication@gmail.com

ISBN :978-93-90532-20-9

© लेखकाधिन

प्रथम आवृती : जानेवारी २०२१
अक्षर जुळवणी : अजिंक्य प्रिंटीग्स् ॲण्ड कॉम्प्यूटर्स
मुखपृष्ठ : अरविंद मनवर
मुद्रक : अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम
प्रमुख विक्रेता: अजिंक्य पुस्तकालय, वाशिम
संपर्क : ८००७१४३५२७ / ९६०४४०२०५३
किंमत : रु.४५० फक्त

(या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

४५.	सावित्रीबाई फुलेंच्या शैक्षणिक विचारांचे समाजशास्त्रीय अध्ययन / डॉ. सुनिल गायगोळ	२१४
४६.	भारतीय विचारवंत / डॉ. केशव गोरे	२२०
४७.	स्वामी विवेकानंदाच्या विचारातील भारतीय स्त्री / प्रा. जगदीश जायेवार	२२६
४८.	भारतातील उदारमतवादी राजकीय विचारवंत न्यायमूर्ती रानडे / डॉ. आशिष मुठे	२३१
४९.	भारतीय स्त्री विचारवंत / डॉ. सुनिता राठोड	२३५
५०.	वि. वा. शिरवाडकर यांच्या नाटकातील जीवनवाद / डॉ. रविंद्रनाथ केवट	२४१
५१.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : समाज आणि राष्ट्रउद्धारक विचारवंत / प्रा. स्वप्नील इंगोले	२४९
५२.	तत्त्वज्ञ जीवनयोगी विनोबा भावे / प्रा. रेखा आढाव	२५५
५३.	भारतीय शास्त्रीय संगीताचे शास्त्रकार - पं. विष्णु नारायण भारतखंडे / प्रा. एस. व्ही. शिंदे	२५९
५४.	महात्मा ज्योतीबा फुले आणि शिक्षण / डॉ. कविता कावरे	२६२
५५.	पंडीत जवाहरलाल नेहरुंचे भारतीय लोकशाहीतील योगदान / डॉ. बी. आर. भोसले	२६७
५६.	सरदार वल्लभभाई पटेल यांचे भारताच्या अंतर्गत सुरक्षानीति / प्रा. शेषराव तायडे	२७१
५७.	राजर्षी शाहू छत्रपती महाराजाचे शैक्षणिक विचार / प्रा. पुरूषोत्तम बांडे	२७६
५८.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील समाजजीवन / डॉ. देविदास शिंदे	२८२
५९.	पंडित विष्णू नारायण भातखंडे : संगीतातील एक थोर विचारवंत / प्रा. सुमेध सगणे	२८८
६०.	संत कबीरकें नारीसंबंधी विचार / डॉ. जितेंद्र शेळके	२९३
६१.	हिन्दी साहित्य का छायाबाद व गांधी विचार धारा / डॉ. सुरेश केसवानी	२९८

पंडित विष्णू नारायण भातखंडे : संगीतातील एक थोर विचारवंत

प्रा. सुमेध बाबुराव सगणे
सहाय्यक प्राध्यापक, संगीत विभाग,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला, महाविद्यालय अकोला

इ.स. १८५७ चा भारताचा स्वातंत्र्याचा लढा संपून तीन वर्षे लोटली तरी लढ्याची आग वरून विझल्यासारखी दिसत असूनही शांततेचा भास निर्माण करणाऱ्या रक्षेत स्वातंत्र्य हक्काच्या विविध वासना धुमसतच राहिल्या. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, फेरोझशाह मेहता वगैरे राष्ट्राचे थोर पुढारी जन्मास येऊन नुकतेच बोला-चालायला लागले होते;तर कित्येक इतर पुढारी जन्मास यायचे होते. हे इतर पुढारी राष्ट्राचे खरेखुरे निर्माते ठरले. कारण याच थोर लोकांनी स्वातंत्र्याचा मार्ग सुकर व मोकळा केला. पारतंत्र्याच्या शृंखलेतून भारताला अखेर मुक्त करणाऱ्या महात्मा गांधीच्या पूर्वी हे पुढारी होऊन गेले.

या राष्ट्रनिर्मात्यांमध्ये पंडित विष्णू नारायण भातखंडे सुध्दा एक थोर विचारवंत होऊन गेले, पण त्यांनी अगदी वेगळ्या दिशेने कार्य केले. 'हिंदुस्थानी संगीत' हे त्यांचे कार्यक्षेत्र होते. त्या क्षेत्रात ते अखिल भारतीय पातळीवरील एक युगप्रवर्तक व्यक्ती ठरतात.

अखिल देशभर पंडित भातखंडे म्हणून ओळखले जाणारे विष्णू नारायण भातखंडे यांचा जन्म शके १७८२ च्या श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभदिनी म्हणजे इ.स. १८६० च्या १० ऑगस्ट रोजी झाला. त्यांचे वडील नारायणराव भातखंडे हे मुंबईतील एका मोठ्या इस्टेटीचे वहिवाटदार व हिशेब तपासनीस होते. त्यांना तीन पुत्र व दोन कन्या अशी अपत्ये झाली.

समुद्राच्या किनाऱ्यसाललगत असलेल्या 'मलबार हिल' नावाच्या टेकडीच्या पायथ्याशी 'वाळकेश्वर' म्हणूनन प्रसिध्द असलेल्या पवित्र देवस्थानी भातखंडे कुटुंब राहत असे.

कोकणातील नागाव नावाच्या खेड्यातून भातखंडे कुटुंब मुंबईस आले. कुटुंबाचे दैवत दत्तात्रेय असल्याकारणाने त्याचे छोटेसे मंदिर नारायणरावांच्या घरी होतेच. भातखंडे कुटुंब साधे व गरीब राहणीचे होते. त्याला ऐश्वर्य ठाऊकच नव्हते.

संगीत विषयक बुध्दी विष्णूला अगदी बाळपणापासूनच सुप्तावस्थेत असली पाहिजे व त्या वेळच्या रिवाजाप्रमाणे आईने गाइलेल्या सुमधुर अंगाई गीतांनीचे ती उत्तेजित झाली असावी. वडील पण संगीतास अपरिचित नव्हते. तथापि त्या आई वडिलांना आपला मुलगा हिंदुस्थानी संगीतात नामवंत व्हावा किंवा त्या क्षेत्रात त्याने नवचैतन्य उत्पन्न करावे अशी कधीच इच्छा वा अपेक्षा बाळगली नव्हती.

शाळेतील अभ्यासाच्या प्रगतीत संगीताची आडकाठी त्यास मुळीच भासली नाही. शाळेतील शिक्षणक्रम संपवून विष्णू मॅट्रिक परीक्षा पास झाला व इ.स. १८८० कॉलेजमध्ये दाखल झाला. तरूणपणी कॉलेजात असताना भातखंड्यांनी सतार वाजविणे सुरू केले.

गोपालगिरी नावाचा वाळकेश्वरचा एक गोसावी रहिवासी सतार वाजवीत असे. अलीहुसेनखाँ (बीनकार) यांचा हा शिष्य. विष्णूने एक दिवस त्याचे वाजविणे ऐकल्यावर सतारीचा छंद घेतला. पुढे वल्लभदास दामुलजी यांच्याकडे विष्णूने सतारीचे विधीवत शिक्षण घेतले. कालांतराने लहान खजगी बैठकीत विष्णू सतारवादन करू लागला. त्याचे सतारवादन ऐकण्यास सदैव उत्सुक अशा मित्रांचा व भक्तांचा त्याच्या भोवती गराडा पडू लागला आणि तो मुंबईत नामवंत सतारवादक बनला. हे सर्व कॉलेजच्या शिक्षणाबरोबरच चालू होते.

एकोणिसाव्या शतकातील शेवटच्या काही वर्षांचा काल हा मुंबईत संगीताच्या बाबतीत महत्वपूर्ण ठरतो. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यानंतर लगेच राजेलोकांचा व राजदरबारांचा आश्रय सुटल्यामुळे कित्येक गायक-वादकांनी यांत बहुतेक मुसलमान होते - ब्रिटिशांनी वसविलेल्या मुंबई, कलकत्ता यांसारख्या नव्या शहरांकडे धाव घेतली आणि तेथे ते रागदारी संगीताच्या मैफली करू लागले. सगळे थोर व पुराणे घरंदाज गायक. त्या सर्वांनी मुंबईस येऊन तेथे गायन-वादनाचे कार्यक्रम दिले. या सर्व गायकांनी घरंदाज ख्याल गायकीत वैशिष्ट्य कमाविले होते. कैक श्रोते त्या संगीताचे कायमचे भोक्ते बनलले. विष्णू नारायण अशा श्रोत्यापैकी एक होते. त्यांच्या गायनवादनाची एकही बैठक त्यांनी चुकविली नव्हती. अशा श्रवणाने झालेले ज्ञान ते उत्सुकतेने आपल्या संस्कारशील मनात साठवून ठेवीत. रागांचे माधुर्य व त्यांचे अप्रतिम दिग्दर्शन यापलीकडे रागांच्या स्वरूपांत व गाताना स्वयंस्फूर्तीने वढत करण्याच्या पध्दतीत गायक-वादकांत अशा प्रकारचे सांप्रदायिक साम्य अनुभवास येई की त्यायोगे अभ्यासू मनाने या सर्वांचे शास्त्रीय मूळ शोधण्यास प्रवृत्त व्हावे. यामुळे विष्णू नारायण यांनी संगीताचा शास्त्रीय अभ्यास पध्दतशीरपणे करण्यास आरंभ केला. संस्कृत, मराठी, गुजराथी व हिंदी भाषांतील संगीतावरील सर्व उपलब्ध साहित्याचे त्यांनी परिशीलन केले व त्यांतील महत्वाच्या मुद्यांची टाचणे केली.

विष्णू नारायण यथाकाल इ.स. १८८५ मध्ये बी.ए. व १८८७ साली एल.एल.बी. परीक्षा उत्तीर्ण झाले. मुंबईतील पारशी जमातीने स्थापन केलेल्या व चालविलेल्या गायन उत्तेजक मंडळी नामक संस्थेत त्यांनी इ.स. १८८४ मध्ये प्रवेश मिळविला होता. त्याकाळात हे लोक संगीतकलेचे मोठे आश्रयदाते होते व गायन उत्तेजक मंडळीत ते वारंवार मुंबईच्या व बाहेरच्या मोठमोठ्या उस्तादांच्या मैफली भरवीत असत.

रावजीबुवा बेलबागकर नावाचे एक धुरपदगायक गायन उत्तेजक मंडळीत नोकर होते. तेथे रावजीबुवांपाशी ते अजमासे ३०० धुरपदे शिकले. संगीतावर उपलब्ध असलेले सारे प्राचीन वाङ्मय त्यांनी पाहिले होते आणि त्यांस असे समजून आले की जुन्या ग्रंथात प्रस्थापित केलेले शास्त्र केव्हाच मागे पडले असून त्याचा आधुनिक संगीत क्रियेशी काहीच संबंध उरला नव्हता. ते फक्त गाऊन वाजवून दाखवीत व त्यांत गीते रचून; तीसुध्दा आपल्या पिता-पुत्र व गुरू-शिष्य घराणेदार संप्रदायाने, लेखन पध्दतीच्या अभावी फक्त मुखाने गाऊन शिकविले जाणाऱ्या प्रणालीत संभाव्य अशा फेरफारांसह गाऊन दाखवीत. ग्रंथातल्या नियमांशी मुळीच संपर्क नसताही या परंपरा प्रस्थापित झाल्या होत्या व त्याच आधुनिक हिंदुस्थानी संगीताचा पाया म्हणून समजल्या

जात असत. याच आधारे भातखंड्यांनील विचार करण्यास आरंभ केला व पूर्ण व्यवस्थित संगीत शास्त्राची उभारणी करून हिंदुस्थानी रागांचे वर्गीकरण केले.

संगीतकलेत अशा प्रकारची शास्त्रीय जोड देण्याची कल्पना मंडळीच्या इतर सभासदांस एकदम पसंत पडली व त्यांनी भातखंड्यांस आपले संगीतावरील विचार नियमित काळाने भाषणद्वारा मांडण्यास विनंती केली. याप्रमाणे व्याख्यानमाला सुरू झाली आणि संगीतकलेचे एक तज्ज्ञ दिग्दर्शक व संशोधक म्हणून पंडित भातखंडे यांचे कार्य सुरू झाले.

तोपर्यंत प्रचलित रूढी, घराणेदार चीजा व नामवंत कालाकारांचे लक्षपूर्वक ऐकलेले गायन-वादन यांच्या आधारावर भातखंडे संगीत शास्त्र व रागनियम बांधीत होते. गायन उत्तेजक मंडळीने मैफलीसाठी बोलाविलेल्या कलाकारांशी ते या विषयाची चर्चाही करीत असत व त्यावेळी मिळविलेल्या माहितीची नोंद करीत असत नोंद करूनन ठेवलेली टिप्पणे ते मंडळीत आपल्या मित्रांपुढे वाचीत. अशा प्रकारे लक्ष्य संगीत व हिंदुस्तानी संगीत पध्दती या त्यांच्या ग्रंथांच्या लेखनाची तयारी चालली होती. पुढे दोनतीन महिन्यांच्या अवकाशात सुमारे दोनशे पन्नास ख्याल भातखंड्यांनी पाठ व ध्वनिमुद्रित केले. पण दुर्दैवाने भातखंड्यांच्या मागे त्यांच्या नकळत सर्व ध्वनिमुद्रिका अशा ठिकाणी ठेवण्यात आल्या की जेथे त्याची किड्यांनी व उंदरानी नासधुस केली. एकंदर ३०० ख्याल पं. भातखंडे महम्मदअल्लीखॉं व आशकअल्लीखॉं कडून शिकले होते. या उस्तादाचा उल्लेख पंडीतजींनी आपल्या ग्रंथात गुरू म्हणून केलेला आहे. काही वर्षानंतर पं. भातखंड्यांनी 'लक्षणगीते', रचण्यास सुरूवात केली. व आपल्या शिष्यांना शिकविले. याच सुमारास पंडीतजींची पत्नी व त्यानंतर कालांतराने मुलगी मरण पावली. आता त्यांच्याकडे कोर्टात कायदेकानून व घरी संगीत या दोनच गोष्टी पुढील आयुष्य कंठण्यास शिलक राहिल्या होत्या.

इ.स. १९०४ मध्ये धाकलीबाई सुकथनकर यांनी दक्षिण हिंदुस्थानची तीर्थयात्रा करण्याचे योजिले. आपल्या यात्रेकरू मंडळीत भातखंडे संगती असावेत असे त्यांस वाटले. याप्रमाणे भातखंड्यांचा दक्षिणेकडचा प्रवास सुरू झाला. दक्षिणेकडे केलेल्या पहिल्या दौऱ्यात भातखंड्यांनी मद्रास, तंजावर, मदुरा, एटायापुरम, बंगलोर व म्हैसूर इतक्या शहरांस भेट दिली. तेथील गायक व संगीत विद्वानांना भेटून त्यांनी सार्वजनिक पुस्तकालये पण पाहिली. चतुर्दण्डिप्रकाशिका नावाच्या ग्रंथाचा कर्ता व्यंकटमखी व गोविंद दीक्षितार यांचे वंशज सुब्राम दीक्षितार यांची भेट एटायापुरी घेतली. सुब्राम दीक्षितारकडून त्यांनी काही उपयुक्त माहिती मिळविली. त्यांच्याकडे चतुर्दण्डिप्रकाशिका चे हस्तलिखित त्यांस मिळाले. पुस्तकालयातून त्यांनी रामामात्य पंडिताचा स्वरमेलकलानिधी, तुळजेंद्राचा संगीत सारामृत व दुसरा एक रागलक्षण नावाचा ग्रंथ, याच्या नकला करवून घेतल्या. मुंबईस परतल्यावर त्यांनी हे ग्रंथ छापवून प्रसिध्द केलले व एका प्रतीस फक्त चार ते आठ आणे किंमत ठेवून जनतेस ते सादर केलले. आपल्या देशात कर्नाटक व हिंदुस्थानी अशा दोन वेगवेगळ्या संगीत पध्दती प्रचलित आहेत व त्यांतील शुध्द व विकृत स्वरांची नावे भिन्न भिन्न आहेत असे उत्तरेकडच्या जनतेस सांगणारे भातखंडे हे

पहिलेच विद्वान होते. खुद दक्षिणेकडे देखील हे ग्रंथ अज्ञात होते व भातखंड्यांनी प्रसिध्द केल्यावर निदान १२ वर्षांनी म्हणजे इ.स. १९४७ साली 'मद्रास म्युझिक अॅकॅडेमी' या नावाची संस्था प्रस्थापित झाली व हल्ली ही संस्था काही प्राचीन ग्रंथांचे संपादन व प्रकाशन करीत असते. मदुरेच्या एम.एस. रामस्वामी अय्यर यांनी स्वरमेल कलानिधी या ग्रंथाचे संपादन व प्रकाशन इ.स. १९३२ मध्ये म्हणजे भातखंड्यांनी तोच ग्रंथ मुंबईत प्रसिध्द केल्यानंतर सुमारे २० वर्षांनी केले.

पंडितजींनी दुसरा दौरा इ.स. १९०७ मध्ये पूर्वेकडील नागपूर, कलकत्ता तसेच दक्षिण हैद्राबाद व विजयानगर येथे केला. कलकत्यात ते इतर विद्ववानां खेरीज ते राजा सर सुरेंद्रमोहन टागोर यांना भेटले. पूर्वेकडील दौऱ्यात अखेरची भेट त्यांनी दक्षिण हैद्राबादला दिली. तेथे त्यांनी काशीनाथ शास्त्री आप्पा तुलसी यांची व काही इतर गायक वादकांची भेट घेतली. त्यांचा तिसरा आणि अखेरचा दौरा जबलपूर, अलाहाबाद, आगरा, दिल्ली, मथुरा, जयपूर, बिकानेर, उदयपूर याठिकाणी झाला. त्याभागात त्यांनी संगीत विद्ववान ख्याती पावलेले पितमलाल गोसावी, गणेशीलाल पन्नालाल गोस्वामी इत्यादींची भेट घेतली. हे सर्व दौरे आटोपल्यावर गोळा केलेल्या माहितीचे संकलन करून, एकत्रित करून त्याची संगतवार रचना केली. आणि हिंदुस्तानी संगीत क्रमिक पुस्तकमालिका भाग १ ते ६ या ग्रंथात प्रसिध्द केली. पुढे संकलीत केलेल्या मुखोदगत बंदिशी पुस्तक रूपाने छापण्याकरिता स्वरलिपी पध्दतीचा शोध लावला व संकलीत केलेल्या कलाकारांच्या रचना प्रकाशित केल्यात.

हिंदुस्तानी संगीताचा प्रचार प्रसार सामान्य जनतेत व्हावा तसेच संगीत संस्था, शाळा, महाविद्यालयातून संगीत हा विषय म्हणून शिकविला जावा याकरिता अनेक संगीत संस्थांची स्थापना केली. आज संगीत हा विषय सर्वस्तरावर शिकविला जातो. याचे श्रेय पंडित भातखंडे यांनाच खऱ्या अर्थाने जाते. असे आणि इतर बरेच सांगितीक कार्य पंडित विष्णू नारायण भातखंडे यांनी केले. त्यामुळे त्यांना भारतीय संगीतातील थोर विचारवंत मानले जाते.

एक व्यापक व सुबध्द व्याकरणीक चौकट उभी केल्यानंतर आपले वय होत असल्याचा आणि अपुऱ्या राहिलेल्या संगीत विषयक कार्याचा १९३२ पंडितजींनी आपल्या हिंदुस्तानी संगीत क्रमिक पुस्तक मालीका भाग ५ मध्ये उल्लेख केला आहे.

पंडित भातखंडे यांचे संपूर्ण जीवन संगीत सेवेकरिता अर्पण झाले होते. संगीत विषयक अथाग असे कार्य करितांना १९३३ मध्ये त्यांना अर्धांग वायूने ग्रासले. सरतेशेवटी १९३७ साली त्यांचे निधन झाले. आपल्याच संस्कृतीचे शास्त्रोक्त संगीत नक्की कसे आहे याचा शोध घेण्यात आयुष्यभर गर्क राहिलेली एक आधुनिक ज्योत निमाली. संगीत विषयक ज्ञानाचा प्रसार व्हावा याचा जीवापाड कष्ट आणि सखोल अभ्यास हे पं. भातखंडे यांचे प्रबलीचे शब्द होते. एक तर्कशुध्द, व्यापक व भक्कम संगीत व्यवस्था पुरवू शकेल अशा मूलभूत पध्दतीचा नव्याने पाया घालण्याचे त्यांनी व्रतच होते. ज्याची वाढ खुंटली आहे वा अनियमित झाली आहे असा एक वृक्ष पुन्हा जोमाने वाढावा यासाठी त्यांनी धडपड केली आणि आज त्या वृक्षाला पुन्हा बहर आलेला

दिसतो आहे. आजच्या, वर्तमान युगातील अभ्यासक भारतीय संगीताचा थोडापर अन्वयार्थ लावू शकतात. कारण भारतीय संगीत परंपरेच्या आकलनास साहाय्यक अशी भक्कम वैचारिक चौकट पं. भातखंड्यांनी उपलब्ध करून दिली. त्यांच्या विचारांशी मतभेद असू शकतो, त्यात बदल केले पाहिजेत असे वाटू शकते - पण हिंदुस्थानी कलासंगीत समजायचे तर पंडित भातखडे वगळून जाता येणार नाही.

"झाले बहू, होतील बहू, परी या सम हा"

संदर्भ :

१. पंडित विष्णू नारायण भातखंडे, एस. एन. रातंजनकर, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली
२. मला भावलेले संगीतकार, डॉ. अशोक रानडे, राजहंस प्रकाशन, प्रा. लि. पूणे
३. संगीत विशारद, डॉ. लक्ष्मी नारायण गर्ग, हाथरस प्रकाशन, हाथरस

PUBLISHED BOOK & PUBLISHED CHAPTER IN BOOK AND CONFERENCE PROCEEDING

DEPARTMENT OF HOME ECONOMICS

2016 - 17 to 2020 - 21

Sr. No.	Name of the Teacher	Number of published Book & Chapter in Book and Conference Proceeding					Total
		2016-17	2017-18	2018-19	2019-20	2020-21	
1	Dr. U. R. Bajpai	00	00	00	01	00	**01**
2	Dr. R. R. Sawjiyani	00	00	00	01	01	**02**
3	Dr. V. D. Dhruve	00	00	00	01	00	**01**
	Total	00	00	00	03	01	**04**


इतिहास
संशोधनातील नवदृष्टीकोन
संपादक
डॉ. संजय गायकवाड

LAXMI BOOK PUBLICATION

Price: 500/-

इतिहास

संशोधनातील नवदृष्टीकोन

डॉ. संजय गायकवाड

© 2020 by Laxmi Book Publication, Solapur.

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

ISBN– 978-1-79486-899-1

Published by,
Lulu Publication
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

Printed by,
Laxmi Book Publication,
258/34, Raviwar Peth,
Solapur, Maharashtra, India.
Contact No. : 9595359435
Website: http://www.lbp.world
Email ID: apiguide2014@gmail.com

10	ख्रिस्ती धर्मातील पंथ व त्याचे तत्त्वज्ञानः एक दृष्टीक्षेप प्रा. डॉ. युवराज गुंडू सुरवसे	47
11	प्राचीन भारतीय आयुर्वेदीक चिकित्सा पध्दती विशाल विजय फुटाणे डॉ प्रा प्रभाकर कोळेकर	55
12	प्रबोधन ठाकरे यांचे हिंदू समाजजीवनाची चिकित्सा श्री बापूराव घुंगरगांवकर	78
13	ॲनाल्स परंपरा की उपलब्धीः स्थानीय इतिहास लेखन Prof. Dr. Sanjay Gaikwad	83
14	IMPORTANT AND CULTURAL HERITAGE TOURISM IN MAHARASHTRA Prof. Battul Surekha Narhari	91
15	IMPORTANCE OF JAIN PILGRIMAGE TOURISM SPECIAL REFERENCE OF MAHARASHTRA Dr. Sainath Kabade	103
16	A CRITICAL STUDY OF FEMINISM IN RAMA MEHTA'S "INSIDE THE HAVELI" Miss. Patil Bhagyashri Siddharam	107
17	CRITICAL ANALYSIS OF GIRISH KARNAD'S 'TALE-DANDA' AS A HISTORICAL PLAY Mr. Ruge Kamalakar Shivalingappa	113
18	CHALLENGES FACED IN IMPLEMENTATION OF PROVIDENT FUND SCHEME IN SOLAPUR'S SMALL AND MEDIUM SCALE POWERLOOM SECTOR Prof. Arun Vitthal Sonkamble Prof. Harshal Shashikant Shinge	118
19	HISTORY OF INDIAN COINS Dr. Swarali Chandrakant Kulkarni	130
20	वृद्धावस्था आणि समायोजन – एक अभ्यास प्रा. डॉ. उज्वला बाजपाई	137

वृद्धावस्था आणि समायोजन – एक अभ्यास

प्रा. डॉ. उज्वला बाजपाई
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.
Mob.No. 9765593864
Email Id- ujwalabajpai1966@gmail.com

प्रस्तावना :

वृद्धत्व एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. आधुनिक काळात झालेल्या विज्ञानाच्या विकासानंतर आरोग्यासंबंधी अनेक संशोधने झाली. औषधोपचार, आहार आणि व्यायाम व बदलती जीवनशैली आणि स्वतःकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन यामुळे वृद्धावस्थेचा कालखंड वाढताना दिसतो आहे. तरी व्यक्तिपरत्वे भिन्नता निश्चितच असू शकते.

मानवी जीवनचक्रातील वृद्धावस्था हा शेवटचा काळ आहे. साधारणपणे साठावे वर्ष म्हणजे निवृत्तीचे वर्ष असे समजले जाते. या अवस्थेमध्ये व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक क्षमता कमी झाल्यामुळे इतरांशी समायोजन करणे कठीण जाते. सेवानिवृत्ती, आर्थिकउत्पन्नात घट, आजारपण आणि कुटुंबाची जबाबदारीयांचे सामंजस्य बसवण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे नवनवीन समस्या आणि परिस्थितीला सामोरे जावे लागते. संकटे, चिंता, क्लेश, दुःख व समस्या यांचा विचार करत बसणे, आत्मविश्वास गमावणे आणि एकलकोंडेपणा या सारख्या समस्या निर्माण होतात.

देशाच्या वरिष्ठ नागरिकांच्या स्वरूपात वृद्ध हे कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा असून कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक विकासाचा महत्वपूर्ण घटक आहे. कुटुंबाच्या अस्तित्वाची ओळखच वयस्कांकडून दिलेल्या संस्कारावर अवलंबून असते. म्हणूनच वृद्धांच्या देखरेखीची नैतिक जबाबदारी सुद्धा कुटुंबाची क्रमाने समाजाची आहे. वृद्धावस्थेचा काळ

आणि नवीन पिढीतील अंतर यामध्ये समायोजन योग्य प्रकारे साधल्या गेल्यास याकडे बघण्याचा दृष्टीकोनबदलता येतो.

आज वरिष्ठ नागरिकांची वाढती संख्या आणि त्यांची हालाखीची परिस्थिती हा एक वैचारिक मंथनाचा विषय बनला आहे. वृद्धावस्थेतील मुख्य समस्या म्हणजे सुरक्षा आणि स्वास्थ्य असून याचा प्रभाव वर्तमान आणि भावी पिढीवर दिसून येत आहे. म्हणून या दिशेने संवेदनशील दृष्टिकोनातून विचार करून आणि शाश्वत प्रयत्न करून वृद्धांना सन्मानजनक जीवन प्राप्त होण्याकरिता योग्य दिशेने पाऊल टाकणे गरजेचे आहे.

संकल्पना :

वार्धक्य ही जीवनाची चरम स्थिती आहे. मानव विकासाची उच्च अवस्थाच वृद्धा अवस्था होय. हा प्रत्येकाच्याच आयुष्यात येणारा काळ आहे.

बक्षी यांच्या मते "वृद्धावस्थेतील लोक सर्व भावरसांच्या पुढे जाऊन खऱ्या जीवनाचा आनंद घेण्यावर विश्वास ठेवतात.आणि म्हणूनच वृद्ध अवस्थेचा खरा आनंद आत्मसंतोष मिळवण्यात असतो.

वृद्धावस्था एक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. यामध्ये होणारे बदल भिन्न प्रमाणात आणि भिन्न गतीमध्ये होतात. तात्पर्य ही अवस्था जीवनाची अंतिम अवस्था आहे असे म्हणणे योग्य आहे. कौटुंबिक जीवन चक्राची संकुचित अवस्था ज्यामध्ये जबाबदाऱ्या कमी झालेल्या असतात, शारीरिक क्षमता कमी होऊन इतर इंद्रिये क्षीण झाले असतात. नैसर्गिक अवस्थेतील अंतिम टप्पा म्हणजे वृद्धावस्था असे म्हणता येईल.

उद्देश :

- वृद्धावस्थेत येणाऱ्या भावनिक, सामाजिक आणि आर्थिक समस्यांवर प्रभाव टाकणे.
- कुटुंब आणि नातेवाइकांकडून मिळणारी वागणूक त्यांच्या दृष्टिकोनातून समजून घेणे.

* वृद्धांच्या समस्यांची आणि नकारात्मकतेचे कारणे अभ्यासणे.

संशोधन पद्धती :

वृद्धावस्थेतील समायोजन आणि त्यासंबंधी घटक, वैशिष्ट्ये व समस्या यांचा अभ्यास या शोधनिबंधामध्ये करण्यात आला. या विषयावर झालेले अध्ययन, चर्चा याचे विवेचन करून माहिती गोळा करण्यात आली. पुस्तके, शोधपत्रिका, वृत्तपत्रे आणि सोशल मीडिया या माध्यमातून माहिती प्राप्त करून देश, समाज आणि कुटुंब यामध्ये वृद्धांचे स्थान, त्यांना करावी लागणारी तडजोड आणि मिळणारी वागणूक यावर प्रकाश टाकण्यात आला. तसेच स्वतः घेतलेला प्रत्यक्ष अनुभव आणि त्यापासून मिळणारे ज्ञान याचा हा शोधनिबंध लिहताना विशेष उपयोग झाला आहे.

वृद्धावस्था हा सर्वोच्च परिपक्वतेचा कालावधी आहे. या अवस्थेमध्ये येणाऱ्या मानसिक, भावनिक, शारीरिक, सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करून त्याचे विश्लेषण करणे, कुटुंब, नातेवाईक आणि मित्रमंडळ यांच्याकडून मिळणारी वागणूक आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांची व नकारात्मकतेची कारणे अभ्यासणे हा या संशोधनाचा उद्देश आहे.

